2009.

काव्य

REFBK 0016293

REFBK-0016293

९/८/२१
७४६९०
१९/३/०७

२००१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक ७४६९४ दि. ९/८/२१
वर्ग २००१ नोंद दि. १९/३/०७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

# मूर्ति टूटी थी

# मूर्ति दुजी ती

[ सावरकरांची निवडक कविता ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १६२९३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संपादक
डॉ. ना. ग. जोशी
एम्. ए., पीएच्. डी.

REFBK-0016293
REFBK-0016293

मूल्य रु. ३.५०

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली : जून १९६७

चित्रकार – अनंत सालकर

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
' तपश्चर्या '
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
टिळक रस्ता : पुणे २

# प्र स्ता व ना

अनंत आणि सुविस्तृत अशा अवकाशामध्ये एखादी उल्का आपल्या नेत्रदिपव्या तेजाने चमकून जावी ही जशी एक अकल्पित घटना असते त्याचप्रमाणे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जीवन ही एक अकल्प्य घटना आहे आणि त्यांचे साहित्य ही स्वातंत्र्य-लक्ष्मीची आरती आहे. सावरकरांच्या काव्याचे विश्व म्हणजे एका अपूर्व ध्येयसाधनेची रंगत आहे. महाविद्यालयीन साहित्यदृष्टीला प्रथम-प्रथम या साहित्यसृष्टीचे फारसे आकर्षण नव्हते, ही गोष्ट सत्य आहे; आणि अजूनही काव्यान्तर्गत मूल्यविचार व प्रयोग यांच्या चर्चेत सावरकरी काव्यप्रयोगांचा संदर्भ आवजून दिला जातोच असे नाही. असे असताही त्यांच्या साहित्याचा स्पर्श ज्याला घडला त्याच्यावर सहजासहजी पुसला न जाणारा असा एक ठसा उमटला जातो यातही शंका नाही.

## स्वा. सावरकरांचे जीवन व साहित्य :

स्वा. सावरकरांचा जन्म सन १८८३ साली झाला. नाशिकजवळचे भगूर हे त्यांचे मूळ गाव. तेथेच त्यांची वतनी जमीन व घर होते. त्यांचे बाळपण बरेचसे नाशिकला गेले, आणि त्याच वेळी त्यांना दक्षिणगंगा गोदावरीची ओढ लागली. त्यांच्या बाळपणच्या अनेक मित्रांत स्वातंत्र्यकवी गोविंद हे प्रमुख होत. कवी गोविंदांची प्रतिभा उच्च दर्जाची होती व बुद्धी तल्लख होती. हा बाल कविमित्र अपंग असल्यामुळे सावरकर त्यांना अनेक वेळी पाठुंगळीस घेऊन जात. एका तमाशाच्या फडासाठी काही लावण्या या दोघांनी केल्याची नोंद आहे. पण मुख्य म्हणजे राष्ट्रप्रेमाने ओथंबलेल्या त्या दोघांच्या हृदयांतून मातृभूमीच्या कळवळ्याचे जे उद्गार मेळ्यांची पदे, पोवाडे यांच्या द्वारे उमटले ते चटका लावणारे ठरले. या दोघांच्या शैलीत त्या वेळी इतके साम्य होते की 'हे सदया गणया तार' यासारखे पद विनायकरावांचेच असताही, गोविंद-कवींचेच असावे असा ग्रह व्हावा. गोविंदकवींचा 'अफजलखानवधाचा पोवाडा' आणि सावर-करांचे 'तानाजी' व 'बाजी' यांचे पोवाडे यांच्या आशय-विषय-शैलीत अशीच एकरूपता आहे.

याच वयातल्या सावरकरांच्या गीतांत 'गोदावरी'चाही समावेश होतो. या व इतर काही स्फुट कवितांत नाशिकच्या तत्कालीन व्यक्तींचा व स्थळांचा उल्लेख आढळतो. त्यांची सर्वांत पहिली कविता ' श्रीमंत सवाई माधवरावांचा रंग ' ही पेशव्यांच्या बखरीप्रमाणेच प्रभाकर शाहिराच्या याच प्रसंगावरच्या कवनावरूनही स्फुरलेली असावी. ती सन १८९४ मध्ये म्हणजे वयाच्या १२ व्या वर्षी लिहिली गेली. त्यांचे वडील विनायकरावांना होमरच्या इलियडमधले उतारे वाचून दाखवीत आणि मराठ्यांच्या बखरीही त्यांच्या कानांवर पडत. पुढे फर्ग्युसन कॉलेजात संस्कृत महाकाव्याबरोबरच मिल्टनच्या ' पॅरडाइज लॉस्ट 'चाही परिचय त्यांना झाला. याच सुमाराला (१८९९) त्यांच्या कानी चाफेकर–रानडे यांना रँडच्या खुनाबद्दल झालेल्या शिक्षेची बातमी गेली व त्यांनी त्यांच्यावर फटका रचला. त्याआधी १८९८ साली स्वदेशीचा फटका त्यांनी लिहिलाच होता. या बालपणाच्या व प्राथमिक–माध्यमिक शिक्षणाच्या काल-खंडानंतर विनायकराव पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमध्ये आले. सन १९०२ मध्ये त्यांनी ' श्रीशिवाजी महाराजांची आरती ' लिहिली. १९०३ मध्ये ' स्वतंत्रतेचे स्तोत्र ', १९०५ मध्ये तानाजी–बाजींचे पोवाडे ही काव्ये लिहिली गेली. सन १९०६ साली स्वातंत्र्यवीर विलायतेस बॅरिस्टर होण्यासाठी जात असता आगबोटीवर ' तारकांस पाहून ' ही प्रतिभासंपन्न कविता त्यांना स्फुरली. सन १९०९ मध्ये लंडनला असताना ' हिंदसुंदरा ती ' हे वैशिष्ट्यपूर्ण काव्य त्यांनी रचले. त्याच साली चि. प्रभाकराच्या मृत्यूनंतर ' प्रभाकरास ' ही काहीशी वैयत्तिक कविता त्यांनी लिहिली. 'सागरास' हे अप्रतिम भावकाव्य त्याच सालचे. 'सान्त्वन' ही दुसरी सुप्रसिद्ध व वैशिष्ट्यपूर्ण कविता १९०९ सालीच पत्ररूपाने त्यांनी थोरल्या बंधूंच्या पत्नींना–वहिनींना–लिहून पाठविली. १९१० मध्ये त्याच वहिनींना अटकेतून ' माझे मृत्युपत्र ' ही कविता पाठविली. या कवितेपासून कारागारातील कवितांचा कालखंड सुरू होतो. ' आत्मबल ' ही कविता मार्सेल्सला बोटीवरून निसटण्याचा केलेला धाडसी प्रयत्न विफल झाल्यावर (१९१०) त्यांनी अटकेतच समुद्रमार्गावर असता लिहिली. याच अटकेत अतिशय महत्त्वाची ' सप्तर्षि ' ही तात्त्विक बैठकीची भव्योदात्त कविता त्यांनी लिहिली. पुढे अंदमानात असता ' सायंघंटा ', ' मूर्ति दुजी ती ', ' आकांक्षा ', ' जगन्नाथाचा रथोत्सव ', ' अज्ञेयांचे रुद्रद्वार ', ' मरणोन्मुख शय्येवर ' ही स्फुट भावकाव्ये आणि ' कमला ', ' विरहो-च्छ्वास ', ' महासागर ' ( अपूर्ण ) व ' गोमंतक ' ही दीर्घ खंडकाव्ये त्यांनी लिहिली. या सर्वांत त्यांच्या अपूर्व वस्तू निर्माण करू शकणाऱ्या प्रतिभेचे मोहक व दाहक दर्शन होते. त्यातही मोहक अशा पहिल्या कविता-मूर्तीपेक्षाही अधिक दाहक अशी ' मूर्ति दुजी ती ' आपणांला आपल्या पकडीत बांधून ठेवते– हौतात्म्याच्या तेजस्वी संदर्शनाने आपले डोळे दिपवून टाकते.

त्यानंतरच्या काव्यांचा कालखंड म्हणजे रत्नागिरीत स्थानबद्धतेमध्ये असता लिहिलेल्या हिंदुत्वनिष्ठ काव्यांचा काळ होय. यापैकी पहिल्या कालखंडात त्यांनी मॅझिनीचे ' आत्मचरित्र ' व ' १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध ' ही आपली प्रसिद्ध पुस्तके लिहिली. दुसऱ्या कालखंडात 'अंदमानच्या अंधेरीतून' ही पत्रे लिहिली, आणि तिसऱ्या म्हणजे सन १९२४ ते १९६४ च्या काळात ' माझी जन्मठेप ', ' आत्मचरित्र ', ' हिंदुपदपादशाही ', ' हिंदुत्व ', ' उ:शाप ', ' संन्यस्त खड्ग ', ' उत्तरक्रिया ' ही पुस्तके लिहून झाली. ' सावरकर-साहित्या 'चे सर्व भाग याच काळातील निबंधांचे संग्रह होत.

सावरकरांचे प्रत्यक्ष जीवन हेच एक महाकाव्य आहे. अद्‌भुतरम्य वातावरण, भव्योत्कट ध्येयवाद, आणि अत्यंत निर्भय व धाडसी मनोवृत्ती यांमुळे त्यांचे चरित्र हे एखाद्या ऐतिहासिक कादंबरीसारखे वाटते. सावरकरांच्या मनावर ज्यांचे संस्कार अतिशय खोल उमटले अशा ऐतिहासिक व्यक्तींत शिवाजीमहाराज, पहिला बाजीराव, भाऊसाहेब, गोविंदसिंह, वीरबंदा यांसारखे वीरपुरुष मुख्य होते. त्यांच्या बुद्धीवर ज्यांचे संस्कार उमटले त्यांत प्रथम होमर-मिल्टन-कालिदासादी कवी, गिबेन-मॅझिनी यांसारखे पाश्चात्त्य लेखक, लोकमान्य टिळक आणि लोकमान्य परांजपे ( शिवराम महादेव ) ही पुढारी मंडळी होती. बालकाळ, विद्यार्थिदशा व अंदमानातील प्रारंभीचा काळ येथपर्यंत निर्भेळ राष्ट्रोद्धाराची स्वप्ने त्यांच्या वाङ्मयात उमटली; पण त्याच सुमारास प्रत्यक्ष राजकीय क्षेत्रातच मुस्लिम लीगचे वर्चस्व वाढत गेले. ' लखनौ करार ' केराच्या टोपलीत गेला. अल्पसंख्य जमातीतील प्रजेला इंग्रज मुत्सद्द्यांनी आपल्या साम्राज्याच्या फायद्यासाठी चढवून ठेवल्यामुळे त्यांच्यातली हट्टी आक्रमक वृत्ती देशात बळावली. अंदमानातही या बेमुर्वतखोर वृत्तीचा अनुभव स्वातंत्र्यवीरांना आला— हळूहळू ' हिंद सुंदरा ती ' या उद्‌गारांत प्रतिबिंबित झालेली निधर्मी राष्ट्रवादाची बैठक मुरडली जात चालली, व अखेरीस ' अखिल हिंदु विजयध्वज गीत ' गाण्याची नितान्त आवश्यकता त्यांना पटली. आणि जे पटले ते आचरण्यास त्यांनी कधीही विलंब केला नसल्यामुळे त्यांनी उघडपणे हिंदुत्वनिष्ठेच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला. सन १९३७ नंतरचा हा काळ.

स्वा. सावरकरांनी आपल्यासमोर शिवाजीमहाराज हे दैवत ठेवले होते. समर्थ रामदासांनी श्रीराम आणि हनुमान या दैवतांना आवाहन करीत जनतेचे उद्‌बोधन केले. सावरकरांनी शिवरायासारखी प्रत्यक्ष ऐतिहासिक विभूतीच लोकांच्या पुढे उपास्य-दैवत म्हणून उभी केली. हे करताना त्यांनी जरी ' आर्यांच्या देशावर आलेला म्लेंच्छांचा घाला ' परतविण्यासाठी शिवभूपालाला आळविले असले तरी शिवाजीराजांचे व्यापक, सर्वग्राही धोरणच त्यांना तेव्हाही अभिप्रेत होते. त्यांच्या ' अभिनव भारत ' संस्थेत मुस्लिम होते— जसे ते शिवाजीच्या सैन्यात

होते; त्यांच्या ' १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धा 'त दिल्लीच्या बादशहाच्या तोंडी Hindus and Moslems unite असे उद्‍गार आहेत, व नानासाहेब वगैरे त्यांचेच सम्राटपद मानतात, कारण त्या वेळी आलेला घाला मुस्लिम म्लेंच्छांचा नव्हता, त्याहून भयंकर अशा आंग्लांचा होता. सावरकर रत्नागिरीस असताना अभिनव भारताचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न त्यांनी व विशेषतः त्यांचे थोरले बंधू बाबाराव सावरकर यांनी केला; आणि त्या वेळी परकी सत्ता हीच प्रमुख शत्रू होती—मुसलमानांचा आक्रमक जातिवाद हा नंबर दोन शत्रू. त्यांच्या विचारसरणीतील हा निर्मळ राष्ट्रप्रेमाचा वारसा त्यांच्या रत्नागिरीहून प्रकट झालेल्या सायमन-विरोधी प्रतिक्रिया, ' हा भगतसिंग ' ही कविता, आणि १९४७ साली स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यावरचे त्यांचे उद्‍गार यांत उमटलेला आहे. खरे म्हणजे परमशुद्ध राष्ट्रवादालाच त्यांनी सतत मनी बाळगले होते; हिंदुराष्ट्रवाद हा एक आपद्धर्म होता, ती एक सापेक्ष पोटविचारसरणी होती. हिंदुस्थानातले ते सर्वच हिंदू खरे, पण जे स्वतःला तसे न म्हणविता हिंदभूमीच्या प्रजेला नाडतील तेही परक्या साम्राज्यकर्त्यांएवढेच आपले कट्टर दुष्मन,–असा रोखठोक तर्क त्यामागे होता. आपल्या अंतकाळी स्वातंत्र्यवीरांनी जी असीम तितिक्षा प्रकट केली, आणि आपल्या मृत्युपत्रात जी बावनकशी बुद्धिनिष्ठा व्यक्तविली– तिला तर जोडच मिळणे कठीण ! ' सावरकर-साहित्या 'तील निबंधांत प्रकट झालेली तर्कशुद्ध विचारसरणी अखेरपर्यंत मनोमनी जागृत होती यात शंकाच नाही.

## सावरकरांच्या साहित्याची वैशिष्ट्ये :

' समग्र सावरकर-साहित्य ' हा एक प्रकारे सावरकरांच्या व्यक्तित्वाचाच आविष्कार आहे अगदी कथाप्रधान खंडकाव्ये किंवा नाटके लिहितानाही लेखकाची तेजस्वी व्यक्तिरेखा तटस्थ राहू शकली नाही, आणि याचा परिणाम हा झाला की, त्यांचे साहित्य विविध व्यक्तिविशेषांनी फुलून येण्याऐवजी एकच एक दाहक व्यक्तित्व त्यातून प्रकट होत राहिले. सावरकरांचे इतिहासग्रंथही या मर्यादेपासून मुक्त होऊ शकलेले नाहीत. आधीपासून निश्चित झालेला सिद्धान्त प्रस्थापित करण्यासाठी जसा गद्य साहित्यशैलीचा आश्रय घेऊन निबंधादी लेखन झाले तसेच ' १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध ' आणि ' हिंदुपदपादशाही ' हे ग्रंथ लिहिले गेले. यामुळे ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले काव्यग्रंथ तर फारच ढोबळपणाने ऐतिहासिक सत्य टिकविताना आढळतात. त्यांतील नायक-नायिका ठराविक साच्यातल्या झाल्या आहेत. सावरकर हा सूत्रधार या कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करून दाखवीत आहे, या सत्याची जाणीव वाचकाच्या मनातून क्षणभरही दूर होत नाही; आणि त्यामुळे त्यांचे

सर्वच साहित्य एका अर्थाने प्रथम पुरुषी, आत्मनिष्ठ झाले आहे. मात्र त्यामुळे त्याला आवेगी भावकाव्याची बैठक प्राप्त झाली आहे.

सावरकरांची काव्यप्रतिभा उत्तुंग भराऱ्या मारणारी आहे, भावनेच्या लाव्हारसाने रसरसलेली आहे. दुर्दम्य आशावाद, अदम्य आकांक्षा यांचा गगनविहार त्यात सदैव चालू असतो. त्यामागील कल्पनाविश्व प्राचीन साहित्याच्या परिकक्षा गाठीत असते. यामुळे हे साहित्य वाचल्यावर ग्रह असा होतो, की कवितेच्या मृदुमधुर मूर्तीची पूर्ण कल्पना या कवीला असूनही त्याने कविता निर्माण केली आहे त्यात दिसते 'मूर्ति दुजी ती'! 'गोमांतक' काव्यांतील नायकनायिका शंकर-लिली यांचे महाराष्ट्रभाट सावरकर असे वर्णन करतात :

शब्दमेघ ते द्रवुनी पत्रिकेतले
स्वातीचे अर्थबिंदु टपकतांच तो
हृदयाच्या शिंपल्यात झेलुनी धरी

सावरकर-काव्यातले भव्योदात्त भावार्थाचे मुक्तामणीही सुंदर पद्यशुक्तीत ठेवले गेल्यामुळे असेच अनुरूप ठरले आहेत. सावरकरांच्या बहुसंख्य कविता याची साक्ष देतील. मृदुललित कविता अवतीर्ण झाल्याचे आपणांस फारच थोड्या कवितांत दिसते. त्यांची 'सागरास' ही कविता अशा कवितांपैकी प्रमुख होय. दुसरी 'सान्त्वन' ही कौटुंबिक व राष्ट्रकौटुंबिक स्नेहरसाने थबथबलेली कविता याच दर्जाची आहे. 'प्रभाकरास' या कवितेत विषय अत्यंत हृदयद्रावक असूनही काव्य म्हणून ते या कवितांच्या खालच्या नंबरचेच ठरावे. तशा ठराविक अर्थाने भावगीतात्मक अशा कविता सावरकरांनी लिहिलेल्या नाहीत; पण त्यांचे सर्वच साहित्य त्यांच्या प्रगल्भ व्यक्तित्वाने भारावलेले असल्यामुळे त्यातील अनेक काव्ये भावगीतात्मक झालेली आहेत. अशा काव्यांतून केवळ प्रचारात्मक अशी काव्ये वगळावयाची आहेत. प्रस्तुत निवडक कवितांच्या संग्रहातून ती बहुतेक वगळल्याचेच दिसून येईल.

स्वा. सावरकरांच्या कथात्मक दीर्घ कविता या महाकाव्यत्व पावल्या आहेत काय? असा प्रश्न अनेक रसिकांना पडल्याचे दिसते. एका मार्मिक टीकाकाराने म्हटल्याप्रमाणे सावरकर हे 'महाकाव्य न लिहिलेले महाकवी' वाटतात. तान्त्रिकदृष्ट्या संपूर्ण असे महाकाव्य त्यांच्या हातून पुरे झाले नाही हे खरेच; पण "सावरकरांनी आपल्या 'कमला', 'गोमंतक' इत्यादी काव्यांच्या विषयांची जी निवड केली ती जगातील थोर महाकाव्यांच्या विषयाइतकीच भव्यकरुण आहे. त्यातील मध्यवर्ती घटना पानिपतचे शेवटचे युद्ध आहे... भारतीयांचे स्वतंत्र साम्राज्य स्थापून अखिल देश एकछत्राखाली

आणण्याची संग–पृथ्वीराजांसारख्या अतुल पराक्रमी आर्यवीरांची इच्छा महाराज शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेनंतर दृष्टिपथात आणण्यासाठी पहिल्या बाजीरावांच्या आणि तदनंतर नानासाहेब पेशव्यांच्या असीम भगीरथ प्रयत्नांची परिणती व्हावयाचा क्षण आला पानपतच्या रणभूमीवर !...अशा वेळी नियतीने मर्माघात केला, हिंदुपद-पादशाहीच्या आकांक्षा धुळीस मिळाल्या, आणि त्या सर्व घटनांची सूत्रे हालविणारा नानासाहेब पेशवा,–' भाऊ ' ' भाऊ ' म्हणून आक्रंदन करीत, अवश्यंभावी नियतीच्या अधीन झाला ! केवढी ही भव्य घटना ! पण महाराष्ट्र साहित्याच्या दुर्दैवाने ही मध्यवर्ती घटना काव्यरूप पावलीच नाही ! ! "[1] या घटनेला पोषक अशा काही आंगिक घटनांवर ' कमला ', ' गोमंतक ' व ' महासागर ' या खंडकाव्यांची उभारणी झालेली आहे. ' विरहोच्छ्वास 'सुद्धा यांपैकीच एक उपाख्यान. या काव्यांविषयी प्रा. शं. के. कानेटकरांचे मत पुढीलप्रमाणे आहे : " 'कमला' स्वयंपूर्ण व रसोत्कट असल्याचे आढळते. कल्पनारम्य घटना व सांकेतिक वर्णने, हे दोष दृष्टिआड केल्यास, या काव्यात ठिकठिकाणी रसपरिपोषाचा शिडकावा झालेला दिसून येईल... ' विरहोच्छ्वास ' काव्याला एक प्रदीर्घ भावगीत म्हणावे लागेल. त्यात खंडकाव्याचा भाग इतकाच, की पानपतच्या युद्धात वावरणारीच पात्रे त्यात पुन्हा आली आहेत,–किंवा 'कमला' काव्याचा हा थोडा पुढला भाग आहे. प्रत्येक 'उच्छ्वास' हे एक स्वतंत्र भावगीत असल्याने, चाळीस भावगीतांच्या या गुंफणीला मोहनमाळेचे स्वरूप आले आहे. या स्मरणीत विरहवेदनेची व्याकुळता भरलेली आहे."[2] ' गोमंतक ' काव्याच्या संबंधात प्रा. रा. श्री. जोगांचे मत पुढीलप्रमाणे आहे : " प्रस्तुत काव्यात घटना किंवा प्रसंग यांनाच महत्त्व आहे; व्यक्तिरेखांना कमी आहे... व्यक्तिदर्शन हा या काव्याचा मूळ हेतू नाही. महाकाव्याची मिल्टनची कल्पना त्यांच्या डोळ्यांपुढे असावी असे वाटते; व त्यामुळे मिल्टनची भारदस्त भाषाशैलीच त्यांनीही उचलली असावी असे वाटते. भाषणे व संवाद भारदस्त हवेत ही कल्पना जशी कवीने ( मिल्टनवरून ) उचलली, तशीच होमरच्या दीर्घोपमांप्रमाणे आपल्या काव्यात दीर्घोपमा आल्या पाहिजेत अशी कवीची कल्पना असलेली दिसते...सारांश, ' गोमंतक ' काव्याची लेखनशैली अत्यंत चमत्कारिक व म्हणून

[1] " साहित्यविवेचन " ( ना. ग. जोशी ) या आगामी ' व्हीनस प्रकाशना 'तील ' महाकाव्य ' नामक निबंधातून उद्धृत.

[2] " सावरकरकाव्यसमालोचन "–' कमला आणि विरहोच्छ्वास ', प्रा. शं. के. कानेटकर.

वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे. विचारगौरव व पांडित्य यांचा तिला पाठिंबा नसता तर ती दोषार्हच ठरली असती."[३]

या कथात्मक काव्याप्रमाणेच त्यांची 'तारकांस पाहून' व 'मूर्ति दुजी ती' ही काव्ये रसिकांना अतिशय मुग्ध करून टाकतात. भाषाशैलीच्या बाबतीत प्रा. जोग यांच्या वरील मतासारखेच मत या कवितांबाबतही द्यावे लागेल. तरी पण ही काव्ये उघडउघड आत्मनिष्ठ असल्यामुळे त्यांत जिव्हाळा व आवेग अधिक आहेत. 'तारकांस पाहून' या कवितेविषयी श्री. अनंत काणेकर म्हणतात : "एकामागून एक स्फुरणाऱ्या कल्पनांची सहजता, सौंदर्य आणि भव्यता यांच्या प्रमाणावरूनच प्रतिभेचे तेज अजमावयाचे असते. या दृष्टीने पाहता 'तारकांस पाहून' या कवितेत सावरकरांनी उत्तुंग कल्पनांचे जे मनोरे रचले आहेत ते पाहून त्यांच्या तेजस्वी प्रतिभेची ताबडतोब साक्ष पटते."[४] 'मूर्ति दुजी ती' हीसह इतर पाच दीर्घ कवितांविषयी प्रा. श्री. शं. खानवेलकर लिहितात : "'मूर्ति दुजी ती', 'सप्तर्षि', 'मरणोन्मुख शय्येवर', 'आकांक्षा', 'चांदोबा चांदोबा' आणि 'सायंघंटा' ही श्री. सावरकरांची सहा दीर्घ काव्ये आहेत...त्यांचे विषय, रचना आणि विषय हाताळण्याची हातोटी जरी निराळी असली तरीही त्यांत आशानिराशांचे द्वन्द्व आहेच. ...'मूर्ति दुजी ती' हे भीषण-रमणीय काव्य आहे. कवितेच्या कोमल आणि प्रखर मूर्तींपैकी दोन्ही मूर्तींचे चित्र त्यांनी या काव्यात सुंदर रेखाटले आहे. यमुनापुलिनावर मृदू ओठांनी बासरीचे स्वर काढणारी ही एक मूर्ती, आणि दुसरी रणशिंग फुंकणारी व तांडव नृत्य करणारी ! या चंडिकामूर्तीचे वर्णन रम्यभीषण आहे. या चंडमूर्तीची आठवण केल्यानंतर त्यांना धर्मासाठी प्राण दिलेल्या बंदावीराची आठवण झाली...आपल्या त्यागामुळेही मायभूमीतील पददलित समाजाचे असेच उत्थान होईल अशी कल्पना श्री. सावरकरांच्या मनात त्या वेळी डोकावून तर गेली नसेल ना ?"[५] 'जगन्नाथाचा रथोत्सव' आणि 'अनंताची आरती' या कवितांचे महत्त्व या सर्व कवितांहूनही आगळे आहे. सर्व दृष्टींनी

[३] "सावरकरकाव्यसमालोचन"–'गोमंतक' प्रा. रा. श्री. जोग. 'गोमंतक' व 'कमला' यांमधील होमरीय उपमांचे वर्णन ना. ग. जोशी यांनी "महाकाव्य आणि बॅ. सावरकर" या भाषणलेखात केलेले आहे ('सहविचार' त्रैमासिक, बडोदे, १९४०).

[४] वरील ग्रंथ – 'तारकांस पाहून' (रसग्रहण) श्री. अनंत काणेकर.

[५] वर उल्लेखिलेला ग्रंथ – 'सावरकरांची दीर्घकाव्ये' प्रा. श्री. शं. खानवेलकर.

परिणत झालेल्या अवस्थेतील ती काव्ये आहेत. अतिविशाल, व्यापक तात्त्विक बैठक आणि कल्पनाशक्तीची गगनचुंबी झेप यांच्या समरसतेतून असली काव्ये निर्माण होत असतात. या दोन्ही कवितांत रचनाशैलीतला चमत्कारिकपणा तर नाहीच पण उलट विषयाच्या भव्यतेला अनुरूप अशीच शैली तेथे प्रकट झाली आहे; – नव्हे शैली आणि आशय यांचे अधिकात अधिक एकरूपत्व आणि परस्परावलंबित्व सावरकरी कवितांत जर कुठे दिसत असेल तर ते या कवितांतच, आणि त्यांतही 'जगन्नाथाचा रथोत्सव' या कवितेत विशेषत्वाने आढळते. विश्वाचे अनंत कालमापन आणि अप्रमेय अवकाश या दोन परिमाणांच्या चक्रांवर महाकवीच्या प्रतिभेचा दिव्यरथ मार्ग क्रमीत असतो; जगन्नाथाच्या रथोत्सवाचे उपमानही या बाबतीत खरोखर अपुरेच ! पण तेथेही सावरकरांनी रूपकाश्रयाने भव्य आणि उदात्त वातावरण निर्माण करून दाखविले आहे हे मान्य करावयास पाहिजे. 'अनंताची आरती'मध्ये उपमान घरगुती, कौटुंबिक आहे; पण तेथे अनंतता ही प्रखर वरेण्यमय जगन्नाथ नसून प्रेमळ जगन्माता आहे, आणि त्याला साजेसा जिव्हाळा आणि आपुलकी या काव्यात आहे.

## सावरकरी काव्याची रचनाशैली :

स्वा. सावरकरांच्या वाचनात लहानपणीच मोरोपंतांची काव्ये आली आणि त्यांच्या मनावर मोरोपंती शैलीचे सर्व विशेष ठसले. "गातो आर्यांते श्रीमयुरेशस्फूर्तिने 'विनायक' तो" असे स्वतः विनायकरावच 'श्रीटिळकस्तवना'त म्हणतात; आणि पंतांचे वंशज पंतपराडकर यांना ते लिहितात : "आपण मयूर-वंशज, कविचा त्या भक्त तो पुरातन मी." त्यामुळे श्लेष, अनुप्रास, यमक यांसारख्या शब्दालंकारांची खुलावट सावरकरी काव्यात अनेक स्थळी आढळते. अर्थालंकारांच्यापैकी उपमा योजण्यात तर त्यांचा हातखंडाच आहे आणि त्यातही होमरीय पद्धतीच्या दीर्घोपमा उपयोजाव्या त्या सावरकरांनीच ! याची अनेक उदाहरणे 'कमला', 'गोमांतक', 'मूर्ति दुजी ती' यांसारख्या दीर्घ कवितांत स्थळोस्थळी सापडतात. 'तारकांस पाहून' या कवितेत शेलीयन पद्धतीच्या उत्प्रेक्षा आहेत आणि अपह्नुतीही आहेत. भाषाशैलीच्या बाबतीत सावरकरी गुणदोष अगदी स्पष्ट आहेत. हा कवी प्रगल्भतेचा उपासक आहे. त्यामुळे अनेक संदर्भांनी युक्त अशा प्राचीन शब्दसंहतांचा विनियोग त्यांनी पदोपदी केलेला आहे. त्यांना जो भाव व्यक्त करावयाचा आहे तो बहुधा उग्र-दाहक असल्यामुळे त्याला अनुरूप अशी शब्दयोजना अनेकदा आलेली आहे. केवळ शास्त्रवचनाप्रमाणे ठरवू गेल्यासच त्या शैलीला अप्रयुक्त म्हणावयाचे ! या गौडी रीतीचाच सावरकरी काव्यात प्राधान्याने

आविष्कार झालेला आहे. दोष हा आहे की, जेथे साधी, घरगुती, वैयक्तिक बाब असेल, मृदु-सोज्वळ भाव असेल, अशा ठिकाणीही सावरकरी कविता अलंकारमंथर असते, श्लिष्ट-क्लिष्ट शब्दसंहतींनी भारावलेली असते. सावरकरी काव्याची ही विशिष्टता लक्षात घेऊनच प्रा. जोग म्हणतात : "त्यांच्या लेखनशैलीचा जाचक असा विशेष म्हणजे तिचे (अप्रस्तुत) गांभीर्य हा होय. त्यामुळे एक प्रकारचा अवजडपणा त्यांच्या काव्यास व्यापून राहिला आहे... प्रसादगुणाचे अस्तित्व बहुतांशी अभावानेच त्यांच्या कवितेत जाणवते. साध्या गोष्टीही सावरकरांच्या लेखणीतून क्लिष्ट व गंभीर होऊनच बाहेर पडाव्यात असा विधिसंकेतच दिसतो."[६] वरील उताऱ्यातील मुद्दे जरी बऱ्याच प्रमाणात खरे असले तरी एवढे मात्र म्हटले पाहिजे की, केवळ प्रसाद-गुणाचा अभाव असणे हा आता महान दोष मानला जात नाही. हा केवळ ओजोगुणाचाही परिपाक नव्हे. सावरकरी काव्यांच्या रसग्रहणाच्या वेळी काव्यगत गुणांच्या व रीतींच्या वर्गीकरणांतील कप्पे उपयोगी पडणार नाहीत. आशयाला व्यक्त होण्यास अनुरूप अशा संदर्भांनी, साहचर्यांनी, अर्थच्छटांनी योग्य वाटणाऱ्या शब्दांचा अवलंब करून जी कलाकृती निर्माण झाली तीमधील शैली तिला अनुरूप आहे असाच निर्णय देणे भाग आहे. या अर्थाने सावरकरी शैली म्हणजे 'नारीकेलफल' आहे असे म्हणून भागणार नाही, उलट येथे द्राक्षफलाचा रस नाही हेच योग्य होय असे म्हणणे भाग आहे. अर्थात अशी अनुरूपता नसलेली क्लिष्ट स्थळेही सावरकरी कवितेत आहेतच. श्री. बाळशास्त्री हरदास यांना तर सावरकरी कविता ही आर्ष महाकवींच्या जातीचीच वाटते— "त्यांच्या प्रतिभावीणेचा मधुर झंकार माधुर्यमय नादलहरींनी मानवी जीवनाचे सांदीकोपरे प्रथम निनादवीत असतो; त्यांच्या हृद्योद्गारांना काव्याचे शब्दस्वरूप येऊन त्यामुळे वाङ्मयोद्यान फुलणे ही त्यानंतर निदर्शनास येणारी अनुगत प्रतिकृती आहे. .. सावरकरसाहित्याची जात व या (प्राचीन) द्रष्टयांच्या साहित्याची जात एक आहे. लौकिक साहित्याशी त्याचा काही संबंध नाही. द्रष्ट्याचे शब्दरूप भावाविष्करण हे याचे यथार्थ स्वरूप असल्यामुळे त्या नात्यानेंच त्याचे समीक्षण केले पाहिजे."[७] यातील विभूतिपूजेमुळे उत्पन्न झालेली अतिशयोक्ती सोडली तर सावरकरांच्या भव्योदात्त काव्याच्या 'रीती'चे यात बरेच मान्य होण्यासारखे स्पष्टीकरण मिळते असे वाटते.

६ "अर्वाचीन मराठी काव्य" (द्वितीयावृत्ती) पृ. २६७.

७ "सावरकरकाव्यसमालोचन––" 'भारतीय काव्यवाटिकेत सावरकर-कवितेचे स्थान' : साहित्याचार्य, वेदान्ततीर्थ बाळशास्त्री हरदास.

# सावरकरी कवितेतील परिष्करण – छंद । प्रयोग :

## परिष्करण :

सावरकरांची बरीचशी कविता अंदमानात लिहिली गेली. तेथे ना संदर्भग्रंथ, ना लेखन-सामग्री. अणकुचीदार दगडाने भिंतीवर काव्याचे चरण लिहून मुखोद्गत करावयाचे— आणि श्री. रामहरिसारख्या अ-मराठी सहकाऱ्याकडून पाठ म्हणवून घ्यायचे. 'कमला' काव्य असे उपलब्ध झाले. श्री. रामहरि यांनी ते बहुतेक मुखोद्गत केले होते. यामुळे अर्थातच अपपाठ बरेच निर्माण झाले. त्यांचे पोवाडे आणि फटकेही असेच केवळ कंठगत अवस्थेत उपलब्ध होते. त्यांची अधिकृत संहिता सन १९२४ नंतर उपलब्ध होऊ शकली. त्यामुळे काही काव्यांत परिष्करणे–सुधारणा कराव्या लागल्या. प्रा. मायदेवांनी 'कमला' काव्याची नवी आवृत्ती तयार करताना असे अनेक फरक सावरकरांच्याच पूर्ण संमतीने त्यात केले. 'सागरास' कवितेतही असेच फरक झालेले आहेत. 'कमला'मधील एक फरक म्हणजे 'अर्धचंद्र उभारी जो' इत्यादी चरण बदलून बंदा धर्मवीराचा उल्लेख घालणे व 'स्फूर्त आरब-नी'चे उच्चाटन करणे. येथे केवळ अर्थोपलब्धी किंवा वृत्तसुख साधलेले नाही; बदललेल्या तात्त्विक–धार्मिक बैठकीमुळे हा बदल केला गेला. खरोखर सावरकरांनी मनात आणले असते तर त्यांना लेखनातील संस्कृतप्राचुर्य, समासबाहुल्य, 'गौडी' रीतीचा अकारण अट्टाहासही बराचसा कमी करता आला असता; पण सावरकर केवळ कवी नव्हते; काव्यादी लेखनातील कलाकुसरीपेक्षा जीवनातील कृतींचे महत्त्व त्यांना अधिक होते. त्यामुळे हे कार्य हवे होते त्या प्रमाणात होऊ शकले नाही.

## वैनायक वृत्त :

पण काव्याच्या प्रान्तातला त्यांचा एक प्रयोग सावरकरी विशेषांनी भरलेला आहे. तो म्हणजे 'वैनायक' वृत्ताची निर्मिती आणि विनियोग. सावरकरांना मिल्टनच्या 'ब्लॅन्क व्हर्स्'सारखे किंवा मधुसूदन दत्तांच्या 'अमित्राक्षर छंदा'सारखे निर्यमक, धावते वृत्त पाहिजे होते. महाकाव्यांच्या निर्मितीला प्राचीन काळी आर्ष अनुष्टुपाचे वाहन लाभले. सावरकरांनी 'कमला' व 'गोमंतक' (पूर्वार्ध) यांसाठी त्याचा वापर केला; पण त्यानेही त्यांचे समाधान झाले नाही. त्यांना निर्यमक 'पयार' म्हणजेच 'अमित्राक्षर छंद' हा चौदा अक्षरांचा निर्यमक प्रवाही छंद आठवला, आणि त्याला समान वाटणारी अशी त्रिमात्रक गटांच्या चरणाची

रचना योजून त्याला त्यांनी 'वैनायक' म्हटले असावें.[८] या वृत्तात, म्हणजे खरोखर 'मात्रावृत्ता'त, सहा-सहा मात्रांचे तीन गट किंवा आवर्तनें, आणि शेवटी एक गुरू अक्षर, अशी चरणयोजना असते; यमक नसते, आणि वाक्यार्थाचा संदर्भ तसाच पुढील ओळीत घुसत जातो. केशवसुतांनी आपल्या निर्यमक कवितांत व सयमक सुनीतांत प्रवाही रचना उपयोजिली आहेच. येथे यमक जाऊन अर्थौघ पुढे-पुढे सरत जातो व वक्तृत्वपूर्ण पद्यबंध ( व्हर्स पॅरेग्राफ्स ) तयार होतात. सावरकर समजतात तसे हे वृत्त अक्षरांच्या संख्येवर निर्भर नाही. बंगाली निर्यमक 'पयार'च्या संदर्भामुळे त्यांना तसे वाटले असावे. 'वैनायक' ही निर्यमक 'धवलचंद्रिका' जाती आहे.

या 'वैनायक' वृत्ताचा त्यांनी विविध तऱ्हांनी उपयोग केला आहे : (१) दीर्घाक्षरप्राचुर्य, अल्पविराम, अन्तविराम, आणि धावती सार्थ ओघवती रचना यांमुळे विचाराच्या– आशयाच्या दृष्टीने सामान्य वाटणारा भागही आकर्षक झाला आहे. उदा०– 'गोमंतक' उत्तरार्ध, 'विप्रज मी शुक्रनाम०' वगैरे पद्यपरिच्छेद पाहावा; (२) कालिदासीय अनुरूप वर्णनशैलीसाठी संस्कृत समासमय शब्दसंहतींचा उपयोग; उदा०, त्याच काव्यविभागातील "पुष्पलतापादपसंकीर्ण पुराण-प्रथित" तपोवनाचे वर्णन; (३) संभाषण-संवादात्मक संदर्भात या आवर्तनी पद्यरचनेचा उपयोग त्यातील लवचिकपणामुळे अधिक सुलभतेने केला गेला आहे. याची उदाहरणे 'मूर्ति दुजी ती', 'मरणोन्मुख शय्येवर', 'गोमंतका'तले शेवटचे संभाषणात्मक परिच्छेद, आणि विशेषतः 'उःशाप'मधील 'वैनायकी' प्रयोग यांत अनेक सापडतात.

या वृत्ताची खरी महत्ता त्याचे सावरकरी पद्धतीने सावेश, साघात, वक्तृत्वपूर्ण शैलीने पठण केले असता विशेष लक्षात येते; पण या वृत्ताचे वाचन वक्तृत्वपूर्ण झाले पाहिजेच असे नाही. आधुनिक काळात काव्यगान जाऊन संभाषणात्मक धर्तीचे काव्यवाचन होऊ लागले

८. या वृत्ताची समग्र तौलनिक चर्चा स्वतः सावरकरांनी 'रानफुले' परिशिष्टात केली आहे. "समग्र सावरकरसाहित्य" काव्य-नाटक खंड, यात त्यातला महत्त्वाचा भाग आला आहे. ना. ग. जोशी यांनी 'वैनायकवृत्तविचार' ('म. सा. पत्रिका' एप्रिल १९३८), 'सावरकर-काव्याचा पद्यरचनादृष्ट्या विचार' ('सावरकर-काव्यसमालोचन' ग्रंथ), आणि मुद्रितावस्थेतील 'तुलनात्मक छंदोरचना' व मुद्रित 'मराठी छंदोरचना' यांत त्याचे साधार विश्लेषण केले आहे. डॉ. माधवराव पटवर्धनांनी 'छंदोरचने'त याचा थोडासाच विचार केला आहे.

आहे. अशा वेळी या सावरकरी वैनायक वृत्ताच्या खऱ्या शक्ती तशा वाचनानेही पटतात. मराठीत आज मिल्टनीय निर्यमक पद्धतीची रचना फारशी होतच नसल्यामुळे या बाबतीत अधिक काही प्रगती होण्याचा संभव नाही; परंतु जेव्हा कोणाला धावत्या, प्रवाही शैलीत अर्थवाहन करावयाचे असेल, तेव्हा त्याला हे वृत्त फार उपयोगी पडते यात शंका नाही.[१] मराठीत या वृत्ताचा उपयोग अन्य कोणी फारसा केल्याचे आढळत नाही.

**अन्य वृत्ते :**

सावरकरांनी अनुष्टुप व वैनायक या वृत्तांबरोबर ' अक्रूर ' गीतातील धाटणीला धरून काही काव्ये केलेली आहेत. ' सागरास ' व ' विरहोच्छ्वास ' ही त्यांची उत्कृष्ट उदाहरणे. घरगुती, व्यक्तिगत वातावरणासाठी त्या वृत्ताचा वापर योग्य ठरला आहे. 'चंद्रकान्तपतितपावन' या लोकप्रिय चालीचा त्यांच्या पोवाड्यातला उपयोग सर्वश्रुतच आहे. फटक्याच्या ' हरिभगिनी ' चालीचा वापर त्यांनी आपल्या फटकेवजा रचनात अन्वर्थकपणे केलेला आहे. ' आर्या ' वृत्तावर त्यांचे मनापासूनचे प्रेम होते. काही प्रारंभिक कविता व विशेषतः 'सप्तर्षि' हे दीर्घ विचारांकित काव्य 'आर्ये'चा समर्पक उपयोग दर्शविते. ' वैनायका 'च्या जवळची चाल 'पंचचामर' वृत्ताची. त्याचा उपयोगही सावरकरांनी 'आत्मबल' कवितेत आद्य ध्रुवपदात केला व लगेच त्याचे परिवर्तन 'धवलचंद्रिका' जातीत झाले. ह्या जातीचे निर्यमक, धावते परिच्छेद-युक्त रूप म्हणजेच 'वैनायक' वृत्त; यावरून 'वैनायका'चे मूळ 'चामरा'च्या सुरावरील चालीत आहे असे स्वाभाविकच वाटू लागते. ' अमित्राक्षर छंदा 'च्या परिचयाने त्याला नीटस रूप प्राप्त झाले. ' जगन्नाथाचा रथोत्सव ' याची चाल संमिश्र 'सुंदर यादव ' जातीसारखी आहे, म्हणजेच ती ' तरुण कुलिन गोरा हंसतमुख ' या ' शारदा ' नाटकातल्या पदासारखी आहे.

---

[१] मराठीत तशा तऱ्हेचे प्रयोग ना. ग. जोशी करीत आहेत, असे प्रा. रा. श्री. जोग यांनी " अर्वाचीन मराठी काव्य " ग्रंथात म्हटले आहे, ते खरे आहे. त्यांनी ' विश्वमानवा 'तील कथात्मक काव्यात याचा समाधानकारक उपयोग केलेला आहे. स्वतः या लेखकांनी स्वा. सावरकरांना, सन १९३७ मध्ये, ' वैनायक ' वृत्तातील ' सैतान ' ( स्वगत ) ( 'म. सा. पत्रिका' एप्रिल १९३७ ) हा, मिल्टनच्या भाषान्तराचा भाग वाचून दाखविला असता सावरकरांनी पूर्ण समाधान व आश्चर्य व्यक्त केले – आणि मिल्टनच्या 'पॅरडाइज लॉस्ट' मधला मूळ भागही ते स्वतः भाषान्तर वाचताना गुणगुणू लागले ! असे हे वृत्त त्या शैलीला जुळते आहे.

'शार्दूलविक्रीडित' वृत्त त्यांनी काही वेळा वापरले असले तरी 'माझे मृत्युपत्र'मधील वसंततिलका आणि विशेषत: 'आकांक्षा'मध्ये मंदाक्रान्ता, ही वृत्ते वैशिष्ट्यपूर्ण तऱ्हेने वापरलेली आढळतात. तसाच अन्वर्थक उपयोग 'सान्त्वन' कवितेत 'ग्रान्थिक ओवी'चा केलेला आहे. या अप्रतिम काव्याची शैली सर्वच दृष्ट्या रामदासांच्या 'संभाजीस पत्र' यातल्या शैली-सारखी तळमळीची, खळबळीची आहे.

सावरकरी छंद-प्रयोगांचे रूप थोडक्यात हे असे आहे.

## सावरकरांचे व्यक्तिमत्त्व :

सावरकरांचे व्यक्तिमत्त्व व त्याचा आविष्कारच असे वक्तृत्व अत्यंत प्रभावी होते यात संशय नाही. मोठमोठे क्रान्तिकारक त्यांच्याशी संबंध येताच त्यांच्या मताचे होत असत. अनेक तरुण मराठी कार्यकर्त्यांवरही त्यांच्या प्रभावी लेखनाची मोहिनी पडली होती. स्व. मानवेन्द्र रॉय व सुभाषचंद्र बोस हे प्रारंभी अशा तरुणांपैकीच होते. हा पुरुष जन्मला होता तोच नेतृत्व करण्यासाठी. त्याने स्वत:साठी एकच नेता ठरविला होता तो म्हणजे शिवाजीमहाराज. लोकमान्य टिळक व 'लोकमान्य' परांजपे हे स्वत:च्या आधीचे कार्यकर्ते या नात्यानेच नेते! हा माणूस स्वयंप्रज्ञ म्हणून जन्मला, स्वतंत्रपणे वाढला, स्व-अभिमानाने जगला. त्याने सारे जीवन ध्येयासाठी वाहिले होते : 'हे मातृभूमि तुजला मन वाहियेले' इत्यादी प्रतिज्ञा प्रसिद्धच आहे. आणि अशा आत्यंतिक त्यागामुळे, सहनशक्तीमुळे, स्वयंस्फूर्तीमुळे त्यांना अतीव आत्मविश्वास वाटत होता. त्या आत्मविश्वासाचा अनेक रीतींनी बाह्य आविष्कार होत होता. क्रान्तिकारक चळवळी, समाजसुधारणेची झुंबड, हिंदुत्वाचा आग्रही प्रचार, आणि या सर्वांच्या अनुषंगाने लिहिले गेलेले साहित्य, या सर्वांत तो आत्म-विश्वास मनावर ठसतो. पुढे तो स्वत:च्या 'अपूर्व'पणाच्या जाणिवेत परिवर्तन पावतो. स्वत:च्या सामर्थ्याची अत्यधिक जाणीवही निर्भय आचार व प्रभावी साहित्य यांना पोषक होते, असा इतिहासाचा निर्वाळा आहे. काही घटना निश्चित ऐतिहासिक असतात. त्यांचे मूल्यमापन करणे फारसे वैयक्तिक बनत नाही; पण काही कृती किंवा उद्गार असे असतात की ज्यांच्या-विषयीच्या प्रतिक्रिया व्यक्तिसापेक्ष असू शकतात. 'वैनायक' वृत्ताचे नाव 'वैनायक' ठेवण्यामागील स्वसामर्थ्याची जाणीव कै. माधवराव पटवर्धनांना अवास्तव व अतिरिक्त दर्पोक्तीची वाटली, व त्या मताशी अनेक टीकाकार संमत आहेत. जाहीर सभांतून व लेखना-तून त्यांनी काढलेले अनेक उद्गार ऐकणाऱ्यांना व विचारवंतांनाही दर्पयुक्त वाटले. खरे म्हणजे मृदुत्व, नम्रत्व, संयम हा सावरकरी जीवनातला वा साहित्यातला विशेष गुण नव्हेच

मुळी. त्या तऱ्हेचा स्वाभिमानी व आत्मविश्वासी पुरुष जीवनात गौण स्थान पत्करून वर्तणे शक्यच नव्हते. त्यामुळेच त्यांनी हिंदुमहासभेच्या व्यासपीठाची निवड केली व तेथले अनभिषिक्त सम्राट्पद मिळविले.

सावरकरांची धारणाशक्ती व स्मरणशक्ती विलक्षण होती. त्यांची महाविद्यालयीन कारकीर्द व्यावहारिक अर्थाने 'तेजस्वी'–brilliant–न होण्याचे कारणच हे होते की त्यांनी आपले शक्तिसर्वस्व देशाच्यासाठी अर्पण केले होते; पण त्यांची प्राचीन इतिहास व साहित्य यांची समज विस्मयकारक होती. स्मरणशक्तीबद्दल तर काय लिहावे? कालिदासादी संस्कृत कवी, मोरोपंतांसारखे मराठी कवी, आणि मिल्टन-बायरन-शेली-सारखे इंग्रजी कवी– यांच्या काव्यांतील उताऱ्याच्या उतारे त्यांना मुखोद्गत होते. आपली स्वतःची काव्येही त्यांनी अंदमानात रचून मुखोद्गत केली होती.

सर्वच क्रान्तिकारक पुढाऱ्यांप्रमाणे ते आवेगशील होते; क्वचित विकारवशही बनत. वीराला साजेल असे रसिकत्व त्यांच्यात होते. "The brave alone deserves the fair" या न्यायाने त्यांना पहिल्या बाजीरावाचे कौतुक वाटे ते त्यांच्या तत्सम वृत्तीमुळेही असावे. त्यांचा दिलदारपणा असाच वीराला साजेसा होता; आणि अत्यंत खाजगी बाबतीत ते कोमल मनाचेही बनत. रामचंद्रासारखे त्यांचे मन व जीवन होते.– ते कर्तव्याच्या वेदीवर अर्पित होते. तरीही ते वज्राहून कठोर होई तसेच फुलाहून मऊ होऊ शकत असे. या दोन्ही वृत्ती त्यांच्या मनात होत्या, आणि त्याच वृत्तींचे प्रतीकात्मक व रूपकात्मक काव्यमय दर्शन आपणांस 'मूर्ति दुजी ती' या कवितेत होते; पण अखेरीस स्वातंत्र्यवीरांना 'दुसरी मूर्ती'च जागृत व्हावयास हवी होती. तेव्हा त्यांच्या काव्यात एकंदरीने 'दुजी मूर्ती'च आपले दर्शन घडवीत असल्यामुळे त्यांच्या निवडक कवितांच्या संग्रहाचे—

## 'मूर्ति दुजी ती'

हे शीर्षक अनुरूप आणि अन्वर्थक ठरावे;–सावरकरांच्या प्रतिभेचे व व्यक्तित्वाचे खरे दर्शन त्यातच घडते.

१ जून १९६७
बडोदे

—ना. ग. जोशी

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | पवनलीला | १ |
| २ | विश्वात आजवरि शाश्वत काय झालें ? | ३ |
| ३ | सिंहगडचा पोवाडा | ६ |
| ४ | तारकांस पाहून | १६ |
| ५ | प्रभाकरास | २१ |
| ६ | सागरास | २४ |
| ७ | सांत्वन | २६ |
| ८ | माझें मृत्युपुत्र | २८ |
| ९ | आत्मबल | ३३ |
| १० | सायंघंटा | ३४ |
| ११ | मूर्ति दुजी ती | ४२ |
| १२ | हलाहल बिंदु | ६१ |
| १३ | जगन्नाथाचा रथोत्सव | ६२ |
| १४ | सूत्रधारास | ६४ |
| १५ | अज्ञेयाचें रुद्धद्वार | ६५ |
| १६ | मरणोन्मुख शय्येवर | ६८ |
| १७ | विरहोच्छ्वास ! | ७८ |
| १८ | कमला | १०० |
| १९ | गोमांतक | ११५ |
| २० | पद | १२४ |
| २१ | बाजीप्रभूचा जयजयकार | १३० |
| २२ | श्रीशिवाजीमहाराजांची आरती | १३३ |
| २३ | अनंताची आरती | १३४ |
| | टीपा | १३५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

## पवनलीला

( श्लोक )

होतो पहात बसलो सुवयस्य-वाट ।
राजे पुढे युवति-युक्त सुरम्य घाट ॥
तों सूटला सुरभि दक्षिण मंदवात ।
मद् दृष्टिचेसह घुसे युवतीजनांत ॥ १ ॥

लज्जीत पाहोनि मुखास अिंदु ।
तीं कर्ण मोत्यें मुखघर्म-बिंदू ॥
अशी धुवी वस्त्र सुशोभनास्या ।
ज्योत्स्नेसमा हांसत मंद हास्या ॥ २ ॥

घर्मांचिया सुंदर बिंदु पंक्ती ।
भालावरी निश्चल शोभताती ॥
दे चालना वायु जअीं तयांसी ।
बिंदीच वाटे डुलते मनासी ॥ ३ ॥

सौंदर्य-खाणीवरली भुजंगी ।
वेणी, मणी पुष्पचि रक्तरंगी ॥
शंकोनि वायू भिअुनी पळाला ।
निर्जीव मागोनि बघोनि ठेला ॥ ४ ॥

ओलें सुटे, फाकत देहकान्ति ।
कोणी सती नेसत वस्त्र होती ॥
वाहूनि नेण्या वसनासि तीच्या ।
सदंबराला शिवला सतीच्या ॥ ५ ॥

१९२९७
(स्थळ प्रत)

कोपें भरे, धाष्टर्य बघोनि साची ।
ज्वालाचि कीं कोपहुताशनाची ॥
जओं तया तीव्र कटाक्ष मारी ।
जाळील वाटे जगतीच सारी ॥ ६ ॥

वायू थरारे, भयभीत तीच्या ।
लागे पदाब्जासि महासतीच्या ॥
सर्वांचि तो थोर जवें पळाला ।
'विनायका 'चाहि वयस्य आला ॥ ७ ॥

— नाशिक, १९०१

# विश्वात आजवरि शाश्वत काय झालें ?

पौर्वात्य खंड अवघें जित यत्प्रतापें ।
दारिद्र्य आणि भय कांपति ज्या प्रतापें ॥
नाशासि पारसिक[1] तेंहि पळात गेलें ।
विश्वात आजवरि शाश्वत काय झालें ? ॥ १ ॥

तें जिंकि पारसिक, दे जगता दरातें, ।
जें दिग्जयी बल तुझेंहि शिकंदरा, तें ॥
ध्वंसीत रोम[2] तव राजपुरी रिघालें ।
विश्वात आजवरि शाश्वत काय झालें ? ॥ २ ॥

साम्राज्य विस्तृत अनंत असेंचि साचें ।
त्याही महाप्रथित रोमकपत्तनाचें ॥
हूणें[3] हणोनि घण चूर्णविचूर्ण केलें ।
विश्वात आजवरि शाश्वत काय झालें ? ॥ ३ ॥

हा उन्नती-अवनतीस समुद्र जातो ।
भास्वान् रवीहि अुदयास्त अखंड घेतो ॥
अुत्कर्ष आणि अपकर्ष समान ठेले ।
विश्वात आजवरि शाश्वत काय झालें ? ॥ ४ ॥

जे मत्त फारचि बलान्वित गर्ववाही ।
अुद्विग्न-मानस अुदासहि जे तयांही ॥
हें पाहिजे स्वमनिं संतत चिंतियेलें ।
विश्वात आजवरि शाश्वत काय झालें ? ॥ ५ ॥

— पुणें, १९०२

# स्वतंत्रतेचें स्तोत्र

जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥ ध्रु. ॥

राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची
स्वतंत्रते भगवती ! श्रीमती राज्ञी तूं त्यांची
परवशतेच्या नभांत तूंची आकाशीं होशी
स्वतंत्रते भगवती ! चांदणी चमचम लखलखशी ॥

गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली
स्वतंत्रते भगवती ! तूंच जी विलसतसे लाली
तू सूर्याचें तेज उदधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवती ! अन्यथा ग्रहण[1] नष्ट तेंची ॥

मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपें तुलाच वेदान्ती
स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रह्म वदती
जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होतें ॥

हे अधम-रक्त-रंजिते । सुजन-पूजिते । श्रीस्वतंत्रते

तुजसाठि मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण

भरतभूमिला दृढालिंगना कधि देशिल वरदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥

हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
        क्रीडा तेथे करण्याचा का तुला वीट आला ?

होय आरसा अप्सरसांना सरसे करण्याला
        सुधाधवल जान्हवीस्रोत तो कां गे त्वां त्यजिला ? ॥

स्वतंत्रते ! या सुवर्णभूमिंत कमती काय तुला ?
        कोहिनूरचें पुष्प रोज घे ताजें वेणीला
ही सकल-श्री-संयुता । आमुची माता । भारती असता

        कां तुवा ढकलुनी दिधली ?
        पूर्वीची ममता सरली
        परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, कां तूं त्यजिलें अुत्तर याचें दे !
        स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥

— पुणें, १९०३

# सिंहगडाचा पोवाडा

## १

धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यचि तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ध्रु. ॥

देशामाजी कहर गुजरला पारतंत्र्य-जहरें ।
हलाहलहि ह्या परदास्याहुनि गळा गाठिता बरें ॥ १ ॥

गोमातांची मान आणि ती शिखा ब्राह्मणांची ।
परदास्याची सुरी बंधुनो चिरी अेकदाची ॥ २ ॥

देश हिंदुचा हाथ तयाचा मालक म्लेंछ ठरे ।
परि परमेशा फार दिवस हें रुचेल केविं बरें ॥ ३ ॥

चाल— मग आर्य देशतारणा । अधममारणा । कराया रणा ।
परदास्यरात्रि नाशाला ।
शिवनेरीं श्रीमान् आला ।
स्वातंत्र्यसूर्य उदयाला ।
त्या सूर्याचा किरण रणांगणि तळपे तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

## २

ठायी ठायी वीर मावळा सरसावुनि भाला ।
रामदासमत छत्रपतींचा अनुयायी झाला ॥ १ ॥

स्वातंत्र्य-श्रीतोरण तोरणगड अवघड पडला ।
भगवा झेंडा त्या भाल्यासह सरसर वरि चढला ॥ २ ॥

प्रतापगडिची शान्त कराया स्वतंत्रता देवी ।
पुढती फाडुनि अफझूल्याला भग तो मग ठेवी ॥ ३ ॥

चाल— ते धन्य मराठे गडी । घेति रणिं उडी । करुनि तातडी ।

देशार्थ मृत्युही वरिला ।
शाहिस्ता चरचर चिरिला ।
गनिमांनि वचक बहु धरिला ।

झुरती रिपु परि अजुनि नांदतो सिंहगडामाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

## ३

जरा ढिलाई पाहुनि वदली जिजा शिवाजीला ।
गड सर केल्याविण वरणें ना अन्न शपथ तुजला ॥ १ ॥

परके बाला भूमातेला ते लाथा देतां ।
अन्न न गमतें गोमांसाचा घासचि तो घेतां ॥ २ ॥

गुलामगिरिची बेडी पायीं तशीच धरिता ना ?
गुलामगिरिच्या नरकामाजी तसेच पचता ना ? ॥ ३ ॥

चाल— निर्जीव अन्न कां रुचे । उदर शत्रुचे । फोड तेथिचें ॥

आतड्यानि भूक शमवावी ।
रक्तानि भूक शमवावी ।
मांसानि भूक शमवावी ।

घ्या गड कडकड चावुनि अधरा द्यावा ये काजीं ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

## ४

धन्या माता जिजा तिलाची शिवबा सुत साजे।
स्वतंत्र झाल्यावीण सुताला अन्नहि दे ना जे ॥ १ ॥
स्वातंत्र्याच्या सुखनीमाजी जन्म स्वतंत्रांचे।
गुलामगिरिच्या उकिरड्यावरी गुलाम निपजाचे ॥ २ ॥
श्वानहि भरितें पोट बापुडें चघळुनिया तुकडे।
शेणामाजी बांधुनि वाडे नांदति शेणकिडे ॥ ३ ॥
चाल— संसार असा जरि करी। मनुजता तरी। कशासी धरी।
हो तुच्छ किडाचि न कां तो।
जो गुलाम असुनी हसतो।
परदास्यी स्वस्थचि बसतो।
धिक् धिक् वदला श्री शिव घेउनि गड राखू बाजी।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

## ५

प्रभात झाली वाद्यें झडलीं मुहूर्त लग्नाचा।
बोहल्यावरी उभा राहिला सुत तानाजीचा ॥ १ ॥
घटिका-पात्रें मोजुनि द्विजगण शेवटल्या घटिला।
दंगल मोडुनि मंगल व्हाया सावधान वदला ॥ २ ॥
वदला द्विज परि कुणि भेटाया तानाजिस आला।
आला तों तो तलवारींनी मंडप खणखणला ॥ ३ ॥
चाल— तो हर हर एकचि झाला। चमकला भाला। वदति रे चला।
शिवराज दूत पातले।

हें लग्न राहुं द्या भलें।
देशार्थ जनन आपुलें।
धर्मार्थ जतन आपुलें।

लहान-मोठा निघे मऱ्हाठा पुढती तानाजी।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी॥ ४॥

६

परमात्म्याशी जीवात्म्याची तन्मयता झाली।
वायुकुमर कीं रघुविरचरणीं मिठी पुन्हा घाली॥ १॥

अरुणचि कीं श्रीजगन्मित्र वर सूर्या आलिंगी।
आलिंगी कीं तानाजी श्री शिवरायालागी॥ २॥

भेट जाहली मसलत बसली राया धाडि मला।
प्राणहि देअिन घेअिन गड परि तानाजी वदला॥ ३॥

चाल— हें पर्व स्वातंत्र्याचें। शत्रुरुधिराचें। स्नान मज साचें।

घडु द्यावें हो शिवराया।
देशार्थ पडो ह्या काया।
धर्मार्थ पडो ह्या काया।
जाअील ना तरी वाया।

अखेर निसटे शिवहस्तांतुनि तीरचि तानाजी।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी॥ ४॥

७

शिवरायाच्या तीरा जा बा तानाजी वीरा।
वीरांमाजी हो रणगाजी अरि मारुनि धीरा॥ १॥

सिंहगडावरि तुझी आर्यभू फोडी हंबरडे ।
गुलामगिरिचे खून पाडण्या जा जा जा तिकडे ॥ २ ॥

देवदूत हो स्वातंत्र्याच्या पवित्र कार्याला ।
जातो आहे अमुचा ताना रक्षण व्हा त्याला ॥ ३ ॥

चाल—हे मंगल तारागण हो । अप्सरा जन हो । गडावरि जा हो ।

तानाजि लढाया येतो ।
अरि फार, अेकलाचि तो ।
परि धीर पुढेची घुसतो ।

त्या धीरावरि वर्षा अमृत आणि फुलें ताजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

## ८

मध्यरात्रिची वेळ शान्त परि भयदायी घोर ।
गडाखालच्या गर्द झाडिमधि घन अंधःकार ॥ १ ॥

रात्रीलाही निद्रा लागे किर्र शब्द नुमटे ।
करवंदीच्या एका जाळित तों ध्वनि घोर उठे ॥ २ ॥

अरे मारिती पूर्वज तुमचे स्वर्गातुनि हाका ।
अहो मराठे कान देअुनी नीट सर्व अैका ॥ ३ ॥

आअी तुमची ही भूमाता पाठीवरि तीच्या ।
अुडतो चाबुक फुटल्या ना रे धारा रक्ताच्या ॥ ४ ॥

त्या रक्ताच्या अेका थेंबासाठी लक्ष शिरा ।
रिपुच्या कुटुनी मलम लावणें आअीच्या शरिरा ॥ ५ ॥

अस्सल जो जो बीज मराठा तो तो मज व्हावा ।
त्याने येउनि देउनि प्राणा मजसह गड घ्यावा ॥ ६ ॥

चाल— बाकिचे पंदहो पळा । गृहांप्रति वळा । बचाउनि गळा ।

गळसरी त्यात घालणें ।
तें योग्य तुम्हांला लेणें ।
तलवार करीं ना घेणें ।

हरहर गर्जुनि सिंह जाळितुनि चवताळुनि येजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ७ ॥

९

दरड उभट बहु चढणें दुर्घट घोरपडीलाही ।
म्हणुनि पहारा जिथें गडावरि मुळि नव्हता काही ॥ १ ॥

साधुनि संधी ही तानाजी तिथे नीट आला ।
सज्ज चढाया, नव्हे हवेमधि उडण्याला झाला ॥ २ ॥

कुणि गुणगुणला पाय घसरता अहा काय होओ ।
वदे शूर देशार्थ मरोनी स्वर्गा तरि जाओ ॥ ३ ॥

चाल— यशवंती सरसर चढता । हर्ष हो चित्ता । सोल घे हाता ।

तानाजी चढु लागले ।
सद्भाग्य चढू लागले ।
स्वातंत्र्य चढू लागले ।

सांभाळी रे म्लेंच्छा आला आला तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

## १०

अेकामागुनि अेक मराठा सरसर वरि चढला ।
सहस्रावरी असुनीहि रिपू चढविति ते हल्ला ॥ १ ॥

कोण कोठुनी किती आणखी कसे कुठे लढती ।
नकळे अंधारी रिपु अपसामधि झुंझुनि मरती ॥ २ ॥

खाली वरती, मागे पुढती आजूबाजूंनी ।
सैरावैरा पळता पाडिति भाला भोसकुनी ॥ ३ ॥

चाल—तो धन्य मराठा गडी । शत्रुचीं मढीं । हजारो पाडी ।

तुडवीत चिखल मांसाचा ।
पोहूनि पूर रक्ताचा ।
घे मार करित ये साचा ।

कल्याणाचे दार धडाडे । झाली रे बाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

## ११

बाजी झाली परि तो आहे कोठे तानाजी ।
मारित हाणित छाटित रमला रणरंगामाजी ॥ १ ॥

अुदयखान तो दिसला धरिला घे घे मार उठे ।
झुंज झुंजता नजरा फिरल्या गर्जे सिंह पुढे ॥ २ ॥

" सह्याद्रीच्या वाघा शेळी अुदयखान खाशी ।
खान, आपुल्या बापा म्हणविशि मी रजपुतवंशी ॥ ३ ॥

धिक् धिक् नीचा लाविशि वंशा लाज रजपुतांच्या ।
श्रीरामाच्या श्रीकृष्णाच्या प्रतापसिंहाच्या ॥ ४ ॥

मुसलमान तो बाप तुझा का लढशी आम्हांशी ।
मातृभूमिला मुक्त कराया जे झटती त्यांशी " ॥ ५ ॥

बोलुनि पुनरपि तुटोनि पडला जरि तो श्रमलेला ।
अुदयभानुचा वार मर्मिचा अवचित तो बसला ॥ ६ ॥

चाल— मूर्छना अहा पातली । क्षणाभीतरी । वीररसशाली ।

तानाजी खाली येतो ।
हा धर्ममेरु अुन्मळतो ।
शिवकरिचा भाला गळतो ।

भूमातेच्या अंकावरती पहुडे तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ७ ॥

## १२

पडता ताना आणि मराठे बघुनी हटताना ।
सूर्याजीची सिंहगर्जना भय देते कर्णा ॥ १ ॥

अरे, चालला कोठे सांगा सर्व मराठे हो ।
भाला ठेवा भरा बांगड्या मग पुढती जाहो ! ॥ २ ॥

जाअु अिच्छिता काय धरोनी आल्या दोराला ।
अहो षंढ तो दोर मघाशी लढोनिया मेला ॥ ३ ॥

बाप मरोनी पडला तुमचा येथे लढताना !
परत जाअुनी अवश्य नरकी ढकला पितरांना ॥ ४ ॥

चाल—धिक्कार शब्द अूठले । पुन्हा परतले । मराठी भाले ।

घनघोर युद्ध मातलें ।
वीरांसि वीर ते भिडले ।
देशार्थ मराठा लढे ।
धर्मार्थ मराठा लढे ।

त्यांना घुटके वीररसाचे स्वतंत्रता पाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ५ ॥

## १३

अरे धरा तो मातृघातकी देशघातकी हो ।
चला चला रे त्या ठायाला अन्य विषय राहो ॥ १ ॥

सर्व मराठा लोटे तिकडे घ्याया सूडाला ।
उदयभानु परि आधिच कोणी नरकी पाठविला ॥ २ ॥

त्याच्या रक्तीं भिजवुनि फडकें केला झेंडा तो ।
स्वातंत्र्याचा अमूर्त तो ध्वज अजुनि तिथे डुलतो ॥ ३ ॥

चाल—तानाजिकडे जन वळे । दाटले गळे । वाहती जळें ।

तानाजि काहिसा उठला ।
जय पाहुनि हरहर केला ।
देशार्थ मरे मी वदला ।
धर्मार्थ मरे मी वदला ।

मागुति पडला ! आता कैचा अुठतो तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

## १४

मग त्या गडची भूमी ठेवी तानाजिस उदरीं ।
तेव्हापासुनि रत्नाकर बहु तीचा द्वेष करी ॥ १ ॥

स्वतंत्रतेच्या रणात लढता स्वतंत्रतेसाठी ।
त्या पक्षाचा कैवारी श्री मुरहर जगजेठी ॥ २ ॥

धन्य मराठे पुनीत झाले अरिरुधिरस्नानें ।
आणि विनायक त्यांच्या निर्मल यशःसुधापानें ॥ ३ ॥

असो समाप्ती छत्रपतींच्या सरस्वती माजी ।
गड आला परि सिंह हरपला अमुचा तानाजी ॥ ४ ॥

धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यचि तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ५ ॥

## तारकांस पाहून

सुनील नभ हें, सुंदर नभ हें, नभ हें अतल अहा
सुनील सागर, सुंदर सागर, सागर अतलचि हा
नक्षत्रांहीं तारांकित हे नभ चमचम हासे
प्रतिबिंबांहीं तसा सागरहि तारांकित भासे
नुमजे लागे कुठे नभ कुठे जलसीमा होओी
नभात जल तें, जलात नभ तें संगमुनी जाओी
खरा कोणता सागर यांतुनि वरती कीं खाली
खरें तसें आकाश कोणतें, गुंग मती झाली
आकाशीचे तारे सागरि प्रतिबिंबित होती
किंवा आकाशी हे बिंबति सागरिचे मोती
किंवा आकाशचि हें सगळें, की, सागर सगळा
भवसागर बोलती पुराणीं प्रथित ऋषी ज्याला ! ॥ १ ॥

*　　*　　*

हे चांदणि ! सुखशीतल गमसी तशीच असशी ना
आगचि लागो लोळ आगिचा तुजसी वदल्यांना
विमल विरल मेघांची दुलओी ओढुनि निजलीसे
अशा अप्सरेचिया अनावृत वदनासम विलसे
आल्हादक किति चंद्रबिंब हें नंदसुधा झरतें
फुटो भिंग तें भिकार त्या जें मसणासम करतें
चंद्र चांदण्या असेंच अंतर मापुनि देवाने
खचल्या नभिं नी नयनीं काचा सुललित बेताने

त्यांचें रिझवो रूप जना कीं आल्हादक कोळें
फुटोत ते त्या विद्रुप करिते दुर्बिणिचे डोळे ॥ २ ॥

* * *

कथिति ज्योतिषी तसे आगिचे लोळ कुणी तारे
असतिल दुसरे, नव्हेत हे, हे अमृत-बिंदु सारे !
कीं जैं असुरां-सुरांमधे क्षीराब्धि-मथनकाली
अमृतकलश वरि येता ओढाताण सबळ झाली
ओढाताणित अितस्ततः त्या अमृत-बिंदु गळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले
कीं बघुनी अप्सरो–गणें हीं वसुधेवरि खाली
चमेलि जाअी, जुअी, मोगरा मालतिही फुलली
त्यांच्या नंदन-वनिंहि असावीं अैशीं काम्य फुलें
यास्तव पेरुनि देति अप्सरा हास्य नभीं अपुलें
हास्य-लते सुरसुहासिनींच्या आलीं ऋतुंत फुलें
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले
थवे काजव्यांचे कीं नंदनवनिंच्या चकचकले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले !
सुनील शालूवरि मायेच्या लकलकती टिकले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले !
सुवर्ण-गौरा-गौरी श्रीहर लीलारत झाले
थाप पडे तों द्वारीं श्रीहरि भेटाया आले
नग्ना लगबग गिरिजा धावे सावरु शालूला
हिसका बसुनी हार गळ्यातिल तटकन तो तुटला

त्या हारातिल मोतीं सैरावैरा ओघळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले !

दशाननें पळवूनि जानकी नभःपथें नेली
अश्रुबिंदु जे देवी टपटप ढाळित त्या काली
तेचि राहिले असे चकाकत जाणो दिव्यबलें
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले !

नरकपतीचा हल्ला आला चितोडनगराला
देवांनाही स्वर्गि जलदिने वर्दी द्यायाला
सिद्धाग्नीतुनि फर्कन ज्वाला-लोळ नभीं उठती !
चितोडगडवासिनी देवि तो त्यावरि आरुढती
ज्वालारूढा देवि दुरुनि त्या चमकति तेजोबळें
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले !

आकाशाच्या ग्रंथ-संग्रहालयासि अर्पियला
कालें ग्रंथ प्रचंड विश्वेतिहास जो लिहिला
रौप्यमुद्रिकांकित तद्भागां अनुक्रमे रचिलें
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले

प्रभुविरचित नव नाटक मायाविजय जगद्रंगी
अभिनयिले जाताच सुरांच्या प्रेक्षक अर्धांगी
नाट्यालयिच्या नभातल्या या सज्जातुनि साऱ्या
चमकत चमकत डोकावूनी जैं बघत्या झाल्या
वदनमंडलें देवींची त्या लुकलुकता भुलले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले !

कामव्याकुल शंभु लागला भिल्लिणिचे पाठी
 पुराणींच ही कथा, कथींनचि मी कुठली खोटी
नाचत निसटे माया भिल्लिण तोही तिजमागे
 कामव्याकुल, आकाशाच्या अंगणात लागे
टपकत संचितवीर्य प्रभुचे बिंदु बिंदु गेले
 तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले ॥ ३ ॥

*   *   *

परी सागरा, सांग काय ही लटपट ? ही कुठली
 चटकचांदणी कवण ? नभांतुनि निसटुनिया विपलीं
रात्रीं अैशा अशी अेकटी लगबगिने घुसली
 तुझिया जलमंदिरीं सर्वेची दिसेनाशि झाली
लाजु नको, जा भोगविलासा कामोत्सुक तूं, ती
 तुझिया शतजलतरंगमंजुल सुखा साथ देती
प्रेमाची चांदणी परंतू ज्यांची दूर वसे
 किती प्रवासी तळमळती बा, तुझ्या निकट अैसे
तुझा तुझ्या चांदणिशी पाहुनि प्रिय संगम साचा
 तव मत्सर ना, परी छळी त्या वियोग दयितांचा ॥ ४ ॥

*   *   *

हे ताऱ्यांनो, जाणतसा का कुठुनि तुम्ही आला ?
 कुठें चालला कवण हेतु ह्या असे प्रवासाला ?
कवण हेतु तो ज्यास्तव तुम्ही गगनगामि व्हावें
 सूर्यापासुनि अितकें दूरचि भूनें विचरावें
गजराजाहुनि फुलपांखरुची सुरंग शोभावें
 बीज फुलावें, फुलुनि सुकावें, सुकुनि बीज व्हावें ?

ल्हान-मोठीं घटिका-यंत्रीं बहुविध यंत्रें तीं
स्व-स्वगतीने परि ऐक्याची साध्यास्तव फिरती
असा कोणता हेतु जयाच्या सिद्धीस्तव साची
विश्वाच्या या चक्रें फिरती भव्य घड्याळाचीं
अम्हां कळेना म्हणूनि पुसतों तुम्हां कळे का तें
का न कळत वर्तावें जागति अितर्केंचि ज्ञाते ? ॥ ५ ॥

— समुद्रमार्ग, १९०६

# प्रभाकरास

( चाल : चंद्रकान्त राजाची० )

परिसुनि यौवन-लतिकेला तूं पहिलें फूल फुले
तनया, तनु थरथरली स्नेहें नेत्र स्निग्ध झाले ॥
परंतु अमुचें अभिनव यौवन, त्यांत पितृत्वाचा
प्रथम समागम, गमुनी लज्जा-विनय मना साचा ॥
नवप्रसव तव जननी मजला दावित असतांही
गुरुजन-मर्यादेने म्यां बहु पाहियलें नाही ॥
चोरुनि घ्यावें कधी कधी तव अर्ध चुंबनातें
सुखोत्सवें तव आपण होउनि नयन झाकती ते ॥
प्रभ्या प्रियकरा, होतासी बहु दिवस असा सखया
अमूर्त तू कल्पना अेक मधु-मधुर अशी हृदया ॥ १ ॥

शीघ्रचि सोडुनि अंक जननिचा दुडुदुडु धावत तू
घरात फिरता डोळे भरुनी पाहिन हा हेतू ॥
धरुनि मनी मी अुत्सुक असता विदेश-गमनाचें
प्रभ्या प्रियकरा ! कार्य अुदेलें प्रियजन-विरहाचें ॥
मातृस्तनपानांत दंग तू असताना तुजला
तव जननीसह चुंबुनि केलें विदेश-गमनाला ॥
अंतरता मज प्रीति-तरु-लता खेद अती झाला
सत्य सांगतां, परी न गमला बहु तव विरह मला ॥
देशि जसा होतास विदेशी सन्निधची सखया
अमूर्त तू कल्पना अेक मधु-मधुर अशी हृदया ॥ २ ॥

अतनु मूर्ति तव लटकुनि कितिदां हृदयाशी निजली
हसली कितिदा दिव्याशेने कितिदा ती सजली ॥
धर्म-कार्य-सिद्ध्यर्थ धाडुनी रणीं खड्गपाणि
बाल बाल-झुंजार आपुले श्रीगोविंदांनी ॥
हुतात्म होता हसत पाहिले सुकीर्ति परिखुनि ती
त्यांहि कितीदा रणी पाहिली अमूर्त तव मूर्ती ॥
अेके समयी प्रभ्या प्रियाळा विषम वृत्त आलें
वसंतविव्हल लतातरू ते विव्हळ बहु झाले ॥
मृत्यु-वंचकें हरुनि मूर्ति तव वंचित त्या केलें
परी सत्य सांगतां न काही हरूनि मम नेलें ॥
पूर्वि जसा होतास असिस तू नंतरही सखया
अमूर्त तू कल्पना अेक मधु-मधुर अशी हृदया ॥ ३ ॥

हृदय जोवरी प्रभ्या प्रियाळा, असाचि तिथ राहे
पूर्वार्जित मद्-हृदय गृह असे तुझेंचि तनया हें ॥
परि जैं वारे क्रुद्ध वर्षती मेघ-शिला-धारा
सुरक्षित न हें गमे गृह सख्या तुझिया आधारा ॥
महाराष्ट्र-वाक्सुंदरीसवें श्रीगोविंदातें
विहार जेथे अखंड सुंदर-मणिमय मंदिर तें ॥
तुला गेह हें यास्तव अर्पी सरस्वती स्वकरें
जिथे क्रान्तिचे शिवू न शकती अग्नि-मेघ-वारे ॥
अक्षर-मंदिरि नांद सदोदित सलील बाळा, या
अमूर्त तू कल्पना अेक मधु-मधुर अशी हृदया ॥ ४ ॥

— लंडन, १९०९

पश्चाल्लेख

जिथे न शकती शिवू भासले अग्नि-मेघ-वारे
तिथेहि शकले शिवू क्रान्तिचे अग्निमेघ वरे ॥

— अंदमान, १९१२

# सागरास

( चाल : अजि अक्रुर हा )

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला
भूमातेच्या चरणतला तुज धूतां । मीं तिला पाहिला होता
मज वदलासी अन्य देशिं चल जाऊं । सृष्टिची विविधता पाहू
तअिं जननी-हृद् विरहशंकितहि झालें । परि तुवां वचन तिज दिधलें
मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठि वाहीन । त्वरित या परत आणीन

विश्वसलों या तव वचनीं । मी
जगदनुभव-योगे बनुनी । मी
तव अधिक शक्त उद्धरणीं । मी

येअीन त्वरें कथुन सोडिलें तिजला । सागरा, प्राण तळमळला ॥ १ ॥

शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं । ही फसगत झाली तैशी
भूविरह कसा सतत साहु यापुढती । दशदिशा तमोमय होती
गुण-सुमनें मी वेचियली या भावें । कीं तिने सुगंधा घ्यावें
जरि अुद्धरणीं व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा

ती आम्रवृक्षवत्सलता । रे
नवकुसुमयुता त्या सुलता । रे
तो बाल गुलाबहि आता । रे

फुलबाग मला हाय पारखा झाला । सागरा, प्राण तळमळला ॥ २ ॥

नभिं नक्षत्रें बहुत अेक परि प्यारा । मज भरतभूमिचा तारा
प्रासाद अिथे भव्य परी मज भारी । आअिची झोपडी प्यारी
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा । वनवास तिच्या जरि वनिंचा

भुलविणें व्यर्थ हें आता । रे
बहु जिवलग गमतें चित्ता । रे
तुज सरित्पते ! जी सरिता । रे
तद्विरहाची शपथ घालितो तुजला । सागरा, प्राण तळमळला ॥ ३ ॥

या फेन-मिषें हससि निर्दया कैसा । कां वचन भंगिसी ऐसा ?
त्वत्स्वामित्वा सांप्रत जी मिरवीते । भिउनि कां आंग्लभूमीतें ?
मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी । मज विवासनातें देशी
तरि आंग्लभूमि-भयभीता । रे
अबला न माझिही माता । रे
कथिल हें अगस्तिस आता । रे
जो आचमनी एक पळीं तुज प्याला । सागरा, प्राण तळमळला ॥ ४ ॥

—ब्रायटन, १९०९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र
अनुक्रमांक ७८६६८ विभाग ...... मराठी
दिनांक २००९ ग्रंथ क्रमांक ७८१३/ (०)

# सान्त्वन

( ओवी )

१

जयासी तुवां प्रतिपाळिलें । मातेचें स्मरण होऊं न दिलें
श्रीमती वहिनी वत्सले । बंधु तुझा तो तुज नमीं ॥

आशीर्वाद पत्र पावलें । जें लिहिलें तें ध्यानी आलें
मानस प्रमुदित झालें । धन्यता वाटली अुदंड ॥

धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चये अीश्वरी अंश
की रामसेवा-पुण्य-लेश । आपुल्या भाग्यीं लाधला ॥

२

अनेक फुलें फुलती । फुलोनिया सुकोन जाती
कोणी त्यांची महती गणती । ठेविली असे ? ॥

परी जें गजेंद्रशुंडेनें उपटिलें । श्रीहरीसाठी मेलें
कमलफूल तें अमर ठेलें । मोक्षदातें पावन ॥

त्या पुण्य गजेन्द्रासमची । मुमुक्षु-स्थिती भारतीची
करुणारवें ती याची । अिंदीवरश्यामा श्रीरामा ॥

स्वोद्यानी तिनें यावें । आपुल्या फुलास भुलावें
खुडोनिया अर्पण करावें । श्रीरामचरणां ॥

धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चयें अीश्वरी अंश
श्रीराम-सेवा-पुण्य-लेश । आपल्या भाग्यीं लाधला ॥

## ३

अशींच सर्व फुलें खुडावीं । श्रीरामचरणीं अर्पण व्हावी
काही सार्थकता घडावी । या नश्वर देहाची ॥

अमर होय ती वंशलता । निर्वंश जीचा देवाकरिता
दिगंती पसरे सुगंधता । लोकहितपरिमलाची ॥

सुकुमार आमुच्या अनंत फुलां । गुंफोनि करा हो सुमन-माला
नवरात्रीच्या नवकाला । मातृभूमी वत्सले ॥

अेकदा नवरात्र संपली । नवमाला पूर्ण झाली
कुलदेवी प्रकटेल काली । विजयालक्ष्मी पावन ॥

## ४

तूं धैर्याची असशी मूर्ति । माझे वहिनी, माझे स्फूर्ति
रामसेवाव्रताची पूर्ति । ब्रीद तुझे आधीच ॥

महत्कार्याचें कंकण धरिलें । आता महत्तमत्व पाहिजे बाणलें
अैसें वर्तन पाहिजे केलें । की जें पसंत पडलें संतांना ॥

अनेक पूर्वज ऋषीश्वर । अजात वंशजांचे संभार
‘ साधु साधु ’ गर्जतील । ऐसें वर्तणें या काला ॥

— लंडन, १९०९

# माझें मृत्युपत्र

( वसंततिलका )

१

वैशाखिचा कुमुदनाथ नभात हासे
        यच्चंद्रिका धवल सौधतलीं विलासे
घाली स्वयें जल जिला प्रिय बाळ लोभे
        जाओी फुले, परिमलें सुमनांत शोभे        ॥ १ ॥

आले घरी सकल आप्त-सुहृद् जिवाचे
        आनंदमग्न कुल गोकुल काय साचें
आदर्श दीप्ति-शुचिता-धृति-यौवनांचें
        पाहूनि जें तरुण मंडळ, कीर्ति नाचे        ॥ २ ॥

प्रेमें हृदें विकसलीं नव यौवनाच्या
        गंधें सुवासित उदात्त सुसंस्कृतीच्या
दिव्य लता तरुंसि जें गृह बाग झाला
        ज्या पौर हर्षित वदे जन ' धर्म-शाला '        ॥ ३ ॥

सैंपाक त्वां निजकरें कुशलें करावा
        प्रेमें तुझ्या अधिकची सु-रसाल व्हावा
संवाद सर्व मिळुनी करिता नितान्त
        जेवावयासि बसलों जधि चांदण्यांत        ॥ ४ ॥

श्रीरामचंद्र-वनवास-कथा रसाला
        की केवि देश अिटली रिपुमुक्त झाला

तानाजिचा समरधीर तसा पवाडा
गावा चितोरगड वा शनवारवाडा ॥ ५ ॥

झाली कशी प्रियकरा अपुली अनाथा
दुर्दास्यखिन्न शरभिन्न विपन्न माता
शोकें विवंचुनि तिच्या जिं मोचनाचे
केले अनंत तरुणां अुपदेश साचे ॥ ६ ॥

तो काल रम्य, मधुर प्रिय संगतीनीं
तें चांदणें, नवकथा, रमणीय रात्री
तें ध्येय दिव्य निजमातृ-विमोचनाचें
तो अुग्र निश्चयहि, ते उपदेश साचे ॥ ७ ॥

झाल्या तदा प्रियकरांसह आणभाका
त्या सर्व देवि वहिनी स्मरती तुम्हां का?
' वाजी प्रभू ठरु ' वदे युवसंघ सर्व
' आम्ही चितोरयुवती ' युवती सगर्व ॥ ८ ॥

की घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेने
लब्धप्रकाश अितिहास-निसर्ग-मानें
जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें
बुद्ध्याचि वाण धरिले करिं हें सतीचें ॥ ९ ॥

## २

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका
त्यांते स्मरोनि मग सांप्रत हें विलोका

नाही पुरी अुलटलीं जरि आठ वर्षें
तों कार्यसिद्धि इतुकी मन कां न हर्षे ? ॥ १ ॥

आसेतु-पर्वत अुचंबळला प्रदेश
वीराकृती धरित टाकुनि दीनवेष
भक्तांचिया रघुपदीं झुलताति झुंडी
जाज्वल्य होयहि हुताशन यज्ञकुंडी ॥ २ ॥

तो यज्ञ सिद्ध करण्यास्तव अुग्र दीक्षा
जे घेति येअि तअिं तत्कृतिची परीक्षा
" विश्वाचिया अखिल मंगल-धारणाला
बोला असे कवण भक्ष्य हुताशनाला ? " ॥ ३ ॥

आमंत्रण प्रभु रघूत्तम सोडिता हें
दिव्यार्थ, देव ! अमुचें कुल सज्ज आहे
हे साध्वि, गर्जुनि असें पहिल्या हवीचा
हा अीश्वरी मिळविला अम्हि मान साचा ॥ ४ ॥

धर्मार्थ देह वदलो ठरले नितान्त
ते बोल फोल नच बालिश बायकांत
ना भंगली भिअुनिया धृति यातनांना
निष्काम-कर्मरति योगहि खंडिला ना ॥ ५ ॥

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका
केल्याचि सत्य कृतिने अजि ह्या विलोका
दीप्तानलात निजमातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलो कृतार्थ ॥ ६ ॥

# ३

हे मातृभूमि ! तुजला मन वाहियेलें
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेलें
तूतेंचि अर्पिलि नवी कविता रसाला
लेखाप्रती विषय तूंचि अनन्य झाला ॥ १ ॥

त्वत्स्थंडिलीं ढकलिलें प्रिय मित्रसंघा
केलें स्वयें दहन यौवन-देह-भोगां
त्वत्कार्य नैतिक सुसंमत सर्व देवां
तत्सेवनींच गमली रघुवीर-सेवा ॥ २ ॥

त्वत्स्थंडिलीं ढकलिली गृहवित्तमत्ता
दावानलांत वहिनी नवपुत्रकान्ता
त्वत्स्थंडिलीं अतुल-धैर्य वरिष्ठ बंधु
केला हवी परमकारुण पुण्यसिंधु ॥ ३ ॥

त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला
त्वत्स्थंडिलीं बघ अता मम देह ठेला
हें काय, बंधु असतो जरि सात आम्ही
त्वत्स्थंडिलींच असते दिधले बळी मी ॥ ४ ॥

संतान या भरतभूमिस तीस कोटी
जे मातृभक्ति-रत सज्जन धन्य होती
हें आपुलें कुळहि त्यामधि ईश्वरांश
निर्वंश होउनि ठरेल अखंड वंश ॥ ५ ॥

# ४

की तें ठरोहि अथवा न ठरो परंतु
हे मातृभू अम्हि असो परिपूर्ण-हेतु
दीप्तानलात निज-मातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलो कृतार्थ ॥ १ ॥

ऐसें विवंचुनि, अहो वहिनी ! व्रतातें
पाळोनि वर्धन करा कुल-दिव्यतेतें
श्रीपार्वती तप करी हिमपर्वतीं ती
की विस्तवात हसल्या बहु राजपूती ॥ २ ॥

तें भारतीय अबला-बलतेज काही
अद्यापि या भरतभूमिंत लुप्त नाही
हें सिद्ध होअिल असेंचि अुदार अुग्र
वीरांगने, तव सुवर्तन हो समग्र ॥ ३ ॥

माझा निरोप तुज येथुनि हाच देवी
हा वत्स वत्सल तुझ्या पदिं शीर्ष ठेवी
सप्रेम अर्पण असो प्रणती तुम्हातें
आलिंगन प्रियकरा, मम अंगनेतें ॥ ४ ॥

की घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेने
लब्ध-प्रकाश इतिहास-निसर्ग-मानें
जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें
बुद्ध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें ॥ ५ ॥

— लंडन, १९१०

# आत्मबल

(चाल : चामराचे सुरावर)

अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला
मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला ॥ ध्रु० ॥

अट्टहास करित जधीं धर्मधारणीं
मृत्युसीच गाठ घालु मी घुसे रणीं
अग्नि जाळि मजसी ना खड्ग छेदितो
भिउनि मला भ्याड मृत्यु पळत सूटतो
खुळाऽरिपूऽ। तया स्वयें
मृत्युच्याचि भीतिने भिववु मजसि ये ॥ १ ॥

लोटि हिंस्र सिंहाच्या पंजरीं मला
नम्र दाससम चाटिल तो पदांगुला
कल्लोळीं ज्वालांच्या फेकिशी जरी
हटुनि भंवति रचिति शीत सुप्रभावली
आण तुझ्या तोफांना क्रूर सैन्य तें
यंत्र तंत्र शस्त्र अस्त्र आग ओकतें
हलाऽहलाऽ। त्रिनेत्र तो
मी तुम्हांसि तैसाची गिळुनि जिरवितो ! ॥ २ ॥

— समुद्रमार्गे, १९१०

# सायंघंटा

(वृत्त – वैनायक)

पशुसेची जे सकाळपासुनी सदा
घाण्यासी तैलाच्या फिरति जुंपले

बंदिवान ते सुटता जू, जरा कुठे
आताची येताती बंद अंगणी,

घाण्याच्या भंवति भंवति सर्व दिनभरी
तुटु पाहति पाय तरी धावधावता

घामाने गळल्या जें चिंब जाहलें
भूवर्तुल आताची सुकत तें जरा.

तोंची वीभत्स तया परिचिता वचीं
दंडकाष्ठ अुपसुनी तंडेल गर्जला :

'जोडी ! हां जोडी !' सहसाचि सर्व ते
बंदी होताति दोन दोन जोडिने

"नीचे !—ना, अूपर ! मूं बंद ! बे–अुठो"
स्वविरोधी आज्ञाशत पाळपाळता

येताती नाकीं नव ! अंतिं अेकदा
पंगत ही बसली अपराद्ध जनांची

कामाने, घामाने क्लिन्नगंध ती
सांजेच्या जेवणासि. "रोटि डाल दो !"

डालरोटि थाळ्यांतुनि सरसहा पडे
"खावो बे ! जलदि ! जलदि !" जलदि लागती

खायासी सर्व तोंचि शब्द ये " अुठो ! "
हाय ! तया स्नेहममत्वाविना सुक्या
तुकड्यांचा तोंडीं चघळीतची भुगा,
भुक्त, अर्धभुक्त, रिक्त-जठर वा जसा
जो असेल तैसा हा सर्व अुठतसे
बंदिवान अपशब्दां गुंजता हळू
असहाय क्षोभाच्या; सारवुनि करें
अुष्टी ती भूमि, अन्न फेकुनी, मुखा
धुवुनि पुन्हा जोडीने सर्व परतती,
आणि तया बंद अंगणात मग पुन्हा
जोडीच्या मागे जोडीस या क्रमे
बंदींच्या ओळी बसवूनि लव जरा
तंडेलादिक होती दंडधर ढिले.
बंदिप येअूनि बंद कोठड्यांतुनी
रात्रीच्या पूर्वी वंद्यांसि कराया
अर्ध घडीचा आहे अवधि अजुनि की
हुश्श करुनि बंदिवान बसतसे जरा
जोडीच्या बंदीसी गुप्त बोलता
चोरदृष्टि राखुनिया दूरवर भयें !

* * *

तोंची जो जोडिस त्या दिवशि माझिया
तो बंदी सहसाची डंवचुनी हळू
मजसि वदे सोल्हासे ' बघ अहा वरी ! '

बघ सुंदर चांद ! किती दिवशि दिसू ये
तो होता एक निकोबारचा कुणी

वन्य जातिमधला ज्या बोलती ' मले '
मद्याच्या चोरीस्तव दंडिला जया

दाट अरण्यचि ज्याचा मूळ पाळणा
पुरही ज्या वाटावें पंजरचि, तया

बंदीच्या कोठडींत कोंडिता असें
तीन मासही व्हावे, तीन जन्मसे

स्वाभाविकत:चि ते चंद्र पाहुनी
उल्हसिता वदनी परि वदन लपवुनी

हळुचि मला बोले अेकेक शब्द की
गणुनि गणुनि अंगुलिसी " अेक हा असा,

अेक असा आणिकही छे,–! न तो तिजा
मास अिथे मज पडेल ! बस्स दोनची

हे मावळणारे रे चंद्र या स्थलीं
दुर्दशेत बघतिल मज, चंद्र तिजा तो

पाहिल ना मजसि अहा कोठडीत या !—
परि त्या विस्तीर्ण तटीं मंजु सिंधुच्या

आमुचिया निक्कोबारीन सिंधुच्या
जलतरंगदोलावरि दोल खेळता

पाहिल मज चांद तिजा– डोलडोलत्या
डुंगीतुनि आमुचिया मारिता वल्हें

—आणि करीं हावभाव करित—गीतिच्या
तालावरि जी गाञिल मत्प्रिया सवें

वा गातां मजसी कर गुंफुनी तिच्या
लगटुनि लगटूनि कटी मधुनिची जओं

वल्हवू लागेल तीच नौसि हौशिने
किंवा त्या चांदण्यात धुवुनि निघाल्या

त्या ढवळ्या सिंधुपुलिन वालुकांतुनी
विहरत वा धावत वा धरित वा कधी

अन्योन्या क्रीडनांत वेचण्याप्रती
लवताना किंवा सहसाचि चमकल्या

शंख, शिंप, गारांसी चित्रविचित्रां—
—चांद तिजा मज बघेल ना अिथे अहा!"

हंसलो मी "सत्य काय? सुखद हो तरी
मित्रा तुंज तव मोचन शीघ्रतर अणी"

निश्चितान्तताहि करी दु:ख सुसहसें;
कां न तरी निश्चित—शीघ्रान्तता करो

दु:खासहि आताच्या वर्धकचि सुखा!
मजसह समवेदनांसि दर्शवू तयी

सहजचि तो वळुनि हळू प्रश्नला पुन्हा—
"सांग, गड्या, चांद किती काढणें असे

अजुनि परी दुर्दशेत दुष्ट ह्या तुला?"
भावांसी हृदयातिल दाटल्या झणी

बघ सुंदर चांद ! किती दिवशि दिसू ये
तो होता एक निकोबारचा कुणी
वन्य जातिमधला ज्या बोलती ‘ मले ’
मद्याच्या चोरीस्तव दंडिला जया
दाट अरण्यचि ज्याचा मूळ पाळणा
पुरही ज्या वाटावें पंजरचि, तया
बंदीच्या कोठडींत कोंडिता असें
तीन मासही व्हावे, तीन जन्मसे
स्वाभाविकत:चि ते चंद्र पाहुनी
अुल्हसिता वदनी परि वदन लपवुनी
हळुचि मला बोले अेकेक शब्द की
गणुनि गणुनि अंगुलिसी “ अेक हा असा,
अेक असा आणिकही छे,—! न तो तिजा
मास अिथे मज पडेल ! बस्स दोनची
हे मावळणारे रे चंद्र या स्थलीं
दुर्दशेत बघतिल मज, चंद्र तिजा तो
पाहिल ना मजसि अहा कोठडीत या ! —
परि त्या विस्तीर्ण तटीं मंजु सिंधुच्या
आमुचिया निकोबारीन सिंधुच्या
जलतरंगदोलावरि दोल खेळता
पाहिल मज चांद तिजा— डोलडोलत्या
डुंगीतुनि आमुचिया मारिता वल्हें

—आणि करीं हावभाव करित—गीतिच्या
तालावरि जी गाअिल मत्प्रिया सवें

वा गातां मजसी कर गुंफुनी तिच्या
लगटुनि लगटूनि कटी मधुनिची जशीं

वल्हवू लागेल तीच नौसि हौशिने
किंवा त्या चांदण्यात धुवुनि निघाल्या

त्या ढवळ्या सिंधुपुलिन वालुकांतुनी
विहरत वा धावत वा धरित वा कधी

अन्योन्या क्रीडनांत वेचण्याप्रती
लवताना किंवा सहसाचि चमकल्या

शंख, शिंप, गारांसी चित्रविचित्रां—
—चांद तिजा मज बघेल ना अिथे अहा!"

हंसलो मी "सत्य काय? सुखद हो तरी
मित्रा तुंज तव मोचन शीघ्रतर अणी"

निश्चितान्तताहि करी दु:ख सुसहसें;
कां न तरी निश्चित—शीघ्रान्तता करो

दु:खासहि आताच्या वर्धकचि सुखा!
मजसह समवेदनांसि दर्शवू तयीं

सहजचि तो वळुनि हळू प्रश्नला पुन्हा—
"सांग, गड्या, चांद किती काढणें असे

अजुनि परी दुर्दशेत दुष्ट ह्या तुला?"
भावांसी हृदयातिल दाटल्या झणी

ओतू मी बाहेरी अुत्तरें " अहा !
कोण करी ह्या गणिता ! — चांद दोन वा
तीन, चार, चाळिस—ना चांद तो किती—
पक्ष, मास, ऋतु, अयनें वत्सरें अहा
तीन, चार, चाळिस तें गणित हातिच्या
किति ह्यापरि चरणांच्या अंगुलीसही
धरुनी ना येणारें सत्य मोजता !
बहुधा मज चांद बघेलचि न कोणता
जेथे तुज चांद तिजा की बघेलचि !
चांद मला कोणताहि पाहणार ना
लगटुनि लगटूनि कटी सिंधुतटि कुण्या
रमता वा धावत वा धरित वा प्रिये !
निश्चितसे हेंचि मात्र ! अुलट जें असे
सर्व अनिश्चित तें तें ! वदासि 'छे' कसें ?
म्याचि अनिष्टाची ती जडशिळा स्वयें
बांधुनिया निजकंठी टाकिली अुडी
याचि तुझ्या निक्कोबारीन सिंधुच्या
रौद्रशान्त जलकल्लोळात निर्घृणा !
आता जें बुडणें ती निश्चित स्थिति
तरणें तो अपघातचि जरि क्वचित् घडे ! "

* * *

तो घणघण, घणण, घणण, नाद घुमुनिया
हुकुमावरि हुकुम सुटे : 'हो खडे ! खडे !'

कोठड्यांत बंदीजन कोंडुनी झणी
बंदीगृह रात्रिभरी बंद सक्तिने
करण्याची घंटा ही ! शब्द जरि कधी
कारेतहि कवणाचा अैकुनी मना
वाटे लव हलकेसें, अिच्छिताकडे
पद पडलें एक पुढे गमत जरि असे
साश मना कारेतहि पळभरी कधी,
तरि तें की सायंकालीन परिचिता
या घंटेच्याची घणघणण निनादे
की येता रात्रीतुनि रथ विचित्र ते
स्वप्नांचे भू-जल-ख-ग शृंखलिताही
देहासी, गेहासी तेंवि, सोडुनी
बंदींते स्वेच्छासंचार घडतसे
प्रियसंगति, भुक्तभोग वा नवीनही !
यास्तव या सायंघंटेसि परिसुनी
हलकासा जीवाचा भार लव गमे
टाकुनिया अेक अुसासा; वदे हळू
बंदिवान जो तो " दिन हाहि संपला ! "
मेला दिन-शत्रु एक : नष्ट दशेच्या
सेनेतिल दिवसांच्या एक शिपाअी
पडला होअूनि ठार अधिक अेक हा !

* * *

दिवस मृत्यु-घंटे तू गर्ज अशीची :

तर्क करू ये न आजि मज जरी, तुला
गर्जावें लागणार आणखी असें

कितिदा तें युद्धी या, हे दिनान्तके !
तरि निश्चित हें निदान गमत की असे

संख्या जी दिवसांची कोणती तरी
विधिनियता दास्याची भरतभूमिच्या,

त्यांतिल तू अेक अधिक दिवस दुष्ट हा
मारितेस ठार असा आणि जे असें

मोचन त्या मातेचें तेंच आमचें
अन्वर्थक मोचन होणार हवेंसें !

देय प्रभुनियत स्वातंत्र्यमूल्य जें
आम्हांप्रति त्या मूल्यातील अेक हा

अुग्र तपोदिन-दिनार टाकिताचि हा
भरपाअी करूनि बंदि-निधित या, अुठे

यंत्रचल प्रतिध्वनिच पावतिचा हा
हे सायंघंटे, तव नाद जो असा !

ज्या दिवशी हिंदभूमि अति कठोर या
बंदिनिधित दंडाच्या भरिल अंतिमा

दिवस-दिनारा दारुण दुर्दशेचिया
बलिदानाची ही नवरात्रि संपता

पूर्णाहुति पडुनि शक्ति-होमहुताशी
जें विजयादशमीला प्रज्वलोज्ज्वला

त्या ज्वाला-मालीतुनि तृप्त चंडिच्या
होअिल की मुकुट दिव्य-दीप्त आमुचा
ग्रहणमुक्तसूर्यासम प्रकट पुनरपि
त्या दिवशी विजयवृत्त तें करीत की
प्रथित दिशा दाही जो आध्रुवध्रुवी
सिंधु तटोतट प्रतिध्वनित गर्जत्या
जाअिल जयघंटेचा घोष महान् या
राष्ट्राच्या पुनरुत्थित; नाद-सिंधुच्या
त्याची हा अेक असे नादबिंदु की
कपटगणक घंटे, हा नाद जो तुझा

बिंदुबिंदुने ह्या तो सिंधु साचणें !
गर्ज तरी तू स्वाहाकार बलींचे
दास्य-दिनांच्या अस्मत्प्राणहवींच्या !
गर्ज तुझा अेक अेक दुर्दिनान्तके
घंटे, त्या सुदिनासी आणितो अहा
अेक अेक दिन सन्निध ! दास्यमुक्तिच्या
सुदिना—ना मम—परंतु हिंदुजातिच्या
मुक्त तिचें जीवन की तेंच आमुचें !
कवण जगे ? अहह जरी हिंदची मरे !
कवण मरे ? हृष्ट जरी हिंद जगे रे !

— अंदमान, १९१३

# मूर्ति दुजी ती

( वृत्त : वैनायक )

अपरिचित न जो तुझिया मधुर विलासा :
    रम्य सरें तीं, नलिनें, नाल सुभग ते,
ते सुगंध भृंगगुंज, त्या सुमंजुला
    सारंग्या, गीतें तीं गोड, गोड ती
दयित-स्मृति आलिंगन जीस तृप्तवी,
    शेती ती हिरवी, आल्हादिते मळे,
सरितापुलिनोत्थ थंड तीं कलिंगडें,
    मुक्त नील आकाशश्री मनोहरा,
मुक्त नील सागरतल, मुक्त वायु ते,
    राजमार्गि भक्तीच्या गजर गोड वा

टाळ-मृदंगांचा हरिनाममत्त तो,
    चंद्रबिंब शारद मेघांत धावतें,
आशा की रिक्त संशयात सुखभरें :
    ऐसें जें नव, संगत, मंजु, मुक्त जें
त्या त्यातिल मधुर विलासासि जो तुझ्या
    मूर्तीच्या लावण्यश्रीस वर्णिता
भाटचि तो लंपट तव : देवि ! तोहि मी
    आजि अहह अच्छितसें रूप देखण्या
तें दुजेंचि तव ! तव ती मूर्ति दुजीची !

*        *        *

    मूर्ति मधुर ना परंतु ती भयंकरा

तव दुसरी घोर मूर्ति दावि ती मला !
कारण तू बघसि का न आजि मज अिथे
अैशा ह्या लोह-पिंजऱ्यात कोंडिला
हिंस्र कुणी पशु जैसा वध्य तसाची;
आणि अैकशी न काय लोक पहा ते
परस्परांसि जे कथिति दावुनी मला :
" असता हा हिंस्र कुणी पशुचि की क्वचित्
टिकता या पिंजऱ्यात—वीर वा कुणी
हा तो परि केवळ कवि भावकोंवळा;
शोभेची मात्र वस्तु ! शयन-रंगणीं
विजयायुध वीणाची, म्हणुनि कां कधी
विजयायुध ती होअी समररंगणी ?
कसली ती कविता सुखभोग-लोलुपा
दाविल ना ह्यास अिथे तोंडही पुन्हा
नसता कवि सहत तरी; हा तगेल ना ! "

*　　*　　*

कां ? कविता काय कुणी पण्य अंगना
की जोंवरि अुत्सवीय मनविमोहका
सुवर्णरत्नमौक्तिकांत तनु अलंकृता
तोंवरीच मात्र हात हसत धरू ये ?
आणि सुदैवाने आकस्मिका अशा
दुष्काळीं, पुष्करिणी शुष्कसलिल की
तेंवि रिक्तरसगन्हर हृदय तिचेंही

होउनि ती होत हात हिसडुनी दुरी ?
ना, ना, ना ! कुसुमसुगंधीय लाघवी
तारेवरि वीणेच्या नाचती मुदें,
तींच तिचीं होउनिया वज्र-कर्कशें
धारेवरि खड्गाच्या नाचतीं पदें !
ना कविता निजभक्ता त्यागिना कधी !
भक्त तिला त्यागो, ती त्यागिना तया !

* * *

कारण कीं मूर्ति तिच्या असति दोन ज्या
कर्तव्या अनुसरुनी रक्षिती तिच्या
पूजकासि वा प्रियासि समयि विभिन्ना
अेक मूर्ति ती नाचत हृदयमंचकी
रसिकमनाची वीणा घेउनी करी
तंतुंतंतुतुनि कुशल-स्पर्श-पुलकिता
प्रेमाची वीज थराखुनि देत जे;
भावनांसि मोहन घालुनि ती करी
लोण्याहुनि कोमलशा–कोमला अशा
की जाव्या चांदण्यामधेहि वितळुनी !
आणि दुजी ती मूर्ति प्रखर जी तुझी
कविते घेअूनि शिरे त्राण सतीचें
अहह ! हास्य करित प्रज्वलित चिताग्नी !
प्रथम मूर्ति तव; यमुना-पुलिन भिजुनि जैं
चांदण्यात शीतल त्या रात्रिं जाहलें,

त्या रात्रीं कमलनयन श्यामसुंदरा –
सहित रासलीलेमधि गुप्त गोडशा
हृदयाहृदयासि नाचनाचवी मुदें;
आणी आनंदाच्या किंकिणीप्रती
हास्य-लास्य-मग्न-गोपिका-हृदांतल्या
ताल धरित मंजुल रुणु झुणु झुणू झुणू !

* * *

परि यमुना-पुलिनीं रसभरित कीं अशा
त्या कवळ्या नंदकिशोराचिया मऊ
लुसलुशीत अधरांवरि मधुर होतसे
मुरली जी, तीच अहा त्याच कोमला
अधरांवरि कर्कश रणशृंग होअुनी
रण वेताळाच्या वेताळ-तांडवा
ताल पिटी भारतीय त्या रणामधे
" अच्छेद्योऽयमदाह्योऽशोष्य अेव च,
लोकक्षयकृत् प्रवृद्ध काळ, काळ, मी—! "
दंष्ट्रा विक्राळ, गर्ज भयद कोण तो
कविते, तव !—जो सहस्र वत्सरांतुनी
घुमत येत आजहि, हें भुवन कंपवी !
—त्या छंदीं, त्या वृत्तीं, समरभीषणा
प्रकटित तव चंडमूर्ति जी दुजी अहा
देवि, आज देवो मज तीच दर्शना !
कारण की भिन्नचि हें अुदित आजला

कर्तव्य क्रकच-तीक्ष्ण ! आज ना असे
तन्मुद्रा स्मितशुभ्रा, वेष सौम्य ना

जरतारी थाटमाट रंगराग वा
रत्नखचित मुकुटहि तो आज ना दिसे

वाद्यें ना मंगल, ना गीत-मंजु ते
ताफे रंगेल नव तमासगिरांचे !

आज दों दिशा न पथांतूनि आवली
भवनांच्या वर्षती फुलें; न हर्षती

ललनांचे लोलनयन, गर्जतीहि ना
लोकसंघ जयजयध्वनी कृतज्ञ ते !

आजि सेवकांसि नसे पारितोषिकें
वाटित ये सोन्याचीं आमुचा धनि

स्वयंसैनिका त्याच्या आज अवधि वा
मिळते ना क्षणही की स्वेच्छ विलासा

' अशिथिल परिरंभीं परिमृदितमृणाली –
– दुर्बलशा अंगकां 'सि लगटुनी कुण्या

अविदितगतयाम यामिनीसि न्यावया !
आज उलट सर्व ! उग्र, ना-हिडिस्ससा

लोखंडी जबडा वासूनि आपला
कर्तव्य प्रगट आज ! मज चिरावया

दातांच्या कवळ्यांच्या करवतींत दो !
दगडाहुनि निर्दय हें हृदय तयाचें

वेषही न बर्बरता झांकि अशी ही
त्याच्या अजि नंगी तरवार तनूची !

आणि बाप रे ! थंडी ही भयंकरा !
निर्दयतेहूनि थंड थंड ! गोठलें

नदनदींत पाणी ह्या आणि शरीरीं
रक्तपिंड पिंड अहो जात थिजोनी !

या भयाण अेकलकोंडीत अेक ह्या
नि:सहाय, निंदित, मी बघतसे स्वयें

जीवनरस नाड्यांतुनि माझिया अहा
थंड पडत जाताना ! दगडचुन्यांच्या

या नंग्या अंधाऱ्या भिंतिच्याहुनी
गार गारठा अंगी असह भरुनि ये.

कारेच्या कोठडीत नागव्या अशा
नंगें कर्तव्य असें मजसि गाठतें !

आणि अधान्तरि शिखरावरति वायुच्या
संभाळुनि तोल सतत चढत धावण्या

आज्ञा मज दे ! पाठीवरति लादुनी
पर्वतसम दुर्धर सद्गर्वभार हा

राष्ट्राचा अखिलाची ! ये तरी अहा
तूहि ! तुझ्या त्या दुसऱ्या चंडमूर्तिचें

दर्शन मज दे ! कविते, आजि दुजा तो
छेड सूर कर्कश, जो भिववि भैरवा !

सूर ललित ना ! रुणुझुणु ताल तोल ना !
आवडते ज्याचे आघात कोवळे

हृदयकुंजि नाचविती गोड गुलगुल्या
मंजु गीत गोविंदातील छंद ते

अबलांच्या अबल हृदा अधिक अबल जे
करिती ते विल्हणीय करुण छंद वा.

परि, कविते, भेरींचे सूर ते दुजे
छेड आजि, अबलांच्या अबल हृदांही

करिते जे प्रबल प्रलयोर्मि सिंधुसे !
मृत्युंजय मंत्र कुणी प्रकटवील जो

मूर्ति चंडिकेची अुदंड, द्यावया
चंड मनोबळदाता ममसि वर अजी !

कुरळी जे खेळावे, केश मृदुल ते,
क्रोधाने राठ राठ अुठुनिया जवें,

फुटलेल्या पेवांतूनि सर्प की तसे
बुचड्यांतुनि चवताळत सुटुनि धावती

स्कंधीं वा वक्षीं वा पृष्ठिं वा मुखी
विकराल क्रोधभरे अति भयंकरा :

अेक्या निज हस्तेंची छाटुनि स्वयें
खड्गाने आपलेंच मुंड फल तसें

अन्या निज हस्तीं घे, आणि अहो जी
रक्ताची धार अुडे वरि अुफाळुनी

लाल लाल चिकट विकट त्या गळ्यांतुनी
धार तीच घट घट त्या क्रुद्ध मुखें पी
पेल्यातुनि लाल मद्य पी जसें कुणी !
पिउनि रक्त आपुलेंचि आपली तृषा
शान्तवित्या त्या प्रचंड रौद्रभीषणा
रुंडधरा छिन्न-मुंड मूर्तिसी नमो
नमो नमः सहस्रधा प्रमत्त नर्तने !
तूंची कर्तव्य-मूर्ति ! तूं जरी अशी
सद्यःकर्तव्यमूर्ति मद्‌हृदापुढे
रुंडधरा, छिन्न-मुंड, खंड-कृपाणा
अैशीची मूर्ति धरुनि, तूंहि ये करूं
कविते, या हृदयाचा पाठपुरावा !
जें वेताळीय, काळभैरवीय जें
मारक जें, दुःसह जें, कठिण कटुकटू
तेंचि आज आरोग्यद बलद हो तया !
कीं जैसें तैं होओ; अढळ जैं चढे
वीरवर श्रीबंदा वध-शिलेवरी.

*　*　*

**श्रीबंदावीर**

क्रूर-लोह-पंजरांत या निरुंदशा
तीक्ष्ण सुळे !—लोहाचे दांत रक्तपी
तेवी शिवशिवत अहा देतिना मुळीं

अल्प वळायातेही तनुसि तयाच्या !
पीत रक्त लोह-सुळे टोंचटोंचुनी

देहाची जाळी त्या जाहली असा
निजरक्ती न्हालेला कवण हाय हा

पंजरांत बंदिवान ? सिंह कीं जसा !
पंजरस्थ सिंहाच्या श्वान शिकारी

भंवति जसे भीत–धीट रक्तपिपासू
भुंकति बहु टपत तया भक्षु फाडुनी

शत्रूचे तेवि मुक्तखड्ग हे थवे
भुंकत त्या पंजरासि ढकलिती पुढे !

दिल्लीचें दीर्घ पटांगण सभोवतें
लोहगजांचें कुंपण रोखतें जना :

ज्या भंवती शतसहस्र हिंदु अहिंदू
नरनारी दाट उभ्या दूरवर अहा

प्रेक्षाया हिंदूच्या वीररक्षका
प्रेक्षाया हिंदूच्या रक्षकासची

ना, परंतु हाय हाय तद्वधासही !
प्रेक्षाया ! मात्र तोच मुख्य कसाअी,

बादशाह ज्या वदती, तोहि ये ! हळू
फाटक—ना फट केवळ करकरूनिया

पंजर लव उघडे : ओढून शृंखला
फरफर फरफटित हाय टेचटेंचुनी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

बंदीवानासि टाकिला पटांगणी.
खणखण उपसूनि उगारूनि भोंवती
शस्त्रास्त्रें शतशः सहसाचि रोखिलीं
अेक अेक शिष्य तया वीरगुरूचा
शृंखलांत बद्ध पुढे अेक अेक ये
'होशी का मुसलमान ? वांचसी तरी !'
'हिंदू मी ! शीख अम्ही ! मरण मी वरी !'
'हें कुराण,–हें कृपाण !—बोल पुनरपी'
पुनरपि ये पुनरपि ये ये पुनःपुन्हा
प्रत्युत्तर घोर निश्चयोत्थ सत्वरी
'हिंदू मी ! शीख अम्ही ! मरण मी वरी !'
अेक अेक उत्तर तुच्छवित कुराणा
अुठताची पडत धर्म-वीर-वरांचे
अेक अेक शीर्ष बळी क्रूर कृपाणा
शंभरदा प्रश्न अुठत रानटी स्वरी :
'होशी का मुसलमान ? वांचसी तरी !'
शंभरदा उत्तर दे कंप अंबरी :
'हिंदू मी ! शीख अम्ही ! मरण मी वरी !'
अेक अेक धर्मवीर करित दोनशे
वर्जुनि भय गर्जुनि जय धर्मगुरूचा
वधशिळेशि वाहुनि निजशीर्ष देतसे !
बोथटलें तें कृपाण : जात बुडुनिया
सद्य अुष्ण अुष्ण शोणितांत वधशिला :
अति अघोर अति अुदास दिवसही दिसे

झिंगतसा लाल लाल रक्त पिऊनी.
हाय, अहो ! परि त्या अति किळस आणित्या
स्थानी बीभत्स ह्यांचि समयि हें कसें,
कां ये अति कोमल अति करुण लेंकरू ?
आणि पडुनि त्या बंदी वीरवराच्या
सहसा तें मूल गळां, स्फुंदुनी वदे :
‘ हाय पिताजी ! हा हा, काय दशा ही
तनुची तव आज राजसाजभूषिता ! ’
राजराजभूषणार्ह बंदिवान तो
वीरवर श्रीबंदा अहह आपुल्या
अेकुलत्या अेक्या तनयासि हुंगुनी
बोले : ‘ हे बाळ ! तुझा मी नसे पिता !
हिंदुधर्मची, बाळा, पूज्य तव पिता !
माता तव हिंदु-जाति : जा तिच्यावरी
लिंबलोण ओवाळुनि कमल-कोमला
तनुचें तव तनया जा टाक सत्वरीं ! ’
सत्वरची साश्रू-सोल्हास तरीही
अुठत राजबिंडा तो वीरतनय तैं.
‘ होशी का मुसलमान ? वांचसी तरी ! ’
‘ हिंदुधर्म—मंगलार्थ मरण मी वरी ! ’
आणि हाय हाय त्याहि अर्भकाप्रती
नेताती ते नृशंस वध-शिळेकडे :
हळु न्या रे, हळु ! संभाळूनि लेकरू
हे लहान अितुकें की साचल्या तया

रक्ताच्या डबक्यातचि सहज बुडुनिया
जावें की जाता त्या वधशिलेकडे !
बोथट तरि तें कृपाण कठिणतम तरी
अति सहजचि कर्म भयंकर करीत तें !
कठिणतमहि बलिदानीं सहजतम तसें
वीरसुत श्रीबंदा वीरवराचा
निज तनुच्या नखनालवरुनि खुडुनिया
वाहुनि दे हिंदु-धर्म-मंगलार्थ की
समर-चंडिका-चरण-स्थंडिलावरि
निजसुंदर मुखमंडल कमलकुसुमसें !
हरहर ! सत् श्री अकाल ! जय ! पुनः पुन्हा
श्रीबंदा गर्वभरें गर्जना करी !
वीर करी गर्ज; आणि शोक करि पिता
—किति सुंदर, शूर किती ! बाल अेकची
अंतरलें तेंहि अभाग्यासि : घे अशी
श्रीबंदा हाय हाय हाय अंतरीं !
तों ते आलेच कोप-कंपभराने
थरथरते शब्द, शिव्या, शाप वर्षतां !
आणी यच्छब्द उभ्या पंचनदासी
सिंहाचा जेंवि गुहे, तेंवि गर्जवी
यद्गर्जे अक्षरशः मुसलमान तो
ग्रामधाम सांडित घे वन सहस्रशः !
घोरीपासूनि शल्य अति अघोर जें
दास्याचें हृदयिं सले पंचनदाच्या

तें उपटुनि शतकांचा सूड सदा घे
यत्कृपाण : त्या बंद्या वीरवरातें

तेंचि मुसलमान अजि श्वान की जसे
शृंखलिता सिंहावरि भुंकती बहू

तेंवि भुंक भुंकति पुसताति बहुपरी
‘ हें कुराण, हें कृपाण ! बोल पुनरपी,

कुफरा, हो मुसलमान : वांचसी तरी ! ’
धर्मान्धा ! य:कश्चित् सैनिकें दिलें

ज्याच्या ना कवडीचें मोल कुराणा
सेनानी तो स्वयेंचि घालणार का

मूढा तव भीक भीतिशी अशा खुळ्या ?
‘ सचमुच क्या ऐसा है ? ’ मुख्य कसाअी,

बोलति ज्या बादशाह, तो वदे मध्यें
‘ जावोची तरि सेनानीप्रती तया

सेनेहुनि अधिक सभादर समर्पिला !
तो कुराण फेकी ? तू फेक कृपाणा

आणी जा तीक्ष्णाग्रा सांडसाप्रती
लोहाच्या लाल तापवूनि आण जा ’

लाल लाल सांडस तीक्ष्णाग्र तीरसे
घेउनि ये हत्यारी अढळ आसनीं

वीर वसे योगयुद्ध ‘ बोल पुनरपी,
‘ होशी ना मुसलमान ? ’ एक एक त्या

प्रश्नातें प्रश्नचिन्ह तेवि पूर्तवी
तप्त लोह-सांडस सहसाचि घुसोनी
वीराच्या तनुंत तीर तूणिरीं तसा !
प्रश्नान्ती अेक अेक तोडुनी अहा
मांसाचा लचका ओढूनि काढिती
लाल तापलेल्या खुपसूनि सांडसा !
अक्षरशः हा अघोर छल रिपू करी !
अक्षरशः तें अघोर धैर्य तो धरी
तो वंदा अखिल-हिंदु-वंद्य हुतात्मा !
‘ छल अघोर हेंही तें धैर्य चळविना
तरि अघोरतर भोगो खल छलाप्रती ’
बादशाहची तो ! तन्निधित पडे का
क्रौर्याची ती उणीव ? घोरतर छळा
कल्पी लव हत्यारी तोंचि गर्जला
बादशहा, ‘ ना तैसे मूढ ! हाणिता
आघाता शत न होय घाव शरीरी
विषम तसा घाव होय हाणिता मनीं
आघाता अेकमात्र ! कुफ्र कारटा
मृतहि चिरा–तोडा तें हृदय ! ’ हृदय तें
त्या हुतात्म वीरतनय तनुसि चिरुनिया
तोडति ते क्रव्याद क्रूर : आणखी
अुष्ण रक्त थबथबुनी गळत ज्यातुनी
जिवलगशा राजसशा लाडक्या अशा
अेकुलत्या तनयाचें हृदय तें अहो

जनकाच्या त्या वदनी कोंबिती बळे
हाय हाय– धन्य धन्य– हाय हाय हा !
धन्य धन्य धन्य ! तरिहि धैर्य ना चळे !
अुस्सहि ना निघत मुखातूनि कीं असे
योगिवराचा आत्मा, क्रूर हो, तया
आवीची गत तेथे की 'विचाल्यते
गुरुणापि स दुःखेन न यत्र आगतः !'
सैतानचि ! सैतानचि यात घुसुनिया
वेडावी आम्हांसी : नर न, भूत हें !
किंकाळुनि भुंकुति भुंकोनि नीच ते
नंतर आसन्न-मृत्यु वीरवरा त्या
सभ्य मृत्युचेंही सुख मिळु न द्यावया
अुटावरि अुफराटें बांधती बळे
आणी त्या लक्ष लक्ष जनततींतुनी
दिल्लीच्या गल्ली-गल्लीत राक्षसी
मिरवणूक ती माते ! लोक पहाते !
लोक पहाते त्या, त्यांच्याच रक्षणीं
प्राणदान करि त्याचा घोर वध तसा :
हिंदूंच्या वीजाचे लक्ष लक्ष ते
जन असुनी दोन हात लांब मिशाही
बहु मिशाळ षंढाहुनि षंढ होअुनी
हिंदूंच्या धर्मरक्षित्यासि पाहती
त्या दशेत, त्या दुर्बीभत्सनेमधे !
अेक जरी मायेचा पूत त्यांमधे—

आओीचे दूध जितें अेक प्यायला
        जरि असेल त्यांत तरी शपथ ! धिक् अरे
धिक् तुमच्या जीवितास ! लक्ष नर तुम्ही
        लाटेने केवळ की अुसळता जरी
तरि सहसा टाकिताचि पार बुडवुनी—
        पार ठार तुडवुनि ह्या दैत्य-शतांसी—
—वा निदान त्या निज भीरुत्व-कलंका !
        परि आता तो कलंक हिंदुतेवरी
निज मारक छाया ना पसरविल पुन्हा :
        की त्यावरि रक्तासी अुष्ण अुष्ण त्या
हृदयाच्या आपुल्याचि ओतुनी अहा
        शुद्ध करुनि हिंदुध्वज रंगवी पुन्हा :
हिंदुवीर हा बंदा हिंदु हुतात्मा !
        धर्मवीर हा बंदा हिंदु हुतात्मा !
देशवीर हा बंदा हिंदु हुतात्मा !
        अुठति किळसवाणे दुर्गंध ज्यांतुनी
सडलेल्या कुजलेल्या मूत्रमलांचे
        नगराच्या त्या अुकिरड्यावरी दुरी
नेअुनि मग खाटिक ते टाकिती तया
        अमरमृता ! जा कुफरा ! रक्तमांस ते
गृध्र तुझें खावोती श्वान सूकरें :
        आणि जरी आत्मा कुफरांहि असेची
खावो तरि आत्म्याते नरक जा तुझ्या ! '
        तों होअी काय ! अहो सजुनिया तिथें

तेंचि रक्त मांस तया अमर मृताचे,
त्यांतुनि हंगाम हुतात्म्याचिया तया
सूडाचा अुठला अुगवूनि अकस्मात् :
मानियले मूषक ज्या, कःपदार्थ ज्यां—
तेचि अहा सिंहासन पोखरूनिया
या धरित्या सिंहांच्या क्रूर भीषणा
तोंडासचि करताती आपलीं बिळें !
मृत झाला अुज्जीवित ! मृतचि मारिते !
गाअींनी मारियले ठार कसाया
चिमण्यांनी मारियले ठार ससाणे !
पायदळीची रेती तापली अशी
की भाजुनि भस्म करी पायदळासी
आणी ना कुतरेंही भीक दे अशी
होय बादशाहाची ना दशा अहा—
—बंद्याचा सिंहनाद घेतसे जअीं
रूपान्तर हिंदुडिंडिमामधे महान् !
आणि अीश दे अन्ती यश बळाधिका
मूर्तिभंजकांवरती मूर्तिपूजका !

* * *

परि होअिल हें असेंचि हें न जाणता;
होअिलही हें असें न, हेंहि जाणुनी;
अति भयाण अति महान उच्च त्या स्थली
अंधःकारांत, घोर दक्षिणायनीं

चिरवित निज देहा कीं वध्य पशु तसा,
धर्मास्तव नरकीं जो होअुनी पचे

तो वीर श्रीबंदा हिंदु हुतात्मा
आज असो ध्येय मला अेकमात्रची !

तोची मज नरक गमो आजि सरससा
स्वर्गाहुनि ससाही ! विजय-गीति ना,

—त्याची गा, स्फूर्ते, तूं असह अपजया
ज्या सुरांत बंद्याच्या हृदय-तंतुसी

लावुनि तूं घोरगीत गाअिलेंस तें
व्यक्ति-मरण सौख्याचें असह—त्याच ये

—त्या सुरांत कविते ! तनुतंतुवाद्य हें
माझेंही बांध : राग तो निराश गा :

धैर्याचा परम तशा ! कां न कीं तशा ?
मी न काय अेक जरी क्षुद्र डहाळी

तरि त्याची प्रथिता अश्वत्थ-तरूची
हिंदवीय वंशाच्या ? ती यदीय की

शाखा, जरि दिक्कुंजरहस्त दीर्घशी
हिंदु हुतात्म्या बंद्या वीरवराची ?

तेंचि रक्त, अल्प सत्त्व, तरि शिरांत या
तेंचि बीज, जीवन ते, मृत्तिकाहि ती !

तो शकला श्रीबंदा हिंदु हुतात्मा
सहण्यासी जरि असह्य छळ तसे तरी

कां शकेन मीहि न हे छळ सहूं अहा
मीहि हिंदुची असतां ? हे सहेनची—

याहुनिही भयद असे छळ सहेनची
परि झटेन, जीवनान्तिही झटेनची

करण्यासी ही विमुक्त मातृभू पुन्हा !
मुक्त पुन्हा, शक्य पुन्हा, मनुजमंगला
पुण्यभूमि पुनरुत्थित पतितपावना !

—अंदमान

# हलाहलबिंदू

( चाल : प्रणती तव चरणा० )

हलाहला प्यालां ! ज्या तुम्ही । हलाहला प्यालां
प्रभुजि, पहा ना बिंदु त्यांतला खाली हा गळला ॥ ध्रु० ॥

अुपाय तूं कोटी । करिसी । अुपाय तूं कोटी
सुखदु:खाच्या हलाहलासी शमवायासाठी
शतसूर्यलतांचीं सोमफुलें नवनव तीं
अमृतार्द्र आणवुनि पिळुनि मस्तकावरती
फेकिशी सदा निर्माल्य तशी तूं परतीं
चंद्रमौलि भोळा । परंतू । चंद्रमौलि भोळा
अमृतत्वाचा मानबिंदु त्या खाली जो गळला ॥ १ ॥

देवदेवची तूं । अीश्वरा । देवदेवची तूं
ह्या दीनांच्या मनीं न तुमच्या स्पर्धेचा हेतू
अमृतवल्लि राहो । तुमची । अमृतवल्लि राहो
बुटी विवेकाची लव तरि ती अनुपाना द्या हो
जाळी जगताला । की पहा । जाळी जगताला
सुखदु:खाच्या हलाहलाचा बिंदू जो गळला ॥ २ ॥

— अंदमान

# जगन्नाथाचा रथोत्सव

( चाल : हसतमुख तरुण० सारखी )

ऐश्वर्ये भारी । या अशा । ऐश्वर्ये भारी
महाराज, आपुली कथा ना कुठें निघे स्वारी ॥ ध्रु० ॥

दिक्क्षितिजांचा देदीप्य रथ तुझा सुटता
ह्या कालपथाच्या अतुट उतरणीवरता
नक्षत्रकणांचा उठे धुराळा वरता

युगक्रोश दूरी । मागुती । युगक्रोश दूरी
महाराज, आपुली कथा ना कुठे निघे स्वारी ?

२

पुसूं नयेचि परी । पुसतसें । पुसू नयेचि परी
मिरवणूक ही किमर्थ अथवा कुठे निघे सारी

दुज्या कुण्या द्वारीं । जावया । दुज्या कुण्या द्वारीं
किंवा केवळ मिरवित येशी परत निजागारीं

ह्या सूर्यशतांच्या किती मशाली जळती
मधुनीच शतावधि चंद्रज्योति ह्या अडती
सरसरत बाण हे धूमकेतुचे सुटती

कितिदां आणि तरी । हीहि तें । कितिदां आणि तरी ।
उठे चमकुनी रात्रि पुरातन तिच्या अंधकारी

३

जीवाचीच किती । कथा या । जीवाचीच किती
रथासी जगन्नाथ, तुझ्या या ओढूं जे झटती

ज्वालामुखि पंक्ती–। पासुनी । ज्वालामुखि पंक्ती
मज्जापिंडापर्यंत प्रस्फुटिता जी जगतीं

अुंचनिंच पाठीं । पुढति वा । अुंचनिंच पाठीं
गति[४] तितुकी तव रथ झटतसे ओढायासाठीं

अिच्छांत आणि या भूतमात्र वेगांच्या
ओवून लगामा तुझ्या परम अिच्छेच्या
त्या अतुट उतरणीवरती हो काळाच्या

खेळत हा अतलीं । रथोत्सव । खेळत हा अतली
महाराज, आपुली कथा ना कुठे निघे स्वारी ?

— अंदमान

# सूत्रधारास

( चाल : तूं माझा यजमान० सारखी )

सूत्रधार आपुला । जरा तरि पडदा हा उचला ॥ ध्रु० ॥
‘ या दृश्याच्या पडद्यामागे कथिति कुणी मजला
रंगभूहुनी रंगकक्षची आश्चर्यी खचला ’ .
‘ त्रिरंगवाटी एक तिथे ती, तीमधुनी सकलां
दृश्यांसह नटवर्ग निपजता आम्ही पाहियला ’
‘ इतुकें नचि परि विचित्र वाटीमधूनि त्या सजला
सूत्रधारचि स्वयें अुपजतां आम्हीं पाहियला ’
‘ कसली वाटी कसले घेअुनि रंगबिंग बसला
स्वश्वसितीं तो सूत्रधारची रची इंद्रजाला ’
‘ प्रत्यक्षासी प्रमाण दुसरें हवें कासयाला
पडद्यामागे आम्ही अंधःकारा पाहियला ’
‘ स्वयेंहि होतां अंधकारमय आंत पाहत्याला
आंत जाअुनी पडद्याच्या की आम्ही पाहियला ’
‘ असंख्य ! एकामागे दुसरा, दुसऱ्याच्या तिसरा
पडद्यामागे पडदा केवळ आम्ही पाहियला ’
‘ पाहियलें ! प्रत्यक्षचि कथितों पाहियलें त्याला ! ’
वदती सारे ! आप्तचि सारे मानूं कवणाला ?
अुचला अुचला ! वा न ! धन्यची मम आत्मा धाला
तुझ्या जयें या रंगभूमिचा रंग पाहियेला !

— अंदमान

# अज्ञेयाचें रुद्धद्वार

( चाल : भूपती खरे ते )

ज्या घरापासुनी मार्ग सर्व फुटणारे
येणार घरासी मार्ग त्याचि ते सारे
अैकोनि तुझ्या भाटांच्या
गप्पांसि गोड त्या त्यांच्या,
ध्यायासि विसावा माझ्या
जीवासि ये घरीं तुमच्या
ठोठावित थकलों ! अजुनि नुघडती बा रे
आंतूनि तुझीं तीं बंद सदोदित दारें ॥ १ ॥

विस्तीर्ण अनंता भूमी
कवणाहि कुणाच्या धामीं
ठोठावित बसण्याहूनी
घेअीन विसावा लव मी
येअीन पुन्हा ना तुझ्या घरा ज्याचीं रे
हीं वज्र कठिणशीं बंद सदोदित दारें ॥ २ ॥

ज्या गाति कथा राजांच्या
सोनेरि राजवाड्यांच्या
मी पथें पुराणज्ञांच्या
जावया घरा त्या त्यांच्या

चाललों युगांच्या क्रोशशिला गणितां रे
तों पथा-अंतिं घर अेक तुझें तें सारें ॥ ३ ॥

दुंदुभी नगारे शृंगें
गर्जती ध्वनीचे दंगे
क्रान्तिचे वीर रणरंगें
बेभान नाचती नंगे
मी जात मिसळुनी त्यांत त्या पथें जों रे
अंतासि अुभें घर तेंचि तुझें सामोरें ॥ ४ ॥

* * *

कोठूनि आणखी कोठें
चिंता न किमपि करिता ते
ही मिरवणूक जी मातें
नटनटुनि थटुनि या वाटे
ये रिघूं तींत तों नाचनाचता मारे
पथ शिरे स्मशानीं ! ज्यांत तुझें तें घर रे ॥ ५ ॥

सोडुनी गलबला सारा
अेकान्त पथा मग धरिला
देताति तारका ज्याला
ओसाडशा अुजेडाला
चढ अुतार घेतां अुंचानिंच वळणारे
अजि मार्ग तो हि ये त्याचि घरासी परि रे ॥ ६ ॥

जरि राजमार्ग जे मोठे
तुझियाचि घराचे ते ते

घर अन्य असेलचि कोठे
या अरुंद आळींतुनि तें
मी म्हणुनि अणूंच्या बोगद्बोगद्यांतुनि रे
हिंडुनी बघें घर अन्ति तुझें सामोरें ॥ ७ ॥

घर दुजें बांधुं देईना
आपुलें कुणा उघडीना !
या यत्न असा चालेना
बसत्रे न सोडुनी यत्ना
ठेठावित अजि मी म्हणुनि पुनरपी बा रे
तीं तुझ्या घराचीं बंद सदोदित दारें ॥ ८ ॥

— अंदमान

## मरणोन्मुख शय्येवर

( वृत्त : वैनायक )

ये मृत्यो ! ये तूं ये, यावया प्रती
निघालाचि असशिल जरि ये तरी सुखें !
कोमेजुनि जावया भिवोत हीं फुलें
हीं द्राक्षें रसरशीत सुकुनि जावया
भ्यावें तें कां म्हणुनी तुजसि परी मी ?
माझ्या पेल्यांत किती पीत राहिलों
तरि न संपतीच अशा असति आजि या
अश्रूंच्या मदिराची मात्र राहिल्या !
ये, त्या जरि नैवेद्या असासि भुकेला
आणि जरी दिवस असे अजुनि तरुण हा

तरि लहानथोर अशीं असति संपलीं
दिवसाचीं कार्येंही बहुत करुनिया;
तोडजोड करुनि परी फेडलीं ऋणें
जन्मार्जित जीं जीं तीं, ऋषिऋणाप्रती
श्रुतिजननीचरणतीर्थ सेवुनी कधीं,
धरुनि कधीं ध्रुवपदासि संत-ततीच्या
आणी ही आचरुनी अेक तप अशी
आशेच्या या स्मशानभूंत तपस्या—
देवऋणा, फुंकुनि रणशृंग दुंदुभी
धडड धडड पिटुनि, आणि तो अघाडिचा

चढवुनि तैं हल्ला सहसाचि ज्या पळीं
सुटली रघुवीराची प्रथम रणाज्ञा
आणि त्याचि रणयज्ञाग्नीत पेटल्या
अस्थि अस्थि, मांस मांस, अिन्धनें तशीं
जळत जळत आज असे शेष राहिली
राख यौवनाची मम ! आणि म्हणुनिचीं
फेडाया पितृ-ऋणासि आजि अहो मी
शास्त्रातें, अनुसरोनि, दत्तविधानें,
निपुत्रिकत्व वारियलें पुत्र अखिल हें
अभिनव भारतची मम ! जेथ जेथ कीं

पाळण्यांत विकसतसे नयन-कमल ते
तेथ तेथ मीच बघें सृष्टि-कुतुहला.
नव उन्नति शील भालपटलिं दिसत जैं
अुदयोन्मुख तेज तरुण, तैं पुनःपुन्हा
माझ्याही उदयोन्मुख होति ह्रदीं या
आशा नव, आकांक्षा अुच्च, भावि त्या
आमुचिया वंशाच्या गौरवाचिया
भारतीय केवल ना, मानवीयही
वंशाच्या गौरवार्थ ! अखिल मानवी
यौवनांत अनुभवीन यौवनास मी

आणि पितर माझे ते प्रेमतर्पणा !
येअि सुखें मृत्यो, तरि–असति हीं अशीं,

तोडजोड करुनि परी फेडिलीं ऋणें,
आणि वहुतकरुनीया असति संपलीं
दिवसांचीं कार्येंही : यद्यपी कधी
अुगवे हा दिवस, कधी मावळेहि वा;
कर्में वा कवण, कशीं कार्य, या दिनीं
याविषयी पंचांगें[२] भिन्न, भिन्नची
भट्ट आणि पण्डित हे कथिति मज कथा,
तरिहि लोकसंग्रहार्थ, धारणाप्रती

मानवीय आत्यंतिक आत्महिताच्या,
सज्जनासि गमलीं अनुकूल तींच कीं
कार्यें म्यां धर्म्य अशीं मानिलीं अणी
तदनुरूप एकाचा म्हणुनि जो ठरे
म्यां माझा भार असे अुचलिला मुदें
यथाशक्ति यथापरिस्थिति न भंगितां
धरिलें तें व्रत कदापि किमपि ना भयें.
सत्कुल, अव्यंग देह, परम दयाळू
जनक आणि जननी ती, त्यांहुनीहि कीं
वात्सल्यें, पुण्यें, प्रतिपाळिता तसा

अग्रज, जो अग्रगण्य तापसांमधे;
मूर्त विनय अनुज असा; अद्वितीयसें
प्रेयांचें प्रेमपुण्य; धन्य आणि तें
ध्येय महत् देअी जें जीवनाप्रती

सार्थकत्व मनुजांच्या, काव्यमय करी
        जें आयु:कालातें, पूत चरित्रा;
तप काही, जप काही, यश काही तें,
        काहीशी मान्यताहि शारदेचिया
राजसभेमाजी कविरत्न भूषिता

        चाखियले रस नाना; हुंगियले ते
शतभूजलवायुंललित शतसुगंध की
        पंचाग्नीमधिल तया प्रखर भाजल्या.
अुत्तापापासुनि तों प्रीतिच्या मअू
        स्निग्ध परिष्वंगापर्यंत सर्वही
शीतल, शीतोष्ण, उष्ण अनुभवीयलें
        कटिबंधस्पर्श[3] तसे; परिसिले किती
स्वरशत, शतभाषा, शतगीति नवनवा
        शतमंजुल कंठांतिल–आणि मृत्युच्या
शतकठोर कंठांतिल घोर लागल्या;
        नाना जन, जानपदें, जातिविभिन्ना

देश किती दृश्यें तीं, भूमिच्या महा--
        संग्रहालयांत परिभ्रमत पाहिलीं.
सुरूपतें , सुरेख तें सुललित तें असें
        पाहियलें डोळ्यांनीं किमपि तरि जया
मृत्यो ! ते डोळे हे झांक तूं सुखे !
    —झांकणेंचि आवश्यक जरि गमे तरी !

की सुरेख पाहियलें—किमपि परी तें !
प्रीति विफल : विरहचिरंतन ! नवीं वयीं,
प्रौढ धुरंधरहि न जी शकति तोलण्या,
तीच धुरा भर अुन्हांत तोलणें घडे !

म्हणुनि असे अजुनी अपुरीच राहिली
खेळाची हौस हंसत चांदण्यामधें
या आयुष्याच्या मम ! तरिहि जाणुनी
कीं न ययातीचीहि हौस पुरेशी
झाली जरि आयुष्याचाचि सर्व तो
नृपति करी खेळ अेक; आणि पाहुनी
अिच्छेच्या बीजा फल भोग लागता
अिच्छेचीं बीजेंची त्यांत फिरोनी;
आणी अनुभवुनी कीं अेक भुकेची
अेक जेवणाने जी तृप्ति जाहली

तृप्ति सहस्राव्याही भोजनामुळे
असते की तितुकीची आणि तशीची;
मी दे तुज अनुमोदन संपवूं असा
हा जीवनलेख अिथें; पृष्ठिं या, जरी
पृष्ठें जीं पुढलीं तीं मागल्या तया
पृष्ठांची असली पुनरुक्तिची तरी !
ज्यां असतां दिवस नसे व्यर्थ गमविला
दिवसास्ताचेंहि म्हणुनि दुःख ना मला.

—भीति उद्यांची ही वा ! मृत्युच्या मृता
जरि असेल त्या अंधकार-लतेला

फुलत दुज्या[४] दिवसाचें फूल तरीही
भीति न मज; कीं येथे पेरिलें अम्हीं
फुलत आणि फलत तेंच, कथिति ते तिथे.
आणी मी पेराया कष्टलों असें
बीजें कीं तीं तीं जीं निवडुनी दिलीं
त्यांनींची अत्युत्तम म्हणुनिया मला
पेरुं फलाशाविरहित. ‘ तूं तसें जरी
वर्ततील समपरिस्थितींत अन्यही;
तरि लोकोन्नति-विनाश होय ना असें
वर्त ’ तसेंची वर्तूं यत्न म्यां सदा

केला आबाल्य. ‘ असें अन्य तुझ्याशीं
वागावें म्हणुनि तुला वाटतें तसें
तूंहि वाग अन्याशीं ’ संतवचन हें
मी अनुपलिं पालाया कष्टलों अणी
जरि आपद्धर्म सेव्य मानिले तरी
ते अितुक्यास्तवची कीं धर्मची[५] स्वयें
ओपुनि दे आपत्तीच्याचि मज करी !
जैं हिरव्या गवताचा गार गालिचा
वरुनि दहा पावलींच अंगणामधें
कारागारात कधी मी फिरे तधी

आत्मौपम्यात मुरत चित्त थिजोनी
कितिदा तरि चरण अकस्मात चालता
स्तंभित होऊनि रहावेत घटिघटी
काही केल्याहि तया तरुण कोवळ्या
गवताचे अंकुर दुखतील या भयें
पाय त्यांवरी नये पडूंचि की पुढे
हातीचा घास कधी हटुनि रहावा
हातीचीं, कीं जितुकीं त्यांत शितें तीं
बीजेचीं नव्हत काय ? खातसो अम्ही
फल तें तें भ्रूणघात[६] ? आणि कधिकधीं
मज पडलें भय कीं मज वेड लागलें !
आत्मौपम्यास जधीं वर्णण्यात हें
मन माझें अनुसरिता मज पदोपदीं
मरणासम दुःख होय पाहुनी जगीं
पूर्ण असंभवचि तया आचरूं पुरे
तरिहि यत्न म्यां केला; अज्ञतेमुळे
वा अशक्यतेमुळेच पद कधी जरी
स्खलित जाहलें असेल तरि असेल तें
म्हणुनि भय उद्याहि ना. स्मशानभूमिचा
परतटप्रदेश जो अनोळखी तिथे
सुखकर प्रवास करवि जें असें असे
ओळखिचें पत्र अम्हांजवळ त्या स्वयें

भगवान् श्रीकृष्णाचें—श्रीमतां गृहे
        शुचीनां च ! वा गेहे योगिनामपि
' कश्चित् कल्याणकृच्च तात दुर्गतिम्
        नहि गच्छति ' नहि गच्छति सांगती अणी
ते निरीश्वर[७]-स्वभाव-वादिही मला;
        म्हणुनि जरी सत्यचि जें वदति ते, जरी
स्वर्ग, नरक, जन्मान्तर, बंध, मुक्ति वा
        निजकर्माचाची परिपाक तरी

मरणाची वेस जयामाजि अुघडते
        त्या अदृष्ट नगरांतिल अति सुरम्य ते
राखवूनि ठेवियले असति बंगले
        आधींची आम्हांस्तव भरुनिया अम्ही
कर्माच्या, धर्माच्या नियत विसारा !
        परि जरि कीं स्वर्ग, जीव, बंध, कर्म वा
अैहिक तें अिन्द्रजाल मात्र, कीं जरी
        संघातोत्पन्न भाव मात्र जीव हा
मृत्युपृथक्करणिं अभावांत ' ओसरे
        तरि सर्वोत्तमचि ! मरण अेक सुषुप्ति

अथवा प्रत्यक्ष मुक्ति ! पंचही असे
        मिश्रित भूतांश पृथक् मुक्त होअुनी
विहरोत स्वेच्छ नव्या मिश्रणांतुनी,
        वा स्वयेंचि, वा शून्यीं ! अिंद्रधनु तसें

संज्ञेच्या आकाशीं विपल शोभुनी
विपलांतचि हा माझा ‘ मी ’हि कीं जरी
विश्वाच्या अंतर्हित ‘ मीं ’त मावळे
तरि मरणा ! मरण न तूं ! मरण मुक्तिची !
विपलांतचि परि ! विनंति अितुकिची असे :
येणें तरि येअुनि जा झटकनीं तुझा

दुर्लौकिक जो जगांत लोक जो तुझा
द्वेष करिति, तो नचि कीं अससि तूं स्वतः
निर्दय वा निंद्य म्हणुनि—पाहुनी तुला
आलाची कोणीही परत कीं न तो
सांगूं तूं केविं तें !—परि विशेषतः
मृत्यो ! तूं अप्रियसा जगति जें तुझें
सैन्य, पुरस्सर, पीडक हें हिडिस्ससें,
रोगाचें क्रूर असे, त्यामुळेंच कीं !
मीच न कीं परि अजानरागु जो जगीं,
तुल्य ज्या प्रियाप्रियादि हानि, लाभ, त्या

भगवान् श्री गौतमाप्रतीहि भासला
रोग जरा अप्रियची : ‘ लाभ ना दुजा
आरोग्यासम जगतीं ’ धर्मपद[१] वदे
तरिही जे कोणी तुज नुघडतीलची
स्वेच्छेने दरवाजे, दुर्ग ते हठी
जिंकुं जीवनाचे तूं धाड धाडही

रोगांच्या सैन्याची गांजल्या तिथे
मी तों जीं नुघडतील फोडिलीं तरी
जाणारचि, तीं दारें अुघडुनी स्वयें
या माझ्या गेहाचीं, स्वागता असे

अनिवार्या सिद्ध तुझ्या ! म्हणुनि शक्य कीं
ये तरि, हे अखिल-वीर-वीर-विजेत्या !
अेकलाचि, अपुरस्सर आणि अकमात्
परि अशक्य जरि तें तुज अेकटें तसें
येणेंची तरि त्याही क्रूर पीडका
रोगाच्या सैन्याचा क्षोम सोसण्या
मी असेंचि सिद्ध आजि दोन वत्सरें
पाहतची अससी तूं मजसि हा असा
शरपंजरिं खिळला ! ज्या मधुर लागलें
जीवनांतलें मधु, प्रकाशचक्षुतें,

प्रीति हृदा, तो मी त्या सर्व सुखाचें
मूल्य म्हणुनि मृत्यूच्या यातनाहि कीं
समजुनि कर्तव्य सहूं सिद्ध असेची !

— अंदमान

# विरहोच्छ्वास !

## ( विरहाचे सुस्कारे )

( चाल : अजि अक्रुर हा० )

हा हाय तुझ्या गोड गातची गाना
छळि विरहवेदना प्राणा ! ॥

सुमकोमलशा प्रेमिं अनंतीं तुजशी
हे प्रीति, धरुनि हृदयाशी

हा काहि असे काळ म्हणुनि या जगती
विस्मरुनि हीहि गे वृत्ति

जो दंग अम्ही संगसुखासव पीता,
अनुभवित पलीं शाश्वतता,

हा हाय विरह तो आला !
प्रेमाच्या आनंत्याला
आरोपुनि, त्याच्या काला
जरी अंताला । अम्हि तया पला
विसरलो ! तरी अंत अम्हां विसरेना
छळि विरहवेदना प्राणा !! ॥ ध्रु०॥

[illegible], नता त दुष्ट दूरवुनि तूतें
जाताहि पुढें लव परतें

का ओझरत्या दाविलेसि ना मजला
कमलाक्षि तुझ्या मुखकमला !

‘ स्मर कंठिं तुझ्या पडुनि बोलल्या बोलां

अश्रूंत करित त्या ओला !
हें समाधान तव खोटें
त्या पाहण्यात ओझरतें
ना प्रेम निरखिण्यातहि तें
अणि लोलुपसे ! मजवरिच तसे
जन बघो तुला : ह्याहि वांच्छिलें माना !
छळि विरहवेदना प्राणा !! ॥

३

ना लागेना गोड अतां मज कांही !
मज कुठेंहि करमत नाही !
ये विजनां त्रासूनि जनीं मी आणी
त्रासूनि जनां मी विजनीं !
मी केश पुन्हा विंचरी, पुन्हा विखुरी !
विस्मरत गोष्ट जी स्मरली !
फिरफिरुनि तनू लव वसते
बघबघुनि नेत्र लव मिटते
परि हाय अनुक्षण मन तें
झुरझुरूनिया । झुरतेंचि ! तया—
पल विरम नसे; करित सखि तुझ्या स्मरणा !
छळि विरहवेदना प्राणा !

४

फुलतांचि फुलें सहज खुडीं मीं मोदें :
हा तोंचि चुरमळूं खेदें !

कीं 'खोवुं फुला केशकलापी तव ये :'
तुज बाहु कुठें अजि सखये !
तव पूर्वींचे प्रेमदूत दिसतां ते :
हंसतची झुरे मी खेदें !
या अिष्ट जनीं समजवितां 'लव खाअी'
लागली भूक ही जाअी।
स्मरत की कसें म्यां रुसुनी
बसतांच तुवां मन धरुनी
नव कवल देत मम वदनीं
मृदु पालविले। मधु कालविले :
मधु अधरीं तें ! करित अमृत जें अन्ना !
छळि विरहवेदना प्राणा !

५

घे रुचीच जैं वत्स धेनु कां चाटी !
उपचार[२] रीति त्यां नचि ती !
ज्या रुचिची वा चंचु चंचुला पाजी
त्या मोह-शरबता त्याची;
वा द्राक्षांची, आम्रफलांची, मधुची !
चव तशी भिन्न अधरांची !
अणि द्राक्ष, आम्रफल, मदिरा,
जो अधर यौवनें रसला,
त्या सकलांहुनि तव अधरा
अधिकचि गोडी !! पिअुं दे थोडी

मज पुन्हा ! पुन्हा अेक तरि मुका दे ना !
छळि विरहवेदना प्राणा ! ॥

६

रे मंजु मुक्या ! तोचि मुका[३]: जो पहिला
हतकाम मुका तुज वदला !
श्रवणेंचि न तो बधिर हृदेंही ! तऱ्ही
ज्या गीति ना श्रवूं येअी !
रतिदेवीच्या चटुल मुखा[४] ! तूं न मुका :
तूं मुखरविसि रसां अमुखां !
वाङ्मनांहि ना सहुनि मूर्च्छना दे ती
तुजमधुनि हृदयलय गीती
आजन्म मुके अैकवीति निज वचनीं
आजन्म बधिरशा श्रवणीं !
मुरलींत[५] त्या न जें सरलें
जें मेघदूतिंही अुरलें
ज्या ताजमहाल न पुरले
तें तूंचि सख्या ! वदतोसि मुक्या
तूं प्रीतीचा प्रणव[६] ! रतीचा वीणा[७]
छळि विरहवेदना प्राणा !

७

ही अुषा[१] जअीं रंग खेळता आली
मी निघे नभीं त्या काली,

सरसिजें, सरें, बाग बगीचे, शेतें,
टाकीत मागती ते ते
मी गतिच्याची जात उत्सवी– तों ती
तव दिसे मनोहर मूर्ती ?
विहगांत न कीं कधिंहि रतीच्या गगनीं
जोडपें तसें ये जुळुनी !
भरभरुनी दे हृदयरसें रसरसतें
चंचूंत चंचुही मधु तें
शतजन्म अुपार्जित पळ तो
जों गमे करिं पळे येतो
त्या क्रौंचमिथुनगतिसम[९] तों
जी बद्ध पदीं। दिसतां नचि ती
ती दोरी[१०] गे दुष्ट दूरवी अपुणां !
छळि विरहवेदना प्राणा !

८

मी राज्य अणी प्रीति तूं महाराणी !
तूं रत्न तुझी मी खाणी !
मी वेडा तूं चटुल चेटकी आणी
मी मोर मूर्त तूं वाणी !
मी शब्द लिही अर्थ त्यांतला आणी
ने पुसुनि नयनिचें पाणी !
तरि, विरहा, त्वद्दंश पाजवी ज्याला
तव मिष्ट विषाचा प्याला

या पाण्याच्या[११] तोचि पिवो अनुपाना !—
ही शपथ असे अितरांना !
जे पुन्हा न दिसणें कांही
त्या स्तनंधयाचे आअी,
बालिका सासुरा जाअी, ( जी )
विरहिणी, विधुर : हो विरही !
या गीतातें । समसतार तें । तुमचींच हृदें ।
अेकची अहो प्रीत तिथुनि कीं पुण्या ।
छळि विरहवेदना प्राणा ! ॥

९

अणि त्यांतहि त्या तरुण वयाची प्रीती :
स्वप्नांत अुषेच्या न्हाती !
मधु तरुण फुलांतूनि झरे कैशोरीं !
ज्या ऋतूमध्यें हृद्दोर्लीं
तूं आम्हांसी वत्सलाम्रतरु शाखे
देतोसि वसंता[१२] झोके !
तें मंजु कसेसेंचि जें हृदीं होअी
जें अुंच अुंच तो[१३] जाअी !
रूपांत तसेंची हृदयीं
लावण्य भिन्न जों नाही
माधुरी मिसळुनी राही
हृदयीं अेक्या । प्रेमानैक्या

ज्या त्रास वयीं—जेवि धनी तीर्थांना !
छळि विरहवेदना प्राणा ! ॥

१०

त्या वयांतला लोभ आपुला का ना !
सर्वस्व अेकमेकांना !
तूं सखी स्वसा शिष्य तान्हुले भाअू
दुःखांत माय समजाऊ ।
त्या[१४] चंडीच्या देअुळांतला माझा
सहतपी रणतपस्येचा ।
तेजांत अहा ओतुनिया सिंहांच्या
मोहना ललित ललनांच्या
त्या सरस शरबतें भरिला
तव सतत हृदाचा प्याला !
आकंठ पिअू वदनाला
माझ्या मी जो, लावियला तो
ये ! तोंचि अहा अूत भूमिकंपांना[१५] !
छळि विरहवेदना प्राणा !

११

भर दुपारचें अून : अुष्ण सुसकारे
टाकीत तिष्ठती वारे :
रागीट धनी[१६] ! दूर गांव : जड ओझें:
चालतां पद पथीं भाजे :

चिमुकल्या तया पर्णकुटिशिं तों दिससी
तूं अुभी कुमारी मजसी !
मज पालविशी जेथ बकुळिच्या खाली
फुलसडा सेज मञ्जु घाली
ओतिशी कडेची कळशी
पी भरुनि भरुनि अंजलिशी ( मी )
आणि पुढें निघे त्यासरशी
अधिकाचि बळे, अुः तृषा जळे, त्या तुझ्या जलें !
परतलों पुन्हा ! – तेथ चेटकी तूं ना !
छळि विरहवेदना प्राणा !

१२

अधरांत भरू, जीव सुके ! दे याला
अेकची चुंबनीं प्याला
ये ! कंठिं तुझ्या पडुनि झुरे झुलण्याला
ही असूं-हसूंची माला !
टसठसे अहा चेपचेपुनी तान्ह्या
पी हृदांतल्या ह्या पान्ह्या !
जैं जाग मधुनि ये शयनीं
मम कंठि करां गुंफोनी
तुज बघुनि निजेलें, फिरुनी
कधि पिअीन या, हिमकराचिया, नव अुदित तया,

तव मुखावरी मधुर खेळत्या किरणा !
छळि विरहवेदना प्राणा !

१३

हा हाय अता भेट अम्हांसी कुठली !
आशाहि आणि मज विटली !
तरि काकुळती येत विनविलें होतें
आधींच कां न म्या तैं तें !
कीं ' भेटीसी हीच एकली राती :
ये झणीं नको दवडू ती । '
मी समयांच्या[१७] सारसारुनी वाती
पाहिली वाट त्या राती !
पद पथें कुणी वाजतांच दचकावें :
दूरतां शून्य बैसावें !
तों दार अहा किलकिललें :
हो तूंचि ! मज झणीं स्वकरें
हृदि हुंदहुंदुनी धरिलें !—
( परि मी ) विसरुनि राती, ल्वची उरे ती, भोगुं संगतीं,
ढकलिली तुला दूर, धरुनि अभिमाना[१८]
छळि विरहवेदना प्राणा !

१४

ना प्रेमिक हो पलहि दूर व्हा वाया
अभिमानिं ! पडे मी पायां !

वघ बघताचि कीं वाट पळाची या रे
शत रवी विझोनी गेले !
अणि सुकले हो सिंधु कुठें तेव्हांची
क्षणिकांत[१९] भेट ही तुमची !
शत अंध वियोजक शक्ती
कालाब्धिमध्यें आपातीं
केंद्रूनि वियोगावर्ती
प्रीति पर्व हें, । घे भेटुनि घे
दिग्जयी प्रिया प्रीति रिघोनी शरणा[२०]
छळि विरहवेदना प्राणा !

१५

अभिमानीं तों-दावितचि पथें मजसी
साशंक तुवां पुसिलेसी
भ्रू कुंचित, भू वाकवित पद, वक्षीं
अुपवीत, कृष्ण तनु लक्षी—
हा वादळसा वीज ढगावरि[२१] ज्याच्या,
राधेचि कवण ये तूझ्या ?
हा, प्रीति ! न का हाय ठाअुका साचा
रागीट हा धनी माझा !
दे बुद्धि अुपजता मजसी
याच्याचि विकूनी दास्यीं[२२]
या वदति धर्म विप्राशी

अुपजताचि कीं । अणि मला विकी
हें हृदय तुझ्या, प्रीति ! चुंब्य या चरणां !
छळि विरहवेदना प्राणा !

१६

कडकडे अहा दार तों ! तपोमूर्ती
घुसतची प्रभातासह ती[२३]
तो दर्भ अनुल्लंघ्य आपणांमाजी
फेकीत 'दूर' वदली जी ?
मी म्हणताची 'मान्य !' सोडि तो आज्ञा :
'करु सांग तरी रणयज्ञा
भेटुनी घेतलिस न पुरी
ती भेट ही सदा अपुरी[२४]
राहील अशा बहु दूरी
ज्या अंधेऱ्या ! पाताळ दऱ्या
जा देत पहाऱ्यासि तेथ ने जन्मा
छळि विरहवेदना प्राणा !

१७

हा हाय अतां भेट अम्हांसी कुठली !
आशाहि अजी मज विटली !
हा हाय अम्हां बुद्धि अुपजली कैशी
या स्वयें पडाया फासी !

ना निंदीना विप्र[२५] ! आपुली सेवा
मद्दास्य साक्ष तूं देवा !
परि काय करूं या हृदयीं
तळमळत जीव हा वाही
'हृदयिते ! दयिते ! येअी !'
तरि शत पूजा, अर्पियल्या ज्या, त्यामधि माझ्या,
मानाल[२६] महापूजनची या झुरण्या !
छळि विरहवेदना प्राणा !

१८

तरवारीची धार अुग्र, वय कवळें,
शिवलें न यौवना शिवलें,
ये अधान्तरी भवळ, कंठही सुकला
तोलीत प्रतिपदीं तोला,
करिं पेला हा आसवांत[२७] भरभरला
बिंदू न पाहिजे गळला !
रे कोल्हाटी क्रूर खेळ तव ! धारे–
वरि नाच नाचता या रे
हें रक्त गळे : गळु दिधला
ना थेंब हलुनि तो प्याला !
आणि म्हणुनी । धिक्[२८] जन वदला :
'करिं हो धरिला, रिताचि प्याला !'
तें खरेचसें तुजसि तरी भासो ना !
छळि विरहवेदना प्राणा !

१९

अणि तुझ्या तरी हस्तिं असा कां देवा
हा विषम विपर्यय व्हावा !
ये पिताहि जो पाजिता न वा प्याला :
कां आसवांत तो भरिला !
सुमकोमल कां हृदय दिलें वा कां या
योजिलें वज्र वाराया !
सखि ! कवण वदे ' दयित जनांची माया
यांच्या न शिवतची हृदया ! '
जी स्वयें उपाशी हरिणी
निर्दुग्ध तिच्याची थानीं
हुंदडे देउदेऊनी
शावकें जशी, बिलगतीं तिशी, या हृदयाशी,
त्वत्स्मृती तशा तोडतोडती पाना ?
छळि विरहवेदना प्राणा !

२०

तरि सखये ना समज सहे असहासी
कीं म्हणुनी मी नची सोशी
वा वदतो हें सहज दुःख मी सोशी !
म्हणुनि तूं नकोशी होशी !
ना : प्रीति तुझा गोड विरहही भारी !
तो तुझा म्हणुनि आभारी !

जो ओतित हा असह शोक तव कवनीं
हृत्पात्र पात्र भरभरुनी
स्मृति[२९] दूर-मलियिंच्या-लहरी ( तों )
सळसळत मनःकासारीं
वृत्तींच्या खेळत कमलीं
तनुच्या तारा अति मधुमधुरा :
त्या छेडुनिया देति साद तव कवना !
छळि विरहवेदना प्राणा !

२१

बहु आशा ही अहह लाडके होती
प्रथम जैं उषा[३०] उगवे ती
सुमकाननिं कीं सिंधुसंगमीं सरिता
पाहूनि कुण्या एकान्ता,
हा छोटासा एक बंगला; स्वास्थ्या
ज्या वस्तु अवश्यची त्या, त्या;
ती गीता, तें आदिकाव्य; ती वीणा
फुलबाग काम्यकष्टांना
त्वत्सुखा चित्रिण्या जितुकी
पटभूमि समुचिता तितुकी
तितुकीच अणी अर्जुनि कीं
संगती तुझ्या ! सुखशान्तिदया

दिन[३१] न्यावा हा कळुहि देत ! ना करुणा !
छळि विरहवेदना प्राणा ! ॥

२२

परि भंगी ती देव लाडके आशा
दिन असा ये उषे तैशा !
तें ठीकचि कीं देव शक्ति निज करुणा
पावील जरी ना दीना !
मम लहानशी नाव : थोर तव[३२] सिंधु :
बुडतांहि धजेना निंदूं !
ज्यास्तवची ये भिक्षु तुझ्या दाराशी
त्याविना सर्व त्या देशी !
शोकाच्या गेहीं होती
जे दास करूं त्याची ती
प्रियविरहमरूची शेती
त्यांनाही ना, भोगूं सदना, ज्या दासपना[३३] ;
ती अश्रूंची चैन : तीहि मजसी ना !
छळि विरहवेदना प्राणा ! ॥

२३

कथि दिलें न तें तेंचि म्हणुनिया, देवा,
अकृतज्ञ या न लेखावा !

जें दिलेंसि तें हाय बिंदुची, तरिही
सिंधूंत मावणें नाहीं !
निश्चक्षु[३४] अगे रात्रि ! पहाट न जीतें
सांगतों तव समक्षचि तें :
की प्रकाश तो[३५] प्रथम अनंतर नयनें
दे, सुख न तरि, सुखस्वप्नें !
मी दुःखांच्या पीत विषाचा प्याला
पुसतसे दुःखवाद्याला :
सुख अधिक नसे जगति पिसें तरि कैसें
हें जगत् जगाया असें !
ना प्रभो ! मूर्ति मोहक ती,
प्रियचित्त चंद्रिका ती ती,
पल परी भोगुं दिधली ती ( जी )
त्या सकलांची, पावती अजी, घे तुला तुझी,
अेकची मना खंत : देअुनी कां न्या !
छळि विरहवेदना प्राणा ! !

## २४

' धरि ', काय वदां ? ' धीर धरि ! उषःकाला[३६]
ना प्रहरही तुझ्या झाला !
दिन सकल अुरे अजुनि काय होणारें
तें ज्ञात तुला कां सारें ?
भूकंपांचे पर्व हें : क्वचित् याही
पलिं पेटवित दिशा दाही

अुठतील जाळ जे करिते
नवखंड महासिंधूंते
नव महासिंधु खंडांते
शकलचि[३७] सकलां सकलहि शकलां कां न त्या पला,
हो दृश्य अुद्यां ध्येय आजचें नयनां ! '
छळि विरहवेदना प्राणा !

२५

' तें ध्येय अणी ! देव ज्यासि लोभावें !
मृत कल्पतरू बहरावें !
अुज्जयनीचे[३८] कळस कांचनी देखे
डुलविती नव जरीपटके !
चिरमूक, अहो देवदुंदुभी वाजा :
गा भाट : परींनो साजा :
सिंहासनिं, गा ! चढत फिरोनी आजी
आदित्य विक्रमाचा[३९] जी !
नव जीवनिंच्या शुभ कोंपे
तोडीत पल्वली[४०] कुलुपें
भरभरुनि पुन्हा पुण्यापें
राष्ट्र-जान्हवी ! सनातन नवी !
फोफावत गा । जाय धुअूं हरिचरणां !! '
छळि विरहवेदना प्राणा !

## २६

' भवसागरिं, गा ! देव जो अुभारीती
        भवदीपस्तंभ हिमाद्री !
त्या वरति पुन्हा धर्मदीप अुज्ज्वलता
        आध्रुवध्रुवा पथदाता
संरक्षिति ज्या लक्ष लक्ष कल्याणा
        नव जल–स्थल-वियत्सेना
संपन्न असा विप्रयज्ञ[४१] हा होता
        मग बघुनि कुण्या अेकान्ता
तूं आवडत्या त्याचि तिच्या प्रियकंठीं
        मारूनि मिठी–' अजि नचि ती
नचि गोष्ट पुन्हा, हाय, नका हो काढूं
        मज मोहपंजरीं पाडूं !
        आताचि कुठें काळोखीं
        लागलें दिसु[४२] असे मज कीं
        आशेची क्षणिक लकाकी
        अधिकचि जीवीं । कांसाविसवी
अंधारीं अंधारि मात्र दे नयना !
        छळि विरहवेदना प्राणा !

## २७

अजि नेलि कुठें मूर्तिभंजकें माझी
        ती मूर्ति जिवाभावाची !

अजि अर्पु कुणाला पूजा !
धरि धीर वदा[४३] ? परि न काय हीं तापें
सुकतील सुकोमल पुष्पें !
जाअील शिळें जलहि अुत्रेचें[४४] वाया
नेत्राभिषेकपात्रीं या !
निर्दैव देवळामाजी
माझिया हृदाच्या आजी
ही झुरे बालविधवाशी
तारुण्यलता । निजकुसुमां त्या ।
अपुल्याचि वरी बघुनि झुरत जाताना !
छळि विरहवेदना प्राणा !

## २८

'ही आसक्ती[४५]' ! योगिवरांनो प्रीती
परि कुठें जी न आसक्ती !
तरि झुरला का दास तो समर्थाचा[४६]
हरवता शिष्य लोभाचा ?
जाअिं पडे रणीं तो भाचा[४७] ?
हरवशी कुठे हाय गोपाला
करि मुक्त शोक का मीरा[४८] ?
का तुका[४९] साधु त्या वाटे
अैकण्या प्रिय निरोपाते ?
हा सीते ! अजि हा सीते !'

क्रंदत कवळी। रघुवर[५०] वेली !
या अश्रुघनाविण अिंद्रधनु[५१] तें ना !
छळि विरहवेदना प्राणा !

२९

अणि प्रीति तिथे विरह असेची ! ' की ती—
हृदयात दो तुझी प्रीती !
परि हृदयीं तूं तवचि आत्मरत होशी
तरि छळि विरह कां तुजशी[५२] ?'
तरि सांगा जा फुलुनि आपुल्याची या
परिमला गुलाबा घ्याया ! :
वा स्रवू रवा मंजु अहो मुरलीला
जों मधुर अधर ना शिवला !
खाअूसि खव्याला खाअू !
वाटेसि वाट निज पाहू !
गंगेत तिलाची न्हाअू !
चंद्रिकेसि त्या, आल्हादकता
तव चक्षूची देत चकोरा तृष्णा[५३] ।
छळि विरहवेदना प्राणा !

३०

विरहाश्रूंची हीच नदी सीमा जी
जारिणी-विरहिणीमाजी !

पेय वदनाच्या स्मरत जयांनी भासा
चुंबिलें नसे आकाशा
त्यांच्या न कधीं अधर लागुनी अधरीं
वीजची हृदीं संचरली !
प्रिय विरह दिवस-देवांहीं
पर्यायपीत गे ममही
पांडुरा मूर्तिची पाही—
त्वत्प्रीतीच्या । संभोगाच्या
गत पुनवेची साक्ष तनुकला[५४] करुणा !
छळि विरहवेदना प्राणा !

## ३१

ना लागेना गोड अता मज काही
मज कुठेहि करमत नाही !
अणि गोड अकस्मात लागता काही
मरणसें[५५] मनाला होओी !
मज सुखही दे दुःख ! कशासी आतां
सुख हवें हाय तूं नसता !
लावुनी सुखाचा वशिला
आलीस जया गेहाला
त्या गेहिं तयाचि सुखाला
मिटतिं उघडतीं ! दारें अजि तीं
तव वशिल्यानें[५६] ! चतुर अशाची ललना !
छळि विरहवेदना प्राणा !

## ३२

विरहाग्नीने पुष्ट अश्रु हे, आणी
विरहाग्नि पुष्ट अश्रूंनी :
नांदोत असें करित परस्परपूर्ती
हा विरह, आसवें आणि तीं !

मज सुखही दे दुःख दुःखची तैसें
मज सुखद : परतस्याग्नीसें !

हो जपी तपी फलद तुम्हीं हो तुमची
मज आणि तपस्या माझी !
ती शिला नको वा मूर्ति
भावने नसूनी दिसती !
आलिंग्य चुंब्य, असती, ती
प्रत्यक्ष अशी, तव मूर्ति मशी—समचेतनशी,[५७]
तीतची दिसो देव माझिया भुवना !
छळि विरहवेदना प्राणा ! ॥

—×—

## कमला

फुलबाग किती शोभे लहान, नटवी, करी
नटुनी थटुनी नाना नखरे वरचेवरी;
हिरवाचि कधी शालू, सित मलमलिचा कधी,
रेशमी जरतारी वा जयाच्या पदरामधीं
नित्य ताजे जिते मोतीं पाच माणिक जन्मती;

पवनेंच तसें त्यांसी नटवी डुलवी किती !
हासता कुंददंती ती जितमन्मथ मोहवी
सुगंध सौम्य हास्याची ज्या चोरुनि नवी नवी
कला अकेक या लोकीं कामिनी सकला करी
निज मोहक लावण्या, तिजसी मुकुटा धरी !

नौकेत कौमुदीच्या ही रतली कितिदा तरी
बाग योजन-गंधा त्या वनदेव-पराशरीं !
पथाने फुलबागेच्या दों बाजू सम शेवरी
आवली धरुनी होत्या डौलदार, यशें वरी
भाट बुल्बुल गाताती; या शेंगा हिरव्या, फुलें

लाल हीं लडतां त्यांसी भासे चित्रांत चौफुले
जित्या माणिक पाचांचे जडवूनि मुठीवरी
तशा मरकतांच्या कीं म्यानांमाजि असी करीं
सदा लटकती ज्यांच्या, अशी सुंदर भीषणा
स्थापिली तरुणीसेना नीजान्त:पुररक्षणा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७४६६४ दि ... ०१
क्रमांक २००१ ...
१४।३।०१

प्रतीहारी-पदीं का ही वसते ! दे पिक-स्वना
    ललकाऱ्या पहाऱ्यांच्या ती ह्या क्षेमनिवेदना !
मांडवी ही प्रवेशाचीं जाअीने विणिली जिला;
    फुलें हीं हसरीं येत्या आदरीती पलोपला !
फुलें ? अहा फुलें ना तीं, अुद्यानीं विहरावया
    रात्रींत चोरुनी येता अप्सरा धरिले जयां,
नोंद त्या दिव्य पाप्यांची ठेवू जाअिवरी असे
चुंबनांचेचि त्यांच्या घे देवी द्वारप हे ठसे !
    वीथिका कूदलींची ही अुद्यानांतिल मर्मरी
    तया सुरेखिल्या पाथाचिया दो तटि शोभली,
येत्या-जात्यावरी मर्यादेने आनतशा शिरी
    वारी विंजण वाऱ्यासी, आतपत्र अशी धरी,
निर्गंधते करी क्षम्या नम्रता कर–जोडिती
    अशीं केळफुलें, गोऱ्या गोड केळफण्या किती,
दलें सुलोल हीं सारीं दाटता मिसळोनि, ते
    अव्यवस्थितशी शोभा बघुनी मनि भासतें !
कालिंदी-पुलिनामाजी जयांही अुपभोगिला
    यथेच्छ वनमालीसी, पूर्त, तृप्त सुशीतला,
भुक्त-कामा, रतिश्रान्ता, आत्मा अेक जयां हरी -
    सखी म्हणुनि ज्या झाल्या, समतृप्त परस्परी
विगतेर्षा म्हणूनी या जाता वल्लभ त्याच का
    अशा शून्यमना मार्गीं अुभ्या ह्या व्रजगोपिका

ग्रंथालय ठा... स्थळ प्र... १६२८३

कंठांत अेकमेकींच्या घालुनी करपल्लवा
जाताही हरि तैशाचि कुड्मलाञ्जलि, अन्य वा
लाल कोमल पंख्यासी कुणी पालविता करीं

गाला गालासि लागोनी मागली पुढती वरी
हेमगौरमुखी कोणी सनाल अपुल्या सखी
स्कंधी सखीचिया ठेवी पाठिशी लगटूनि की !!
शेवंती ही; हरीं गेला चढाअी करुनी तदा
कुसुमाकर ही कल्पी ढाल की कुसुमायुधा।

आणि हे सोनचाफ्या, तूं शिकलासि तरी कुठें
ही दिव्य किमया? आम्हां स्वयंमन्य नरां जिथे
रुप्याचेंही करायासी जड स्वर्ण न साधतें
ओल्या मातींत सूर्याचीं किरणें पिळुनी तिथे
मृदुचेतन सोन्याचीं, स्वर्णचंपक ! हीं फुलें

सुगंधी तुज पाहूनी निर्मिता मन हें भुलें !
प्रियाच सोनचाफ्याची, चमेली किति ही खुले
तो तिच्यावरि, ती त्याच्यावरती अुधळी फुलें !
जातिने शुचिवर्णा जी, जी भूषा ललनाजना,
याचकांच्या सदा झुंडी झुलती मधु भोजना

दानशूर जिच्या दारीं देवाच्या, सुभगा पदा—
कीं राशी स्वकला तैशी शकलां तनुच्या सदा
अर्चा जी अर्पुनी;-साधू स्वार्थ ? ना, लवलेश ना,

परी केवळ कल्याणा लोकांच्या, मुनिसाधना
करू सांग, तया देऊ मोक्षमुक्ति, पडे गळा

गौरी गौरीहराच्या जी निष्कामा— अजि तूं मला
तया ह्या केतकीच्या हे गंधवाह ! दिशा-दिशां
प्रसिद्ध गुणगंधाच्या करिसी धवला यशा
आणि मात्र यशातेची ! खरी खोटी कशी परी
अुक्ति कुत्सित कीं हीच्या भुजंग लपती घरीं

अवाक्षरहि ना तीचें वदता ! तुज तेच कीं
पावना पावना, शोभे ! स्वार्थ विन्मुखता निकी
ही ज्यांची, मंगला लाखो लोकांच्या झिजती, जयां—
विना वसुंधरा व्हावी अल्परत्ना, अशा तयां
जगद्धर्मी महात्म्यांच्या गृहस्खलित मानिती

स्पृहणीय न तत्रापि गोपनीयचि सन्मती !
पुन्हा हुडकितां मातें फिरे काय असा अता
क्रुद्ध हा त्या त्रिनेत्राचा तिजा नेत्रचि जाळिता;
पाहूनि भास्करा भारी खाअी धास्ति अनंगही
कीं दुग्धें पोळली जिह्वा पी ते फुंकुनि ताकही

म्हणुनीच गमे नेमी मीनकेतन हा खुळा
गुप्तहेरचि सूर्याच्यावरी, सूर्यफुला, तुला !
तरीच तूं सदा डोळा ठेवितोसि रवीवरी
अनंग तरिची दंगा भारी रात्रिंतुनी करी !

नाना बालतरू देशाविदेशांतिल आणुनी,
फुलें किती अशीं ज्यांचीं पानें रंगित देखणीं,
तशींच फुलझाडें हीं विचित्र नटवी किती,
कुंज्याकुंज्यांतुनी होतीं गुच्छांहीं रचिलीं पथीं
भंवती फुलबागेच्या वर्तुळाकृति रेखिले
तृणस्तवक जे गार हिरवे हिरवे खुले;

प्रभातीं तृणवेलींसी त्यांतल्या धवलीं अती
अती चिमुकलीं, लाखों फुलेंही फुलतां किती
मनोज्ञ तरि ती शोभा ! यामिनींत, गमे हृदीं,
होती वहात जी येथे ज्योत्स्नेची रसिता नदी
प्रभातीच्या हिमें का ती घनीभवन घे नवें;—
चकाकती फुलें ना हीं, चांदण्यांचे रवे रवे !!
वशीकरणचूर्णासी देत त्यास तिला हरूं
मंत्र गुंजत त्या भोगक्षमा त्या कलिका करूं,
ह्या पुष्पा वश त्या पुष्पीं करवीत परोपरी
हिचें चुंबन दे त्यासी, त्याचें देत हिला, अली

दयितादयितांमाजी सुमलोकांतल्या पहा
घाली खेपा मधावारी मदनाचा दलाल हा !
धोतऱ्याचीं महादेवा फुलांत रुचलीं फुलें,
गुणान्धत्वहि मोठ्यांचें मोठेंचि असणें बरें !
फूल ह्या निशिगंधाचें ! हें अधीरवितें हृदें
कामसेना पुरोगामी रौप्यशृंगचि काय तें ।

प्रेमकल्प सुमें तीं हीं– फुलले न गुलाब की !
देवतांची तया आरामाची काय मनोरमा
बाला अेक अशी येअी वेचू नित्य तिथे सुमां

ढाळी बाग सुमां मार्गी मार्दवा वधुनी तिशी
प्रतिपद् चांदण्या येता व्योमीं चंद्रकला जशी
चंद्रिकेच्या प्रभाताच्या मिश्रणांत अुषा जशी
कैशोरयौवनांमाजीं शोभे ती सुदती तशी
तुषारमय धारांच्या झाऱ्यांहीं सुजलांत ती
शुचिस्मिता स्वयें न्हाणी वेली–पुष्पलतांप्रती;
पुशी मल्मलिने त्यांचीं पानें, साहस ना परी.
मञु मल्मलिनेही ती पुसाया कुसुमें करी;
पाकळ्यांनी गुलाबांच्या पुशी अन्य सुमें अणी
ओठांच्या पाकळ्यांहीं ती गुलाब तव चुंबनीं

पयोघटीं स्वयें द्यावें पय:पान तिनें असा
ग्रीष्म वर्षाहुनी व्हावा त्या बागेसि पसंतसा
लुप्तान्ह श्रावणाच्या त्या झडींत अुघडें जरा
होताचि, भानुच्या कोळ्या किरणासम तत्पला
लतांत शिरुनी, तोयें करी आकुल फार ते

फुलांचे कमलांचे मी पेले ओतुनिया रिते
खाती लतापुलें अैसे किडे मात्र दुरूनिया
तियेने सेवकाहाती हळूच धरवूनिया

ज्यांत अंधारिलीं पानें फुलें ही गळलीं अशा
पेटाऱ्यांतुनि द्यावें कीं रानीं धाडुनि दूरशा

लीलावती जरी कैं ती लतेच्या बसली तळीं
विणीत कशिदा चोळीवरी सुकुशला तरी
अल्पकाळेंचि ओशाळें व्हावे तन्मन; सत्यं तें !
किती आप्पलपोटी मी ! नकोस रुसुं अं, लते,
आलवालीं तुझ्याही मी घे, नवा कशिदा भरी '

असें कूजनची प्रेमें आलवालाचियावरी
रम्याकृतींत पेरूनी नांव दे अपुलें अणी
नांव त्या लतिकेचेंही निज चोळीवरी विणी
राओराओपरी भारी देखण्या जैं फुलांमधी—
फुलें आकृति ती काढी चोळी वापरण्या तधीं

केव्हा केव्हा सुमांभोंतीं भ्रमरांची सुचाटुला
अैकतां सलगीची ती कुजबूज, ' अरे मला
सांग गुंजत भुंग्याशी काय तूं अससी तरी
फुला, बोल माझ्याशी, गुजगोष्टि तशा करी ! '
लतेसी लावुनी गाला लाडाने वदतां असें

सुमाशीं सुकुमारी ते श्रवणा श्रवुं नेतसे !
पदाघातहि हे जीचा अशोकासि विशोकता
गालची ललनेचा त्या असा कोमल लागता
यावी वज्रासही वाचा ! हीं तों काय लताफुलें !—
असें मंजु वदावीं कीं भासे बुल्बुल बोलले ! !

प्रातःकाळीं तिची सासू हौसेने कथिता कधीं
‘ वेणीस, जा, फुलें बाले, आण आवडलीं हृदीं ’
बागेंत तैं तिनें जावें परी हात न लावितां,
पहावें जरि होऊनि ढाळिती कुसुमें लता :
आणि, सत्य कथी, केसां तिच्या मोहुनि मोकळ्या

फुलें काय—लतांनी त्या ढाळाव्या फुलत्या कळ्या !
निजाभरण कार्यीची असे न मन तें, परी
देवपूजेसही तीचें खुडाया न फुलें करीं :
कीं फुलें खुडितां ये जो रस तो बघुनी हृदीं
वाटे रक्त लतांचे ये, सासू जों न असें कधी

देवकार्यीं, अहा बाले, लतांचींच सुमें किती,
यौवनाचीं सुमें वीरप्रसू तोडुनि अर्पिती ! !
बागेंत चांदण्या रात्री कैं सलील सुमोहना
रमे अितस्ततः जैशी प्रीति-स्वप्निं सुचेतना
तिनें कमलिनी येतां द्यावीं वाजूं न पाऊले

सुखे निद्रित कीं, जावें पाहुनी इतुकें पुढें
खालुनी पारिजाता ती जातां त्यासि निजेमधीं
स्वर्गीची सहसा स्वप्नें लागावींत पडूं तधीं
आणिला भांड भामेनें खाली, पासुनि त्या दिना
स्वर्ग आज दिसे ! गाळी तो
सुखाश्रु सुमांसि ना ! !

कैशोरांतूनि ज्यानें ना यौवनांतचि घेतली
विद्यार्थि त्यातुनी विद्वत्तेतही पदवीपरी,
कुशाग्रबुद्धि तो तीच्या कमनीय पतिघरा
आअीच्या आग्रहें आला कराया सण साजरा
पुष्पमाला गुढीसाठी होती गुंफित ती जिथे
अुद्यानांत युवा पाही गवाक्षांतुनि तो तिथे–

पाही, अले ! जपूनी कीं ही मनोभव-पंजरीं
फसवो न वसंताची तुला मोहक मंजरी !
आणि धीर सुटे सारा; आजि निश्चियलें मनें
तिच्याशीं पहिलेंची तें लज्जाव्याकुल बोलणें.
आअीस चुकवोनीया, धीर अेकवटूनिया,

गनीमी धरसोडीनें येत जात टपूनिया,—
आला ! आला तिच्या पार्श्वी ! येताचि परि सन्मुखी
नीट आला तसा गेला शब्दही निघतां न कीं !
जाणेंचि तें परी घाली मूक प्रश्न तिला, अणी
पृच्छे त्या अश्रुता 'हो, हो!' अुत्तरें अुठलीं मनीं.

अुठे वरी, बघे खाली, रंगे गाल, सुअी गळे ;
सुमासम गमे कांही हृदयीं तिज बोचले !
सासूपासूनि चोरावी गोष्ट ती पहिली अशी
अशान्त पहिल्यानेची तिचे लोचन त्या दिशीं
मिष्टान्ने जेववी सासू मिष्ट त्याहुनिही परी

चुटपूट मघाची ती लागली अुभयान्तरी

तिसऱ्या प्रहरींही ती करमे न म्हणूनिया
जाअी जाअिजुअीवेलीलतांत विहरावया
तीरच्छाये सराच्या तों लाडक्या बकुलें तिला
लव वांकवुनी शाखा प्रेमें आडविलें जरा,

‘ काय तें ? ’ ती पुसे स्नेहें कुरवाळित त्याजला
बालिका, बकुला, सांगे, लाजावें न तुवा मला ! ’
‘—कोण जाणे, परी बाअी, वदती कवि तें जरी
अहा सत्य ! ’ मनीं भावी ती द्रवूनि—‘ न मी तरी

माझिया बकुलाचें तें कोण कोड पुरें करी !—
कौतुकें आणि सौहार्दें, तन्वी त्याचि सरांतली
चूळ घे भरुनी आणि टाकि त्या बकुळावरी !
लज्जा करी कसेंसेंची, पाही कोणि न ये तरी,
भरी चूळ, पुन्हा पाही, पुन्हा टाकि, पुन्हा भरी !

तोंचि सर्सरलें काही कुंजांतूनि ! पहा पहा !
कोण तो कमले, येअी ! चोर ओळखिचाच हा !
आला, सांभाळ आला ! हां, थांब रे, क्षणची तरी;
असावधावरी घाला रीत ही न तुझी बरी !
धरिलाचि परी पक्षी ! वार्द्धक्यें अजि अंधळी

वदतीच नभोवाणी ‘ धर्मयुद्ध न हें ’ तरी !
चोरट्या कटिला गुंफी कांपता कर तो झणीं,
लाजऱ्या लागती गाला ओठ लाजत त्याहुनी !

साचीकृताननना, लज्जाचित्र हृद्य अशा तर्‍हीं !
प्रियेच्या पहिल्याची तो चुंबनासि युवा पिओ !

प्रियेच्या पहिल्याची हे लज्जाचंचल चुंबना,
कोण प्राणी जगीं कीं जो विसरेल तुझ्या क्षणा !
असुनी पळ जो पाजी चुंबना तुझिया रसा
शताब्दांहुनीही होओ तरी अपल तो कसा !
तुझ्यांत दिव्य जी चोरी, गार जो चटकाहि कीं

त्वरा थांबविती, सक्ती अिष्ट, संमति जी मुकी;
चुंबना पहिल्या, दे ती सुखमादकता जशी
प्रियाननार्पिता मद्यांमाजिही न पुन्हा तशी !
अुगीच रुसुनीया ज्या आतां आणुनिया घरीं
अंतःस्थ बोलण्या देती आम्हां संधिहि ना पुरी

पदीं शरणचिठ्ठी ही टाकिता अितरा जनां
चोरुनी, तीवरी जाती पाय देअुनि : चुंबना
—मानिनींसहि त्या स्वप्नीं दिसे मूर्ति तुझी अणी
मूल्य चंदनपद्मांचें विपणींत चढे झणीं !
स्नेहशून्य सहारे जे आयुष्यांतिल घोट रे

विवासनीं अशा जेव्हां जीव व्याकुल हा झुरे;
किंवा विणी कसे जाळें कोळी हीज मजा जिथें
काळ-खोलींत बंदीच्या तैं तिघेही सख्या, तिथे,

प्रियेच्या पहिल्याची हे मुग्ध प्रेमल चुंबना !
तुझीच स्मृति जावोनी भेटवी विरही मना !

वाजे कांही ! अली झाला चुंबुनी पळता अणी
कळी स्पर्शसुखौत्कटथें ती भेदोमुन्ख तत्क्षणीं !
अैक तूं स्वमनाचेंची कमले कमनीय, जा—
प्राणवल्लभ बोलावी, जा, युवा तिकडे तुझा !

पुण्यमंचकशय्या ही : बैस बैस शुभे, न भी :
चुंबिता कां मधेंची तूं राहसी सुटुनी अुभी !
बैस शेजेसि ये तूं ये : स्वयें जनककन्यका !
स्पर्शली जीस ती झाली रतिसेज न धन्य का !
देहधर्म कसासाची ! पावने, प्रकटे अजी

स्वर्गंगा जीवनाची ही, हे गंगोत्रि तुझ्यांत जी !
ओपी हिरण्यगर्भा त्या स्वयंभू भगवान् स्वयें
नारांत ज्या झरा त्यांचा नारि अेक तुझ्यांत ये !
तीर्थांची अुगमा घेअी तीर्थता सुजनांत, ते
तुझ्यांत तूं : ऋतुस्नाते, तीर्थतेसहि तीर्थ तें

तरि घाल फुलांची ती माळ त्या आणि नंतरीं
फुलांहूनि मऊ माळा करांची निज सुंदरी
फुलांहूनि मअू आणि साखरेहुनिही मिठी
कंठीं कोमल त्या घाली प्रेमाची, प्रमदे मिठी
गोड गोड मिठी ? वेडे, पुढें त्याहुनिही अहा

आलिंगनामृतीं गोडी : पिऊनी तर तूं पहा !
अंगी अंगी समालिंगी, विलंब पल ना करी :
की असामान्य गे देवी, पल हा ! असल्या पलीं
सांगावें तें कुणी की गे नसतीलचि तीं उभीं
मंडलें नाग-कन्यांचीं पाताळीं अणखी नभीं

अप्सरांचीं धरूनीया करीं मंगल आरत्या :
लावुनी सनया ओंठा देवदूततताीहि त्या,
प्रतीक्षत पळा ह्याची धन्य ! याच पळा क्वचित्
वर्णितील कवी भावी ' शुभशंसि ' ' प्रसन्न दिक् ' !
कीं कन्याणि, पली या जीं ओपुनी हृदयें हृदीं

प्रेरी अनंग पेराया अमृतें अमृतामधीं
सांगावें कुणिं !— त्या दिव्य पेरणींतचि संभवा
घेणें असेल एखादा घनश्यामळ राम वा :
कालेंचि ना गुणें ही जो ठरे आद्यकवी महा—
कवींत वसुधेमाजी,•आजीं त्यासम अन्य हा

वाल्मीकि वा : कुणी गीता-द्रष्टा वा नव सारथी :
वाग्मी बृहस्पती : शिल्पी मय, भीष्म महारथी ,
किंवा मदालसा, मुक्ता मीरा वा विदुला कुणी
लावण्याची लता किंवा उमा देवविमोहिनी :
वा कुणी विश्ववेधांचा मनु भास्कर नूतन

आश्चर्याच्या आजिंठ्याचा निर्माता, नट, नर्तन

नाट्यकार कुणी किंवा लेकीं अद्‌भुतसा नवा :
आसन्नमृत्यु राष्ट्रांची राष्ट्रें ज्या प्रतिभेंत वा
नवजीवन पीती तों चंद्रगुप्तः अमात्य तो,
विक्रमादित्य वा ज्याचा म्लेंच्छां विक्रम मर्दिनो :

हिंदु छत्रपती श्रीमान् शिव वीरवराग्रणी
गुरुगोविंद वा बंदा धर्मवीर नवा कुणी—
मंगलाची परा सीमा ! पेरणींतचि संभवा
घेणें असेल या दिव्या देवभूमि तुझ्यांत वा
जन्मजन्मान्तरींची यत्तपःसिद्धि फलोन्मुखा

राहिली या क्षणाचीची वाट पाहत उत्सुका
आत्मा अंतिम जन्मा तो मुक्त भोगुनि व्हावया
बुद्ध, शंकर वा जीवन्मुक्त देहुंतला तया ! !
प्रेयाचा स्वर्ग गे स्वर्ग श्रेयाचाहि लुटूं तरी
सख्या समुपभोगी तूं घट्ट या हृदयीं धरी

न अंग सुभगे चोरी : निर्विकल्प समाधितें
मूल-आसन हें कामासन ! तूं रत हो तिथे !
आणि पंचशरा, ये, ये : पंचही शर या पलीं
मार रे सुकुमारीं या मन्मथा मिथुनावरी !
झटशील असें साधूं शुभची सुमकार्मुका

काम, कामा, तरी तुझा करी शंकर राग कां ?
घेच संमोहनास्त्राही घेच खेचुनी या पलीं

मुकुंदकमला, घे घे, समाधिस्थ परस्परीं !
विमानांत अहा आलिंगनाच्या रतिमूर्च्छितां
अुंच अुंच अनंगा ने सुखाच्या गगनांत त्यां ?

मंजु मंजुलगीतांच्या नव निर्झरती सरी
चंद्रिका—चंद्रकान्तांचे रस स्नेह रसान्तरीं ! !
हासल्या लतिका आशीर्वाद मंगल तेधवा
शुभे, हो शिव हें तूतें नवें वर्ष ऋतू नवा !

---

# गोमांतक

होती अेक नदी नामें **दारका** तापहारका
प्रतिपच्चंद्रलेखेव तन्वंगी धवलोदका. १

हराच्या हरण्यासाठीं तो हलाहलताप गा
दंग स्वर्गांत आणी जी पापक्षालनिं आपगा, २

भगीरथसमा सम्राट् कुलांच्या वसुधातलीं,
भागिरथी महत्कार्यीं अैशा संतत गुंतली; ३

अेतदर्थेचि जे अैसें महान नसलें जरी
पुण्य होयचि दीनांचें तृष्णासान्त्वन कीं तरी; ४

असें जाणुनि, जीं गांवें तान्हेलीं बहु त्यांजला
नदी चिमुकलीशी ही जाअी पाजित सज्जला. ५

सिंहीण शावकासी ती सिंहाच्या वितरी पया
पानवे हरिणीही ही हरिणा पय द्यावया. ६

शोभवी दारकेसी हा तटग्राम लहानसा
फुलांचा झुबका कोण्या रानमोगरिला जसा, ७

हिरवी चार चौभोंती शेती दूरवरी फुलें
सिंधूंत बेट कीं तैसे गांव तींत मधें खुलें. ८

शेतीचें गीत ‘ ये बैला ’ अशा अुंच दृढस्वरी
पहाटेस अुठे गंधांच्या सह अंबरीं. ९

मोटांतूनी पडे धो धो पाणी पाणथळीमधीं
स्निग्धगंभीर नादानें मोर नाचती त्या तधीं. १०

दया जरी निसर्गाची पूर्वीपासुनिया जशी
गावावरी तया होती होती आजहि की तशी; ११

तरी सुरूपही जैसा दिसावा दुखणेकरी,
जाळिला ज्या विजेनें तो जीवे वृक्ष कसा तरी, १२

पराचक्रार्त हें तैसें गांव भार्गव की धरी
म्लानता वर्तमानाची गतगर्व मुखावरी. १३

द्वाराची भग्नवेशीच्या भिंत अेकचि ही नभीं
हृद्भग्ना अर्धशल्याचें की शेषार्ध तशी अुभी १४

देवालय महादेवाचें जें सन्निध जीर्णसें
धर्मकेन्द्र समाजाचा अेक हा अुरला असे. १५

येथे प्रदक्षिणा भोतीं घेताना युवती, मुलें
त्यांचीं गुंफित बैसावी चाफ्यांचीं गळतीं फुलें. १६

वृक्ष जो पारिजाताचा शेजारीच मठांत या
फुलांहीं तों अणी वाके गांव गर्वे भरे तया. १७

जी पारिजातकाची या कथा दंतकथा कथी
ती पूर्वी नारदा सांगे स्वयें अर्जुनसारथी; १८

की भामा रुक्मिणी आणी कोणीहि दुसरीचिया
प्रांगणीं पारिजातांसी सहू न शकली तया, १९

दोघींच्याहि तअीं अीर्ष्ये हराया सहसा हरी
वाहूनि पारिजाता दे भृगूंच्या चरणांवरी; २०

तै निजाश्रमिं ज्या देअी ऋषि वोपुनि वृक्ष की
तोचि हा मठ, हा तोची पारिजातक आणखी !! २१

दहा पांच दुकानें जीं मध्यवस्तिंत लागलीं,
रंगवूनि खडूनें जीं गेरुनेंचि चितारिलीं, २२

‘ मुखपेठ ’ असें मानी स्थला नांव मिळे तया
येती रंगेल येथेची सायंकाळि फिरावया, २३

जाता शेतां सकाळी कीं दुकानीं विधलें, तया
नळ्यांत भरुनी तेलें सांजे नेति अिथे स्त्रिया. २४

कवड्या चलनी नाणें घेत देत जिरेंमिरें
वाणी दुप्पट दामा घे—हिशोब चुकुनी बरें ! २५

तशांत मोठ्या पोटाचे ज्यांत शोभति शेटजी
दुकाना लाधली एका पेढी ही पदवी अजी; २६

मुलें भिकार तेथे जैं भीक दाटुनि मागती
पायाची आग शेटींच्या पोटा थेटचि जात ती; २७

दंडूं त्या जों स्वदेहासी शेट नीट अुभारिती
मुलें तों शकतीं जाअूं अर्धा धावुनि गांव तीं. २८

सोडूं गाअी सकाळीं जो अुशीर बहुधा करी
घेअूं मुलें गुराख्याचीं सूड त्या भटजीवरी, २९

जाता जाता कुठे त्याचीं वस्त्रें वाळत सोवळीं
दिसतांचि शिवोनी त्या काढिती पळ तत्पलीं. ३०

गावांत जोड ना ज्यासी निघतां नव मल्ल तो
यात्रे शेजारच्या गावीं जननीपद वंदितो; ३१

संभाळि बरे ! ’ आअी कथितां, हसुनी पुढे
निघे नीट जिथे यात्रा मल्लरंगण तें पडें; ३२

आणि कुस्तींत पाडोनी गडी दुप्पटसा झणीं
परते पटका जेतेपणाचा पटकावुनी; ३३

तैं स्वागता किती वेशीपाशीं ते जन दाटले
‘ जै जै ’कारांत गावाचें लघु अंबर फाटलें; ३४

संबळें वाजता चाले छाती काढुनि कीं जसें
मारूनि रावणा साकेतासि रामचि येतसे. ३५

गांवांतची तरी धाडी माहेरा नच सासरा.
म्हणूनि भाऊ बालेचा टपे संतत वासरा. ३६

येता नदीपथें भेटे, भावापाखुनिया स्वसा
मेवा किंवा मुका घेअी मेव्याहूनि मिठाससा. ३७

पंचाअीत सभा पंचांची जी वाद हरावया;
पाटील धीर गांवाचे रक्षणासि करावया; ३८

नित्यनैमित्तिका सर्वां धर्मासी करवी करी,
ग्रामोपाध्याय गांवाचीं दुरितें पळवी दुरी; ३९

दैवी भौतिक आपत्ती अैशा होवुनिया दुरी—
निश्चित अेकनिष्ठेनें शेती शेतकरी करी; ४०

मुकुटासम जैं शेती सोनेरी कणसें धरी
प्राण देहीं डुले तैसें समाधान घरोघरीं, ४१

तदा वर्षभरी जो जो अुणीव अपुली परी
कोष्टी कुंभार वंजारी सुतारादिक कीं करी, ४२

त्या त्या सहाय्यका साऱ्या निजा शेतकरी मुदें
धान्यभाग यथान्यायें विभागूनि ठरीव दे; ४३

धान्यसंग्रह वर्षासी अवश्य तितुका जना
पुरूनीहि अुरे जो की, ज्याचें संप्रति काज ना ४४

समुदायहितासी तें समाईक निधींमधें
पाटील धान्य गांवाच्या पेवांमाजि भरूनि दे; ४५
अवर्षणाचें दुर्दैवें येतां संकट भूतलीं
करील धान्यसंपत्ती लोकपोषण त्यातली; ४६
ग्रामसंख्या अशी जी की प्रतिग्राम करीतसे
लोकसत्ताकची कोणी स्वयंपूर्ण लहानसें, ४७
आसन्नमृत्यु संस्था ती आणि की जनताहि ती
परराज्यप्रबंधाच्या रोधें घेत पराकृति. ४८
मद्याचीं मध्यवस्तींत दुकानें बसलीं नवी
कशी तशी कृषी सोशी करकर्षण दानवी ४९
परी ह्या ग्रामसंस्थेच्याहुनीहि पहिली तशी
प्राणभूतचि गावाची संख्या जी दुसरी अशी ५०
ती होय हा युगस्थायी वटवृक्ष महायशा
विस्तारल्या जयाच्या कीं पारंब्या प्रतिवृक्षशा ५१
आला तो पाहुणा जाऊ शकलाचि न मागुता
पहिल्याविण या वृक्षा ऐकिल्याविण वा कथा; ५२
कीं पूर्वी ज्या दिनीं वीरोत्तंसभार्गवमार्गणें
लावी संकप सिंधूनें हटण्या शतयोजनें, ५३
त्या दिनींच तया वीरें विजयध्वजची तसा
रोपिला वृक्ष हा आणि गांव स्थापियला असा ! ५४
पार हेमाडपंती हा ! चुन्या चिखलाविना
मंत्रें बद्धशिला ! ऐसा या 'आल्या पृथवींत' ना ! ५५

अखंड जाल्यायेत्यांचे गप्पापीठचि पार ते
राजकारण गावाचें तें येथचि घाटतें ५६
‘संथागार’ दिनीं आणी पार रात्रिस होय हा
रंगभू सार्वजनिका या कुणीहि कुणी पहा; ५७
तुणतुणें तंबुऱ्यासी तें ढोलकें तबल्या भिडे
लावण्यांच्या चढाओढीसि न रात्रि पुरी पडे; ५८
ये तिथे फिरता साधू धुणी लावुनिया बसे,
प्रार्थिना बहुती सांगे लवदेश कुठें कसे. ५९
वदे चिलमिच्या, शब्दीं शब्दीं, सोडित जो धुरा
विलायत कशी आहे काशीच्याचि पुढे जरा; ६०
अवधूत असो, प्रेमें वधूहि वट वृद्ध तो
अुपासितां, नव्या वृक्षा किती मत्सर वाटतो! ६१
तया वंद्य वटाध्यक्षत्वाच्या वत्सल सावली—
खाली जशी प्रजापक्षें छावणी अपुली दिली, ६२
तशीच चावडी ही हीं, लुप्तश्रीक अजी तरी
कैं कैं राज्याधिकाऱ्यांचा शिबिरध्वज ती धरी, ६३
जसें त्या दिवशीं : कीं जैं येताति फिरतीवरी
मामलेदार तैं गांवीं कोण धांदल ती तरी! ६४
जो तो ह्या त्या निमित्तें त्या पंथें जात विलोकुनी
भीत भीत दुरोनी त्या धूमकेतु जसे कुणी; ६५
जरी पाटीलबोवांच्या भव्य गालमिशा कधी
तशीच कुळकर्ण्यांची लेखणी लवचीक ती ६६

खूपची वाढवीती तन्महत्त्व भय अंतरीं
मनीं गावकऱ्यांच्या की त्याचि अेक दिनीं तरी ६७
मामलेदार जैं जाता फिरती करुनी घरा
ध्यावया मुजरा त्यांचा मान वाकविती जरा. ६८
साऱ्या गावांत ह्या साधे प्रिय आणि सुशीलसे
कुटुंब हे विप्राचें सुप्रतिष्ठित हें असे ७७
श्रीमहामंडलाधीशा कदंब नृपतीचिया
कालांत धर्मवित्त्वाचा होता मान कुलासि या; ७८
पुढे ज्या दुर्दिनीं देशाचें या दैव फुटोनिया
स्वातंत्र्याची अहा गेली तलवार तुटोनिया ७९
त्या दिनीं ह्या कुलाचेही पडले नर झुंजुनी
पूर्वी सभांगणी तैसे आता धर्म रणांगणीं ८०
तुरुष्क अधिकारी तो एकदा सहजी करीं
एका स्त्रिये कुलाच्या या गुलाम म्हणुनी धुरी ८१
आणि अैश घृता अन्या हिंदुस्त्रीसह ती प्रती
विकूनि अरबी एका जहाजावरि धाडिती, ८२
अैकतो की मनुष्याची पुरे वाटुनिया दया
अुडी टाकुनि नक्रांच्या घेती सिंधूंत आश्रया. ८३
तुरुष्कीय घणें नाना देवता पळता दुरी
'श्रीमंगेश' अणी! 'शान्ताभवानी'च टिके घरीं ८४
प्रख्यात तींहि की देवस्थानें भंगु पुढे जअीं
पुर्तुगीज अुभारोनी सवाअी घण ये तअीं ८५

जाज्वल्य त्याहि दो होती मूर्ति कंपित अंतरीं—
देवही दुबळ्यांचे की असणार किती बळी ! ८६
प्राणासही न पाहोनी भक्त ब्राह्मण जे तदा
मूर्तींत घेउनी झाले गुप्त देखत देखता। ८७

ब्राह्मणांत तया होता अेक ह्याहि कुळातला
अंत्रुजीं स्थापुनी देवी केलें लज्जित शत्रुला : ८८
दैविका दैशिका अैशा वादळातुनि वाचतां
अेकची वंशवृक्षा या अुरे अंकुर जो अता ८९
युवा तो निवसे गेही त्याचि पूर्वजपूजिता
जाता माता अणी मागोमाग स्वर्गपथें पिता. ९०
प्रिया त्या समची त्याची युवतीच वयें जरी
गृहिणीपद कर्तव्या प्रौढा पूर्ण तशी करी; ९१
गृह निर्मल सैंपाक सुरसाल तिचा सदा
गमे लहानथोरांशी व्हावीशीच प्रियंवदा; ९२
आग्रहें वडिलां सेवी लहानां शिकवीतसे
वाणीने वेतनाहूनी सेवका सुख देतसे; ९३
ती सदा ऋणको येता तिच्या शेतकरी घरीं
भाकरी अून दे जी तत्स्मित स्वादुतरा करी; ९४
आपल्या आंबराअीच्या आंब्यांहीं घर जैं भरे
सुरंग, सुरस, स्वादु ते ते वेचुनि ती करें, ९५
सुवासिनीस जातींच्या सर्व बोलावुनी घरीं
अंगणी आम्रराशीतें तयांच्या लुटवी करीं; ९६

अंबेचा स्तन वा प्यावा अंबा कांचनगौरवा
स्तनंधयें दो लोभांच्या मध्ये स्तंभित तेधवा, ९७

किंचित् कोपी तरी होता प्रेमकोमल तत्पती
जीव कीं प्राण ते लेखी तिज जेवि तयास ती; ९८

वेणी घाली तिची हस्ते, प्रेमे न्हाणि तिला स्वयें
लाजता ती तिशी रागें क्षणमात्र वदू नये. ९९

---

## पद

महत्ब्रह्मयोनींत महेश्वरवीर्य धरी चंडिका।
जगाची जननी ही पिंडिका ॥
गर्भवतीचे दिगुदर दाही दिशा फुगेत्या पळा !
लागल्या काळाच्याहि कळा ॥
ब्रह्मांडाचा पिंड तेधवां प्रसवे हा, ती अजा।
सर्व ही भगवंताची प्रजा ॥
मूर्ति कृमीपासूनि कार्तिकापर्यंतहि ज्या ज्या !
सर्व त्या भगवंताच्या प्रजा ॥
( चाल ) हा दांड पोरटा मानुष बहु हावरा।
पितरांचा वारस वदता मीच कीं खरा !
तरि मूषक जावो अन्य कुणाच्या घरा !
भोग मूषका स्वेच्छ प्रभूच्या प्रेमाची चंद्रिका
जगाची जननी ही पिंडिका ॥

झाला जो तो मनीं बोलू लोक अिच्छुक तैं परी
झाला प्रत्यक्ष बोलूं ना शक्त अेकहि त्या पळीं. ६५८
तथापि जो धृतामाजी, पासुनी पहिल्या क्षणा
रांगे रांगे अुभा पाही अंतुनीस पुनःपुन्हा ६५९
बद्धोच्छृंखल वाजी की खिंकाळूनि परोपरी
मनीं धुमसल्या वेगा मार्ग फोडूनि दे वरी. ६६०
खोकूनी खाकरोनी वा बळेंचि वरचेवरी
आंतली तेढ जो होता व्यक्तवीत परोपरी ६६१

संधी ती त्या मिळे पंतोजीस मात्र खरी ! झणीं
वक्रस्मितें वदूं लागे, हो कल्याणचि ! अंतुनी ! ६६२
पाखंडोच्छेदनीं, भक्ता तुझे जीवनची सरो,
ब्राह्मणाशी, तुला पाखंडीय हा पुरुनी उरो !! ६६३
धन्य प्रसव[13] तो, धन्या प्रसू[14] अक्षतकन्यका
धन्य सद्धर्म, ना तेथे धर्मशासन[15] धन्य कां ॥ ६६४
वधः कार्यो न जीवानाम् येशूक्ती प्रथमा अशी
अेतदर्थचि तूं जीवा वाधिता नचि-जाळिशी ! ६४५
'पारदार्यमकर्तव्यं' येशूक्ती[16] म्हणुनी भयें
बलात्कार करा अन्यां कुमारीच वरी स्वयें ६६६
'निषिद्धमपि चौर्यं च' येशूक्ती करण्या पुरी
लूटमारीमधें तुम्ही चोरी सोडुनिया दिली ! ६६७
'मा गृधो गर्दभं कस्य' अुक्ती ही करण्या खरी
गर्दभा सांडुनी पागा घोड्यांची बळकाविली ! ६६८
'मा गृध[17] कस्यचित् किंचित्' ह्या आज्ञेस्तव आणखी
किंचित् सोडुनि सर्वस्वी राज्येंची गिळिलींत की ६६९
आज्ञा अक्षरशः अैशा पूज्य बायबलांतल्या
पाळुनी त्यावरी सर्वां कळसा चढवावया ६७०
'दोषचर्चा कराची ना न्यायदंड धरा न वा'
आज्ञा पाळिन ही ही अन्याय दंड धरा तुवां ! ६७१
धर्मशासक हो, देती धन्यवाद तुम्हांप्रती
रक्तस्नाता बलभ्रष्टा कुमारीही पथीं पथीं ६७२

पाखंड अश्वमेधाचें बंड मोडुनि त्या क्षणीं
नरमेध नवे युष्मद्दिग्जया प्रथिती नीं ! ६७३

नवाग्नि नरमेधांचा घेवो ती पदरांमध्यें
ब्राह्मणासीहि या ! दाना, अंतुनी, मज याच दे ! ६७४

रोधिलें म्यां तुझ्या धर्मप्रचारासि परोपरी
प्रान्तांत या; न कां शाळा स्थापिल्या बहु तूं परी? ६७५

सेवेंत ना तुझ्या आलों, भांडलों तुजशी स्वयें
श्रीगणेशाविनाची की अक्षरा शिकवूं नयें; ६७६

माझे वाढदिनोत्साही होते अंगहि काळच्या;
राशी त्या अपराधांच्या माझ्या सर्व जरी तुझ्या ६७७

आगीसी पेटवीतीना धर्माच्या, तरि अैक, मी
प्रार्थितों नित्य देवासी, प्रकाशीं अथवा तमीं, ६७८

की हें राज्य अविंधांचें जावो सत्वर जा लया
दे महाराष्ट्रधर्माच्या खड्गासी प्रभुजी जया ! ! ६७९

---

अिकडे परि ती कुमार आणि कुमारी
आफ्रिकेत त्या अेक घोर अरण्यीं

निभृत कुटीमाजी जाअूनि राहिलीं
मूरस्त्रीसह अेका जी तयांप्रति
मूरवेष देअुनि छपवूनि टेविते
ही मूरा हेमगौर कन्यकेसि त्या
होती पितृगेहींची पूर्व परिचिता.

मागेही पोचवुनी– और असाची
स्वगृही स्पेनासि अेक मिळवि बहु धना.
मूरेंने त्याच मुळीं कन्यकेसि त्या
हुडकुनिया पळण्याच्या रचियलें कटा
प्रचुरधनाशेने नव त्या कुटीमधे
लिली आणी शंकर अेकत्र निवसतां
घोर अरण्यही गुरुकुल अेक होतसे
प्रीतीचें भीतीचें आणि नीतिचें.
सत्यें हीं काही आहेत सृष्टिचीं
जी न पौरजीवनांत बुद्धिसी कदा
होणारीं पूर्ण जन्म. जी पुरातना
कान्तारान्तर्गत, अस्पृष्टजनपदा
निबिड चितेंतचि प्रत्यक्षत्व पावती.
जन्मस्थानींच मूळ जीवसृष्टिच्या
जीवसृष्टिची स्वभावनग्नता दिसे.
सुखद कल्पना वितता ह्या हिरण्मया
पडद्यांमधिं नागरिकां मानवाचिया
सत्याचे अुग्र रूप पिहित हें असे.
आफ्रिकीय घोर अरण्यांत सृष्टि त्या
नग्नपणें हिंडतसे पूर्वि अेकदा
रामाच्या काळी वा भारतामधें
जेंवि दंडकारण्यादिक महावनीं :
मेढ्यांसि चरणांमधिं झट्ट अुचलुनी
आकाशीं अुडती ते खातखातची

मांसाशन घोर गरुड घार गिधाडें
विहगां मारूनि विहग जीवती तिथे.
नक्र आणि सुसरी जबड्यांत गटकनी
ज्या गिळिती वासुरांसि जळ पितां पितां :
अजगर जें कवळीत न दोन जणांच्या
मावावें पृष्ठ असे. लांब आणखी,
सीत्कारासह दुरोनि बदक कोंबडीं
आणि कुणी तर कुतऱ्या कोंकरांसही
खेचुनिया श्वासानें रज्जुने तसें
गिळितातीं बसल्या बसल्याचि भुकेसी :
विषधर जे चावताच थोर वृक्षही
कडकडुनी करकरोनि सुकुनि जळाले :
पन्नग ते अुडते जे भक्ष्य निसटता
ओघाने अुडत अुडत पाठ पुरविती
पन्नागरि जों ना त्या धरुनि अंबरी
भिरकावित वा अुंचुनि आपटूनिया—
भूमीसी हाडेची खिळखिळी करी.
मत्त मदिष लाल लाल नेत्र सहजसे
धक्क्याने वृक्ष अुमन्ळूनि पाडिती
व्याघ्र पुच्छ आपटते, पाहतांच ज्या
महिष आणि वृषभ पाय गळुनि बैसती !
ऋक्ष आणि चित्रे रक्तार्द्रमुख सदा !
कपिहि दोन दोन पुरुष अुंचिचे अुभे
पुच्छहीन हनुमान प्रबळ, पाहता

ज्या याची शंका वा नरचि ते अुभे
वानर वा वननर ज्या म्हणुनि बोलती
त्यातुनिही आफ्रिकीय गोरिले कपी
पूर्वपुरुष निःसंशय नेमल्या तरी
बार्बरीय मनुजांचे गमति जे मना.
अुंच आणि आयत अुड्डाण भीषणा,
ते कपी प्रचंड देह ज्या भयंकरा
शाखांसी आणि शिलावर्ष वर्षल्या
झुंजी घेतात मनुज झुंजती तशा
त्या बघतां रामायणवर्णनांतल्या
कपिवानर वीरांच्या अद्‌भुता कथा
वाटति ना पूर्ण निराधार काव्यशा
कळप लांडग्यांचे, मातीत पुरोनी
काहीसी आमुख, मग अितर दुरोनी
हरिणांच्या कळपा भुलवीत नेति; जो
आयतीच पडती तोंडात अकस्मात्
हरणें ती लपलेल्या लांडग्यांचिया
मग मिळुनी सर्व तया फाडिती मृगा
रक्त पिती मांस वसा खाति कचकचा !
मत्त मतंगज प्रचंड चालती जसे
पर्वतची काय ! अेक पाय ठेवुनी
चेंदितील नर जे — अळअीस नर जसे.
आणि तसे गजहि मतंगजहि कांपती
चळचळ ज्या क्रकच क्रूराग्र नखींन्द्रा
सिंह असे शरभ असे रक्तपिपासू ! ! !

# बाजीप्रभूचा जयजयकार

जयोस्तु ते श्रीमहन्मंगले शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशो-युतां वन्दे॥

स्वतंत्रते भगवती ! या तुम्हि प्रथम सभेमाजी
आम्ही गातसो श्रीबाजीचा पोवाडा आजी ॥

चितोडगडिच्या बुरुजांनो त्या जोहारासह या
प्रतापसिंहा प्रथित-विक्रमा या हो, या समया ॥

तानाजीच्या पराक्रमासह सिंहगडला येऔ
निगा राखो महाराज रायगडकी दौलत आऔ ॥

जरिपटका तोलीत धनाजी संताजी या या
दिल्लीच्या तख्ताची छकलें उधळित भाऔ या ॥

स्वतंत्रतेच्या रणांत मरुनी चिरंजीव झाले
या ते तुम्ही राष्ट्रवीरवर, या हो या सारे ॥

घनदाट सभा थाटली । गर्जना उठली । घोर त्या कालीं
जय स्वतंत्रतेचा बोला
जय राष्ट्रदेविचा बोला
जय भवानिकी जय बोला

तुम्ही मावळे बोला हरहर महादेव बोला
चला घालु स्वातंत्र्य-संगरी रिपूवरी घाला ॥ १

हरहर गर्जुनि सर्व मावळे वीर सज्ज असती
परंतु कोठे चुकले बाजी यांत न कां दिसती ? ॥

खबरदार यमदूता ! पहुडे श्रीबाजी प्रभु हा
स्पर्शु नको तद्विद्युत्तजःपुंज दिव्य देहा ॥

स्वतंत्रतेच्या पूर्वी हा रणतीर्थाला गेला
देशशत्रुरक्तात न्हाअुनि लालभडक झाला ॥
त्याच्या वक्ष:स्थळी रुळे रिपु-रुंडांची माला
तीवर हरहर महादेव हा घोर मंत्र जपला ॥
बघ देवदूतही आले। सूर्य हे आले। अिंद्र हे आले
सुरगुरु सुरतरु सारे
आणि देव वर्षती तारे
मधु मृदुल वाहती वारे
ओवाळी सत्कीर्तिसुंदरी श्रीमत् बाजीला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ १७

दिव्य धुनीचा चकचकाट का विश्वोदरिं भरला
रथ श्रीमती स्वतंत्रताभगवतिचा अवतरला।
अूठ चितोरा अूठ देवीला अुत्थापन द्याया
प्रतापसिंहा प्रथित विक्रमा अुठि मंगल समया ॥
भूमातेच्या तान्ह्या अुठि का वीत-चिंत व्हा ना।
असे कुशल रांगव्यात तुमचा जिवलग शिवराणा ॥
स्वतंत्रतेचा हा पोवाडा अैकाया आला
अुठा सर्व स्वतंत्र्यवीरवर जयमंगल बोला ॥
श्रीस्वतंत्रता भगवती। आपुल्या रथी। बाजिला घेती
गंधर्व तनन तों करिती
दुंदुभी नभी दुमदुमती
श्रीबाजी स्वर्गा जाती
करी चराचर विश्व बाजिच्या जयजयकाराला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ १८

तदा मराठे रणीं पहुडले जे आणिक सुर ते
पावनखिंडित बसुनी तिजसह जाति नभःपंथें ॥

श्रीबाजीचे रक्त पेरिलें खिंडित त्या काला
म्हणुनि रायगडिं स्वातंत्र्याचा थोर वृक्ष झाला ॥
अहो बंधुनो ! पूर्वज ऐसे स्वतंत्र रणगाजी
स्वतंत्र त्या पूर्वजां शोभता वंशज का आजी ? ॥

विनवि विनायक यांतिल घ्यावें समजुनि अर्थाला
चला घालु स्वतंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥

स्वराज्य नाही स्वदेश नाही धिक् या देहाला
चला घालु स्वतंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ १९

# श्रीशिवाजीमहाराजांची आरती

जयदेव जयदेव जय जय शिवराया ।
या या अन्यशरणा आर्या ताराया ।। ध्रु. ।।

आर्यांच्या देशावरि म्लेंच्छांचा घाला ।
आला आला सावध हो शिवभूपाला ! ।।
सद्गदिता भूमाता दे तुज हाकेला ।
करुणारव भेदुनि तव हृदय न कां गेला ? ।। १

श्रीजगदंबा जीस्तव शुंभादिक भक्षी ।
दशमुख मर्दुनी जी श्रीरघुवर संरक्षी ।।
ती पूता भूमाता म्लेंच्छांही छळता ।
तुजविण शिवराया तिज कोण दुजा त्राता ? ।। २

अस्त अम्ही दीन अम्ही शरण तुला आलो ।।
परवशतेच्या पाशी मरणोन्मुख झालो ।
साधु परित्राणाया दुष्कृति नाशाया ।
भगवन् भगवद्गीता सार्थ कराया या ।। ३ ।।

ऐकुनिया आर्यांचा धावा गहिवरला ।
करुणोक्तें स्वर्गी श्रीशिवनृप गहिंवरला ।।
देशास्तव शिवनेरीं घेई देहाला ।
देशास्तव रायगडी ठेवी देहाला ।।
देशस्वातंत्र्याचा दाता जो झाला ।
बोला मत्श्रीमशिवनृप की जय बोला ।। ४

## अनंताची आरती

निरंजनासी निरांजनाचा देवा दीप तुला
दाविती देवा दीप तुला ॥ ध्रु० ॥

आकाशाच्या अंगणात तव
सूर्यसहस्त्रीं जो दीपोत्सव
पाजळिती हे पणती अपुली त्यास करूं साजरा
दाविती देवा दीप तुला ॥ १ ॥

सूर्यसहस्त्रींही जो उरला
पणतीने तो जाई स्फुरला
नयनीं ऐसा अंधकारत्व आहे तोचि भला
दाविती देवा दीप तुला ॥ २ ॥

आईच्याची बागेमधुनी
ताजींताजीं वेंचुनि वेंचुनि
मुलें गुंफिती आईच्याची वेणीतूनि फुला
दाविती देवा दीप तुला ॥ ३ ॥

## टीपा

**पवनलीला** — स्वा. सावरकरांच्या ' मूर्ति दुजी ती ' यांतील रौद्र–कठोर मनोवृत्तीच्या अगोदरची काव्यात्म वृत्ती. संयमपूर्ण रसिकतेचा मनोज्ञ आविष्कार यात आहे.

**विश्वांत आजवरि** — या काव्यात प्राचीन काळच्या साम्राज्याचा विनाश अनेक उदाहरणांनी दर्शविलेला आहे.

**स्वतंत्रतेचे स्तोत्र** — या कवितेचे ध्रुपद संस्कृतमधील द्विपदी आहे. सन १९०३ सालीच कवीचे मन स्वातंत्र्यभावनेने किती भरून गेले होते ते या काव्यावरून कळते. सन १९०६ साली रचलेल्या बाजीप्रभूच्या पोवाड्याचे — या संग्रहात " बाजीप्रभूचा जयजयकार " या शीर्षकाने ज्यातला थोडा अंश समाविष्ट केलेला आहे त्याचे — प्रारंभीचे चरण या स्तोत्रातले पालुपदाचे चरणच आहेत.

**सिंहगडाचा पोवाडा** — या सुप्रसिद्ध पोवाड्यात रूपकमूलक उत्प्रेक्षा, उदा.— ' शिवकरिचा भाला गळतो ', किंवा ' तानाजि चढू लागले... स्वातंत्र्य चढू लागले ' यांतला ' सार ' म्हणजेच Climax हा अलंकार, हे विशेष अगदी स्वाभाविक ओघात आणि ' मराठी ' शैलीत साधलेले आहेत. ' शेणामाजी... शेणकिडे ' सारख्या ओळी म्हणीसारख्याच झाल्या आहेत.

**तारकांस पाहून** — स्वा. सावरकर १९०६ साली विलायतेस जात असता आगबोटीमध्ये रचलेली कविता. घर, प्रियकर माणसे यांच्या भेटीची हुरहुर लागली तेव्हा सुचलेल्या कल्पना यात गुंफलेल्या आहेत. या काव्यातील कल्पनाविलास विस्मयकारक आहे; उत्प्रेक्षा-रूपक-अपन्हुतींची यात रेलचेल आहे. शैली संस्कृतनिष्ठ आहे, आणि आतील पौराणिक संदर्भामुळे ती आधुनिक विद्यार्थ्यांना अगम्यशी बनली आहे; पण थोड्या श्रमाने व बहुश्रुतपणाने त्यातील प्रतिभाविश्व आकलन होणे अशक्य नाही. ' सुवर्णगोरा गौरीश्रीहर० ' वगैरे चरणांत प्रथम ' लीलारत ' याऐवजी ' सुरतमग्न ' पाठ होता. डॉ. स. गं. मालशे यांनी ' ललित ' ( मार्च १९६६ ) च्या अंकातील आपल्या लेखात दर्शविल्याप्रमाणे शरीरसापेक्ष शृंगारिक कल्पनेशी मूळ पाठ अधिक जुळतो. मात्र कवीच्या संमतीनेच हे ' पाठान्तर ' घडलेले आहे.

**प्रभाकरास** — स्वा. सावरकरांचा पहिला मुलगा चि. प्रभाकर चार वर्षांचा

होऊन वारला. तेव्हा त्याच्या स्मरणार्थ युरोपमध्ये लिहिलेली कविता. स्वातंत्र्यशाहीर व महाराष्ट्रभाट विनायकरावांच्या कवितांत यासारखे वैयक्तिक व ' हळवे ' काव्य अपवादात्मकच म्हटले पाहिजे. ' श्री गोविंदाते ' म्हणजे स्वातंत्र्यकवी गोविंद यांना.

**सागरास** — विलायतेत असता अभिनव भारत संस्थेवर ब्रिटिश सरकारची वक्रदृष्टी वळल्यामुळे, आता मायभूमीचे दर्शन व प्रियजनांची भेट होणार नाही या निश्चितीमुळे समुद्रकाठी सुचलेले विचार. या अप्रतिम भावकाव्यात स्वातंत्र्याची तळमळ प्रसन्न शैलीतून स्पष्ट उमटली आहे. ' ती आम्रवृक्षवत्सलता ' वगैरे अंतऱ्यात पर्यायाने पुढील अर्थ संभवतो– आम्रवृक्षवत्सलता म्हणजे ज्येष्ठ बंधू बाबांची पाखर; ' नवकुसुमयुता सुलता ' म्हणजे तारुण्याने बहरलेली पत्नी व इतर महिला; ' बाल गुलाब ' म्हणजे ' बाळ ' किंवा धाकटे बंधू डॉ. नारायणराव सावरकर. या काव्यावर स्वातंत्र्यवीरांच्याच संमतीने परिष्करणाचे संस्कार घडलेले आहेत.

**सान्त्वन** — सन १९०९ च्या जूनमध्ये ती. बाबांना जन्मठेपेची शिक्षा झाली व पुढे चि. बाळ ( डॉ. नारायणराव सावरकर ) यांना अटक झाली. त्या वेळी ती. बाबांच्या पत्नींना — ती. वहिनींना — पत्ररूपाने लिहून पाठविलेली कविता. रामदासी स्फुट प्रकरणातल्या ' संभाजीराजास पत्र ' या प्रकरणाशी यातल्या ग्रान्थिक ओवीची आणि तळमळजिव्हाळ्याची तुलना सहज होऊ शकेल. प्रगल्भ असूनही भावाकुल अशी ही कविता मराठी भाषेचे भूषण होऊन बसली आहे. ' गजेन्द्रशुंडेने० ' वगैरे ओळींत गजेन्द्रमोक्षाच्या पौराणिक कथेचा संदर्भ आहे.

**माझे मृत्युपत्र** — सन १९१० साली सावरकरांना अटक झाली तेव्हा त्यांनी आपल्या पूज्य ती. वहिनींना निरोप म्हणून लिहून पाठविलेली कविता. पूजनीय वहिनींना उद्देशून लिहिलेल्या या कवनात स्वातंत्र्यवीरांचा ऊर्जस्वल ध्येयवाद पूर्णपणे प्रकट झाला आहे. ही कविता विचारांच्या भाराने गद्यसदृश व्हायचे टळले आहे तें त्यातील मित्रपरिवाराच्या आणाभाका वगैरे तपशिलाच्या संदर्भामुळे व उत्कटमुळे. यांतले ' की घेतले व्रत न हें ' आणि ' हे मातृभूमि तुजला ' या चरणांनी सुरू होणारे दोन ( वसंततिलकाचे ) श्लोक मराठीतील चलनी नाणीच बनले आहेत.

**आत्मबल** — मनाला धीर येण्यासाठी ध्येयवादाचे विचार यात पद्यबद्ध केलेले आहेत. ' हलाहलाऽऽ त्रिनेत्र तो ' यात त्रिनेत्र शंकराने हलाहल गिळल्याच्या कथेचा संदर्भ

आहे. छंदाबाबत ही कविता लक्षणीय आहे. ' चामरा 'च्या ' — ७ ' किंवा ' ७ — ' ' गाल '–' लगा ), या द्व्यक्षरी गणांनी साधलेल्या ओळी सहजी षण्मात्रक ' धवलचंद्रिका ' या मात्रावर्तनी रचनेत परिवर्तन पावल्या आहेत. याच ओळी निर्यमक, प्रवाही होताच सावरकरांचे ' वैनायक ' वृत्त तयार होते.

**सायंघंटा** — अंदमानात १९१२ साली लिहिलेली ही कविता म्हणजे जंगली ' मले ' जातीच्या कैद्याबरोबर कवीचा भावनाकल्लोळ उडवून देणारा झालेला संवाद होय. कैद्यांना संध्याकाळी कोठड्यात कोंडण्यासाठी होणारी तुरुंगातील ' सायंघंटा ' येथे प्रतीकरूप बनली आहे. या काव्यात जेलखान्यात सायंकाळी सुटीची वाजणारी घंटा प्रतीक रूपाने उपयोजिलेली आहे. ती ' दिवस-मृत्युघंटा ' म्हणजे ' दिनान्तिका ' ही बंदिवासात दिनरूपी एकेका शत्रूच्या हत्येची खूणच बनते ! यात निर्यमक धावते पद्यपरिच्छेदमय ' वैनायक ' वृत्त आहे.

**मूर्ति दुजी ती** — या संग्रहाला शीर्षक म्हणून लाभलेली ही कविता लिहिली गेली अंदमानात, सन १९१० नंतर; पण तीमधील तुरुंगाची पार्श्वभूमी लंडनच्या पोलिसचौकीतील निरुद्ध कोठडीतली आहे. अभूतपूर्व अशा बाह्य भौतिक गारठ्याचा परिणाम मानसिक उत्साहही गारठण्यावर होऊ नये म्हणून मनाची केलेली ही समजावणी आहे. स्वातंत्र्यवीर कवीच्या काव्यामागची भावनामय बैठक आणि क्रान्तिवाद या कवितेत संपूर्णपणे व्यक्त होतात. म्हणून प्रस्तुत संग्रहाला या कवितेचा मथळाच शीर्षक म्हणून दिलेला आहे. भारपूर्वक कथनशैलीसाठी यातील वाक्यरचना अंतर्वक्र inverted झालेल्या आहेत. शब्दसंहती अर्थगौरवार्थ संस्कृतनिष्ठ आहेत; अंतर्गत अनुप्रास जागोजाग आहेत. कवितेच्या ' मधुर ' आणि ' भयंकर ' मूर्तींचा प्रतिद्वन्द्वी विरोध उत्तम प्रकारे प्रकट झाला आहे. कविवृत्तीतील ' मूर्ति दुजी ' श्रीबंदावीर या आख्यानवजा उत्तरार्धात रंगविलेली आहे. ध्येयाची व कवितेची ' दुजी मूर्ति ' यात प्रतीकरूपाने दर्शन देते. यातही प्रवाही ' वैनायक ' वृत्त उपयोगिले आहे. रामदासांची ' लवथवती विक्राळा ' इत्यादी आरती या कवितेच्या संदर्भात लक्षात घ्यावी.

**हलाहलबिंदू** — ' गोमांतक ' काव्यात वर्णिलेल्या भार्गवगावाच्या मठातील साधूने श्रीशंकराची केलेली प्रार्थना. पण ती वेगळ्या स्फुट काव्यरूपाने प्रथम लिहिली गेली. उत्प्रेक्षात्मक कल्पनांचा एक उत्कृष्ट विलास या शंकरप्रार्थनेच्या काव्यात आढळतो.

**जगन्नाथाचा रथोत्सव** — या कवितेतील जगन्नाथमंदिरातील रथोत्सवाचे भव्य रूपक केवळ अनुपम आहे. त्याला साहाय्यक म्हणून अनेक रूपकगर्भ उत्प्रेक्षा योजिलेल्या आहेत. वेदकालीन सवितृदेवतेशी यातील मध्यवर्ती विचारकल्प (concept) समान्तर आहे.

**सूत्रधारास** — या काव्यातही भव्य रूपक आहे. नियतीरूप सूत्रधार जीवन-नाट्याचा प्रयोग करीत असल्याची कल्पना येथे अभिप्रेत आहे.

**अज्ञेयाचे रुद्धद्वार** — अनंताच्या– अज्ञेयाच्या घराला असंख्य वाटांनी जाता येते. पण आपणाला तो मार्ग गवसत नाही. अखेरीस कळत-नकळत आपण जेथून सर्व मार्ग फुटतात त्याच घराकडे, मूळ चैतन्यगर्भाकडे, वळलेले असतो, येऊन ठेपलेलेही असतो. ' युगाच्या कोशशिला ' = युग हेच अनंताच्या अंतराचे माप, तोच कोस; अशा दरेक युगान्तराचा एकेक कोसदर्शक दगड; (दोन-दोन) मैलांचे खांब, mile-stones. ' अणूंचे बोगदे ' म्हणजे ज्यांत प्रवेश करणे कठिण असे निरुंद कण. त्या वेळी अणूचा छेद झाल्याचे वृत्त कवीला कळलेले नसावे.

**मरणोन्मुख शय्येवर** — अंदमानात स्वा. सावरकरांची प्रकृती ढासळत होती तेव्हा मृत्यूच्या छायेखाली सन १९२१ च्या सुमारास लिहिलेली कविता. अंदमानात ' मृत्यूच्या गंभीर छायेखाली ' लिहिलेली ही कविता शय्येवरील मृत्यूविषयीची स्वातंत्र्य-वीराची कल्पना व्यक्त करते. मृत्यू हे जीवनातील मधुर प्रेममय सुखक्षणांचे मूल्य होय व ते मूल्य द्यावयासाठी असह्य यातनाही कर्तव्य म्हणून सुसह्य मानावयास कविमन स्वतःची तयारी दर्शवीत आहे. यातही संमिश्र कौंसरूप ( पॅरेन्थेटिकल paranthe-tical ) उपवाक्यांच्या आश्रयाने व अंतर्वक्र शैलीमुळे आशयांचे गूढ गर्भगृह अधिकच निगूढ बनतें. सावधान व व्युत्पन्न वाचकाला मात्र यात रसप्राप्ती झाल्यावाचून राहणार नाही. यातही सावरकरांचे वैशिष्ट्यपूर्ण ' वैनायक ' वृत्त वापरलेले आहे.

**विरहोच्छ्वास** — ' कमला ' काव्याचा नायक मुकुंद याचा मुकुल हा मित्रच. कमला–प्रेमला या त्यांच्या नवोढा सहचारिणी. त्यालाही मुकुंदाएवढाच सुखाचा क्षण लाभला. त्याला या प्रेममीलनाची स्मृती आणि नंतरची विरहवेदना कशी छळते याचे या खंडकाव्यसदृश दीर्घ काव्यात प्रतिबिंब उमटलें आहे. ध्येयासाठी सर्वस्वाचे बलिदान करताना असे प्रसंग अटळ असल्याने मुकुल अनेक प्रकारे आपल्या व्याकुल

मनाची समजूत घालीत असतो. तेच विरहाचे सुस्कारे होत. बंदिस्त कवीच्या व्याकुळ मनाची अवस्थाच जणू या नायकाच्या उद्‍गारांच्या द्वारा आपणापुढे चितारली गेली आहे. काव्याची ' अक्रूर ' गीताची चालही करुणगर्भ विप्रलब्ध उद्‍गारांना पोषक आहे. मुकुल हा मृत्युदंडाची अपेक्षा करीत काळ्या कोठडीत काळ कंठीत आहे व पूर्वस्मृतींना उजळा देत आमिषांचा त्याग करायला धैर्य मिळवीत आहे. या स्मृती ' अक्रुर ' जातीच्या कडव्यांत विरहवेदनेच्या धाग्याने गुंफलेल्या आहेत.

**कमला** — ' कमला 'नामक खंडकाव्यातील निवडक उतारे यात दिलेले आहेत. पानिपतविषयक संकल्पित महाकाव्याचा हा एक खंड आहे. कमला व मुकुंद ही बालपणीच विवाहबद्ध झालेली होती. कमलेच्या ऋतुशान्तीनंतर प्रथमच त्या दोघांचे मीलन ज्या रात्री घडते त्याच रात्री, त्याच क्षणी, मित्र मुकुल त्याला श्रीमंत प्रभु भाऊंचा आदेश सांगावयास सैनिकवेषात येतो. दोघेही आपापल्या प्रिय नवोढा पत्नींचा वियोग सहन करीत हिंदुपदपादशाहीच्या रक्षणार्थ रणांगणावर जातात. १ ते १०६ ओळींत कमलेच्या बहरलेल्या फुलबागेचे विविध उत्प्रेक्षांनी व उपमांनी सजलेले कल्पनारम्य वर्णन आहे. १२८ ते १९० या ओळींत त्या आरामबागेची देवताच अशा कमलेचे वर्णन आहे. २६५ ते ३३२ या ओळींत मुकुलरूपी भ्रमराने कमला-कळीच्या पहिल्या चुंबनाची केलेली मनोज्ञ चोरी वर्णिलेली आहे. पुढच्या उताऱ्यात कवीने कमलेच्या पोटी कोण कोण ' संभवा घेणे संभवनीय असेल ' याचे भविष्यवादी कथन केलेले आहे, आणि देवदेवतांचे मंगल आशीर्वाद वर्णिलेले आहेत. अभिजात संस्कृत काव्याच्या संकेतांनी ही वर्णने आकारलेली आहेत. संदर्भ-उल्लेख अनेकानेक आहेत. असे असले तरी एकंदर थाट अद्‍भुतरम्य महाकाव्याला सहज अशा कल्पनाप्रतिमांनी सजलेला आहे. काव्याचे वृत्त, आर्ष महाकाव्याच्या धर्तीवर, ' अनुष्टुभ ' आहे; पण ते सयमक आहे. ' वैनायका 'ची घडण अजून झालेली नव्हती.

**गोमांतक** — पानपतच्या रणसंग्रामविषयीच्या महाकाव्यातील ' गोमांतक ' हा दुसरा दुवा प्रदीर्घ आहे. येथे यातले काही उतारे दिलेले आहेत. पहिला उतारा १ ते ६८ अनुष्टुभ श्लोकांचा आहे. त्यात भार्गव नामक गोमंतकीय काल्पनिक गावाचे कल्पनारम्य वर्णन आहे. श्लोक ७७ ते ९९ मध्ये त्या गावातील रमा–माधव या तरुण विप्रदंपतीचे वर्णन आहे. नंतरच्या पदात महेश्वर–चंडिकेच्या संदर्भात गर्भसंभवाची,

रूपकाच्या साह्याने, महती वर्णिलेली आहे. गुंफलेली आहे. अनुष्टुभ.—श्लोक ६५८ ते ६७९ या उताऱ्यात अंतुनी नामक पुर्तुगीज अधिकारी रमामाधवादींचा धर्मच्छल कसा करतो ते व्याजोक्तींच्या व उपरोधोक्तींच्या साहाय्याने सांगितले आहे. रमामाधव आपल्या लहानग्याचा वाढदिवस साजरा करतात; पण तेही धर्मकृत्यच मानून अंतुनी त्यांना पकडतो पण ते निसटतात; पण पुन्हा ते पकडले जातात व त्यांचे हालहाल होतात. मात्र मुलासह रमाला जीवदान मिळते. पुढे अनेक घटना घडल्यावर हा मुलगा आफ्रिकेतील मूर लोकांच्या ताब्यात येतो. तेथे त्याची एका गौरवर्णी तरुणीशी ओळख होते व त्याचे प्रीतीत पर्यवसान होते. ह्या मुलीचा बाप पुर्तुगीज असतो; आई ब्राह्मणी असते. ती दोघे पळून अरण्यात पूर्वपरिचित वृद्ध मूर स्त्रीजवळ राहतात. ओळी २२६३ ते २२८५ यात ज्या आफ्रिकी अरण्यात मुलगा शंकर व मुलगी लिली राहात होती त्याचें वर्णन आहे. यात वृत्त ‘ वैनायक ’ आहे. हा भाग उतरार्धातील आहे.

**बाजी प्रभूचा जयजयकार**—ह्यात बाजी प्रभु देशपांडे यांच्या पोवाड्यातील काही भाग आहे;—प्रथम पहिला चौक, नंतर दुसऱ्या चौकातले दोन चरण, व पुढे शेवटचे दोन चौक आहेत. तानाजीच्या पोवाड्याच्या धर्तीवरची रचना यात आहे. प्रारंभीचे दोन चरण ‘ स्वतंत्रतेच्या स्तोत्रा ’तले प्रथम चरण आहेत. वक्तृत्वपूर्ण लेखनशैलीचा यातला आवेश लक्षणीय आहे.

**श्रीशिवाजीमहाराजांची आरती**—स्वा. सावरकरांना जे एकमेव दैवत परम पूजनीय वाटे त्या श्रीशिवरायांची ही आरती आहे. बदलत्या काळातली दैवतेही बदलती असतात व त्यांचीच प्रार्थना व्हावयास पाहिजे, अशा हेतूने पुण्याला महाविद्यालयात असतानाच त्यांनी ही आरती रचलेली होती; श्रीशिवाजीमहाराज हीसुद्धा ‘ मूर्ति दुजी ती ’ नव्हे काय? म्हणूनच ही आरती या संग्रहाच्या अंतीं दिली गेली आहे. हाही योगायोगच—पण किती उचित!

**अनंताची आरती**—ही कविता एक स्वतंत्र भव्योत्कट भावकाव्य आहे. पण स्वा. सावरकरांनी तिचा समावेश “ गोमांतक ” काव्यातील पूर्वार्धात भार्गवग्रामातील माधूच्या मठातील शंकराची आरती म्हणून केले आहे.

९६२८३

REFBK-0016293

# शुद्धीपत्र

REFBK-0016293

[ खाली ठळक मुद्रणदोष व त्याची शुद्ध रूपे दर्शविली आहेत. पुस्तकात काही ठिकाणी कवितांच्या ओळीत तळटीपेचे क्रमांक दर्शविले गेले आहेत ते रद्द समजावेत. टीपा पुस्तकाच्या अंतीं जोडलेल्या आहेत—संपादक ]

| पृष्ठ | ओळ | | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ४८ | वरून | ४ | गीत गोविंदातील | गीतगोविंदातील |
| ५४ | खालून | २ | योगयुद्ध | योगयुक्त |
| ६३ | वरून | ४ | रथ | रथा |
| ६५ | खालून | ५ | वज्र कठिणशीं | वज्रकठिणशीं |
| ७३ | वरून | १३ | असें | जसें |
| ९६ | खालून | ६ | जाअिं | जअिं |
| १०५ | खालून | ३ | मी | ती |
| १११ | वरून | ४ | तत्क्षणीं ! | तत्क्षणीं... |
| १११ | वरून | ६ | ३४० | ७४० |
| ते | ते | | ते | ते |
| ११४ | वरून | ३ | ४०० | ८०० |
| १२१ | वरून | ४ | जरा. | जरा... |
| १२६ | खालून | ६ | अफ्रिकेत त्या अेक | आफ्रिकेतल्या अेक |
| १२७ | वरून | १ | और | गोर |
| १३० | खालून | ३ | दिसती ? ” | दिसती ? ॥... |

एक अगत्याची दुरुस्ती करावयाची आहे. पृष्ठ ९३ वर “ विरहोच्छ्वास ” कवितेच्या २८ व्या पद्यच्छेदांत पाचवी ओळ पुढीलप्रमाणे वाचावी :

“ तळमळला श्रीकृष्ण आणि लोभाचा
जअिं पडे रणीं तो भाचा ”

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७४६९४ Ch10Z
2007